संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
६ जानेवारी २०२४
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४८)



## 'पक्षी उन्हाचा'च्या निमित्ताने पंडित विद्यासागर आणि राजन हर्षे यांची मुलाखत
संवादक : संकल्प गुर्जर



कृष्णात खोत यांच्या 'रिंगाण' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्या निमित्ताने दोन विशेष लेख

## 'गावठाण' ते 'रिंगाण'!
आसाराम लोमटे

## झड-झिंबड : पर्यावरणीय संवेदन
संदीप भुयेकर











Date of Posting : 1-1-2024

संस्थापक, संपादक : साने गुरुजी
Date of issue
6 जानेवारी 2024
वर्ष 76 / अंक - 20
संपादक : विनोद शिरसाठ
सहयोगी संपादक मंडळ :
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

व्यवस्थापक आणि अक्षररचना : सुरेश माने
मुखपृष्ठ मांडणी : गिरीश सहस्रबुद्धे
मुद्रितशोधन : विनायक भंडारी

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. 1416 सदाशिव पेठ, पुणे 411030 येथे छापून, साधना साप्ताहिक, 431 शनिवार पेठ, पुणे 411030. येथे प्रसिद्ध केले.
Ph. 020-24451724 /25 / Mob. 7028257757
weeklysadhana@gmail.com
www.weeklysadhana.in
साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)
Ph.No. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
एक वर्षासाठी : 1100 रुपये
दोन वर्षांसाठी : 2100 रुपये
तीन वर्षांसाठी : 3000 रुपये

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा शेजारील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.60025586634, IFSCMAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे 2 येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला ई-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

4 **2024 च्या पोटात दडलेय काय?**
- संपादकीय

7 **केरळमधील विझिंजम बंदर पूर्ण होण्यापूर्वी...**
- रामचंद्र गुहा

9 **हे तर वैचारिक खाद्यच!**
- मीना कर्णिक

15 **'पक्षी उन्हाचा' या पुस्तकाच्या निमित्ताने चर्चा**
- राजन हर्षे व पंडित विद्यासागर

23 **`गावठाण` ते `रिंगाण`!**
- आसाराम लोमटे

29 **'झड-झिंबड' : कादंबरीतील पर्यावरणीय संवेदन**
- संदीप भुयेकर

35 **ज्वारीच्या काढणीसाठी तंत्रज्ञानच विकसित केलेले नाही**
- धनंजय सानप

39 **सर्व काही सत्तेसाठी...**
- जी. डी. पारेख

42 **प्रतिसाद**
- संजय लडगे, किशोर काकडे, बाळकृष्ण शिंदे,
- श्रीनिवास भोंग

45 **2023 मध्ये साधना प्रकाशनाने काय दिले?**

संपादकीय

# 2024 च्या पोटात दडलेय काय ?

प्रिय वाचक,

डेक्कन कॉलेजच्या स्थापनेला 200 वे सुरू झाले तेव्हा म्हणजे 6 ऑक्टोबर 2020 च्या भल्या पहाटे डेक्कन कॉलेजच्या परिसरात केशवराव पहिल्यांदा भेटले आणि त्यानंतरचे दोनेक वर्षे अधून-मधून भेटतच राहिले. त्या भेटी भल्या पहाटे आणि एकांतातच व्हायच्या. त्याच वेळी त्या परिसरात अन्य कोणी फिरायला आलेले असेल तर केशवराव आम्हाला दिसायचेच नाहीत. आमच्या त्या अकरा भेटीतील संवाद या संपादकीय जागेवर आम्ही मुलाखत स्वरूपात प्रसिद्ध करीत राहिलो आणि वाचकांनाही ते बऱ्यापैकी रोचक वाटत राहिले. साहजिकच होते ते, वयाची दीडशे वर्षे कधीच पार केलेली असल्याने आणि कर्तव्यबुद्धी व विनोदबुद्धी अद्याप शाबूत असल्याने, मागील सव्वाशे वर्षांचा या देशाचा जिवंत पट केशवरावांच्या मनात घोळत असायचा, मात्र त्यांना रस असायचा तो वर्तमानात. वर्तमान राजकीय, सामाजिक घटनांच्या संदर्भात ते जे काही भाष्य करायचे किंवा बिटवीन द लाईन्स सांगायचे किंवा सूचित करायचे, ते मार्मिक असायचे. प्रश्नांची उत्तरे ते बहुतांश वेळा त्रोटकच द्यायचे, अनेक वेळा तर त्यांच्या उत्तरांत प्रतिप्रश्नच असायचे, पूर्वाश्रमीचे न्यायाधीश असल्याने कदाचित. पण तरीही त्यांची मुलाखत वेगळे समाधान देऊन जायची, विचार करायला प्रवृत्त करणारे असे काही तरी त्यातून मिळायचेच.

तर असे हे केशवराव, 2022 च्या डिसेंबरमध्ये ब्रिटनला निघून गेले, आणि मग त्यांच्या भेटी थांबल्या. नंतरच्या वर्षभरात त्यांची आठवण अधून-मधून येतच राहिली; विशेषतः सभोवताली खूपच गोंधळाचे वातावरण असले तर वाटायचे, केशवरावांची एखादी मुलाखत घ्यावी आणि वाचकांना सादर करावी. त्यातून ठोस उत्तरे मिळतील असं नाही, पण थोडा रिलीफ मिळेल. अनेक वाचकांनाही अगदी तसेच वाटत असावे, कारण या वर्षभरात विविध ठिकाणच्या अनेक वाचकांनी आमच्याशी सहज बोलता बोलता केशवरावांची आठवण हळुवार मनाने काढली. तेव्हा आम्हाला कळले, आपण समजत होतो त्यापेक्षा जास्तच वाचकांच्या मनात केशवराव रुजलेत.

मात्र गेल्या महिन्यात त्यांची आठवण जरा जास्तच तीव्रतेने झाली. त्याला कारणही तसेच घडले. केशवराव ब्रिटनला गेले आणि नेमके त्याच काळात राजन हर्षे साधनाच्या आणि आमच्या ओळखीचे झाले. डॉ.हर्षे गेल्या वर्षभरात भेटले एकदाच, पण त्यानंतर त्यांनी बारा लेख लिहिले आणि त्या निमित्ताने त्यांच्याशी छत्तीस वेळा फोनवर बोलणे झाले. ते स्वतः कुलगुरू होते अलाहाबाद विद्यापीठाचे, त्यालाही ‘ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट’ म्हटले जाते. आणि त्यांच्या लेखमालेतून आलेल्या पुस्तकाचे नाव ठरले ‘पक्षी उन्हाचा : सात विद्यापीठांच्या आवारात’. दोन आठवड्यांपूर्वी या पुस्तकाचे प्रकाशन झाले आणि त्यावर चर्चाही झाली. तेव्हा केशवरांची आठवण जास्त तीव्रतेने झाली आणि मग ठरवलं, केशवरावाशी संपर्क करावा. पण त्यांनी स्वतःचे संपूर्ण नाव आणि पुण्यातला पत्ताही कधी सांगितलेला नव्हता, तर मग ब्रिटनमधला समजण्याचा प्रश्नच नव्हता. मात्र एक धागा हाती लागला, तो म्हणजे, जाताना ते म्हणाले होते, ‘मी चाललोय पणतीकडे आणि ती असते ऑक्सफर्डमध्ये, गणिताची प्राध्यापक.’ एका बेसावध क्षणी त्यांच्याकडून हे तपशील सांगितले गेले असावेत.

तर त्यांची पणती, ऑक्सफर्डमध्ये, गणिताची प्राध्यापक हा धागा लक्षात ठेवून आम्ही ऑक्सफर्डमधील गणिताच्या प्राध्यापक असलेल्या महाराष्ट्रीय व भारतीय महिला कोण आहेत याचा शोध घेतला आणि धडाधड मेल टाकले, भारतीय वंशाच्या अन्य प्राध्यापकांनाही मेल टाकले, केशवराव नावाची व्यक्ती तुमच्यापैकी कोणाची नातेवाईक आहे


Date of Posting : 1-1-2024

का? सर्व बाजूंनी नकारघंटा आली. नंतर लक्षात आले की, त्यांची पणती ब्रिटिश किंवा अन्य वंशाची असेल तर? आणि तो होरा बरोबर ठरला, आफ्रिकन अमेरिकन वंशाची आई आणि आशियाई युरोपियन वंशाचे वडील अशा कुटुंबातील एका प्राध्यापक महिलेने कळवले की, केशवराव तिचे पणजोबा आहेत. मात्र अधिक चौकशी करायला लागलो तर तिने सांगितले, 'पणजोबांना स्वतःचे खासगीपण सोडायचे नाही, म्हणून ते तपशील तुम्हाला सांगता येणार नाहीत.' आम्ही म्हणालो, 'ते ठीक आहे; पण ते व्यवस्थित राहताहेत ना तिथे?' तर ती बेसावध क्षणी म्हणाली, ''ते पुन्हा भारतात आलेत, कालचा ख्रिसमस संपला आणि ते लगेच निघाले; आम्ही खूप आग्रह केला, थांबा आता इथेच, तर म्हणाले 2024 सुरू होण्यापूर्वी मला भारतात जायलाच हवे..."

आम्ही तो फोन तसाच ठेवला आणि पहाट होण्याची वाट पाहू लागलो. आणि मग 2023 वर्ष समाप्तीच्या आदल्या दिवशी भल्या पहाटे डेक्कन कॉलेजात गेलो, तर नेहमीच्या बाकड्यावर केशवराव दिसले. क्षितिजाकडे नजर लावून बसलेले, अगदी वर्षभरापूर्वी दिसले होते तसेच. गेलो, 'वेलकम केशवराव' असे मोठ्या आवाजात म्हणालो. तेव्हा ते थोडेसे दचकले, पण लगेच सावरले. त्यांनी हलकेसे स्मित दिले आणि मग झालेला संवाद असा...

**प्रश्न :** केशवराव, गेल्या वर्षी ब्रिटनमध्ये जाण्यापूर्वी भेटलात, तेव्हा आम्हाला वाटले होते की, बहुदा ही आपली शेवटची भेट. ब्रिटन खूप तुम्हाला आवडेल असाच अंदाज होता आणि ब्रिटनमध्येच मृत्यू होईल असेही वाटत होते आम्हाला...

उत्तर : ज्या ब्रिटनने या देशावर दिडशे वर्षे राज्य केले, तो देश आम्हाला इतका कसा आवडेल? आणि मरायचे असेल तर आम्ही आमच्या मातृभूमीत का मरू नये?

**प्रश्न :** पण तुम्ही भारतात परतलात ते अतिशय कठीण काळात, २०२४ हे वर्ष सुरू होते आहे आता. आणि या वर्षाच्या पोटात काय दडले आहे, या विचाराने अनेकांच्या पोटात गोळा येतो आहे.

उत्तर : देश अडचणीत असताना काही लोक देश सोडून जातात त्यात वावगे नाही वाटत आम्हाला, मात्र देश अडचणीत असताना आपल्या देशात थांबणे किंवा परत येणे हेच खऱ्या देशभक्तीचे लक्षण आहे असे नाही वाटत तुम्हाला?

**प्रश्न :** वाटते की, निश्चितच वाटते! पण आम्हाला वाटले, ब्रिटनमध्ये राहून इथल्या बातम्या वाचून तुम्ही वैतागून गेले असणार. आणि अशा देशात परत जाण्यापेक्षा मरण पत्करणे बरे असे तुम्हाला वाटले असेल.

उत्तर : तुम्ही आम्हाला इतके अर्धवट समजताय का? अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळल्याचे पाहणारे आम्ही लोक, हे कसे विसरलात?

**प्रश्न :** तर सांगा ना मग, २०२४ च्या पोटात दडलेय काय?

उत्तर : तुमच्यावर 'सामना' चित्रपटाचा नको तितका जास्त प्रभाव दिसतोय. 'या टोपीखाली दडलंय काय', हे गाणं आता कालबाह्य झालं आहे.

**प्रश्न :** आमच्यावर सामनाचा प्रभाव जरा जास्तीच आहे खरा, पण वयाच्या १८ व्या वर्षी पाहिलेल्या कलाकृतीचा राहतोच ना?

उत्तर : मग त्यातले मास्तरांच्या तोंडी असलेले वाक्य विसरलात वाटतं? 'जेव्हा कुठल्याही साम्राज्यावर सूर्य उगवतो तेव्हा तिथे तो केव्हा ना केव्हा मावळणार हे निश्चित असतं.'

**प्रश्न :** म्हणजे भारतीय राज्यावर आता जो काही सूर्य उगवला आहे तो मावळणार हे निश्चित?

उत्तर : हो, तो मावळणारच? पण तुम्ही शब्द जरा जपून वापरा, तुमचेच लोक भडकतील तुमच्यावर. किमान 'काळा सूर्य' असा तरी शब्दप्रयोग करा.

**प्रश्न :** बरे झाले, सावध केलेत. पण सांगा ना, हा काळा सूर्य २०२४ या वर्षी मावळणार की २०२९ मध्ये?

उत्तर : जनतेला पुरेसा तापदायक वाटत नाही, तोपर्यंत सूर्य मावळत नसतो.

**प्रश्न :** तुम्ही तापदायक म्हणताय, प्रत्यक्षात तो दाहक झाला आहे; तुम्हाला काय जनतेने भाजून निघणे अपेक्षित आहे?

उत्तर : तुम्हाला आणि तुमच्यासारख्या मूठभरांना तसे वाटत असेल, कारण तुमची सहनशक्ती खूप कमी आहे.

**प्रश्न :** म्हणजे जनतेची सहनशक्ती जबरदस्त आहे असे म्हणायचेय का तुम्हाला?

उत्तर : म्हणता येईल तसे. पण अगदीच असह्य झाल्याशिवाय किंवा दुसरी बाजू अगदीच सुसह्य वाटल्याशिवाय जनता बदल करू इच्छित नसते.

**प्रश्न :** अच्छा, म्हणजे अगदी थेटच बोलायचे तर, आपले पंतप्रधान अद्याप 'असह्य' वाटत नाहीत आणि राहुल गांधी अद्याप सुसह्य वाटत नाहीत?

उत्तर : जनतेला तसे वाटत असावे, आम्हाला नाही.

**प्रश्न :** पण २०२४ मध्ये पुन्हा हेच सरकार आले तर?

उत्तर : आले तर, काय होईल यापेक्षा काय व्हावे यात आम्हाला जास्त रस आहे!

**प्रश्न :** पण भारतीय लोकशाहीचा कडेलोट होईल, हिंदू राष्ट्र अस्तित्वात येईल, संविधान गुंडाळून ठेवले जाईल, विरोधी पक्ष नेस्तनाबूत होतील, एकाधिकारशाही बोकाळेल, धार्मिक दुफळी माजेल... ही आणि अशी बरीच भीती अनेकांच्या मनात घर करून आहे.

उत्तर : ती भीती अगदीच निराधार नाही, पण अनेक सिंहासने लोक समजतात तेवढी बळकट नसतात.

**प्रश्न :** पण दशकानुदशके नव्हे तर शतकानुशतके काही सिंहासने अढळ राहिली, असा इतिहासाचा दाखला आहे.

उत्तर : बरोबर, पण दीड शतक पारतंत्र्यात राहिलेल्या या देशाने पाऊण शतक अर्धी कच्ची का होईना लोकशाही अनुभवली आहे. आणि आपण आता एकविसाव्या शतकात आहोत.

**प्रश्न :** पण विद्यमान केंद्रीय सत्ता उलथवून टाकण्यासाठी अस्तित्वात आलेली 'इंडिया आघाडी' आताच गर्भगळीत झालेली दिसते आहे?

उत्तर : जनतेच्या मनातील अंडर करंट महत्त्वाचा ठरतो अशा वेळी.

**प्रश्न :** म्हणजे एप्रिल-मे २००४ मध्ये झाले तसेच २०२४ मध्येही होईल असे वाटते तुम्हाला?

उत्तर : आम्हाला नाही वाटत तसे, पण अजिबातच शक्यता नाही असेही नाही.

**प्रश्न :** लोकसभा निवडणुकीची तयारी करायची सोडून राहुल यांनी आता 'भारत न्याय यात्रा' सुरू केलीय, याला काय म्हणावे?

उत्तर : निवडणुका लढवणे आणि जिंकणे हे अवघड काम आहे, जनतेमध्ये जाणे हे सोपे काम आहे. त्यांना जे चांगले जमते ते करताहेत ते.

**प्रश्न :** इंडिया आघाडीचा एक थोडा आशेचा किरण नितीश कुमार, त्यांचेही तळ्यात मळ्यात चालू आहे?

उत्तर : त्यांची चूक काहीच नाही, ते अपरिहार्यतेचे राजकारण करीत आलेत पावशतक. अन्य लोकच त्यांना उंच घोड्यावर बसवण्याचे स्वप्न पाहताहेत.

**प्रश्न :** केशवराव, तुम्ही गेलात तेव्हा शिवसेनेची वाताहात झाली होती, ती अजून सावरलेली नाही? ते पुन्हा आपल्या नैसर्गिक मित्राकडे जातील?

उत्तर : नितीश कुमार जात राहिले तर हे का नाही जाणार?

**प्रश्न :** आणि तुम्ही तिकडे असताना इकडे महाराष्ट्रात शरद पवारांच्या पक्षाची वाताहत काय झाली. दोन्ही पवार पुन्हा एकत्र येतील?

उत्तर : त्यांनी एकत्र येऊ नये, त्यांच्या चाहत्यांचा राजकारणावर उरलासुरला विश्वास टिकून राहायचा असेल तर...

**प्रश्न :** राज ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांच्या राजकरणात साम्य दिसायला लागले आहे काही लोकांना, तुम्हाला काय भवितव्य दिसते आहे त्या दोघांचे?

उत्तर : चला, उशीर झालाय, निघतो मी...

रामचंद्र गुहा

# केरळ मधील विझिंजम बंदर पूर्ण होण्यापूर्वी...

माझ्या माहितीअनुसार, भारतात केरळ या राज्यामध्ये सर्वाधिक सक्रिय नागरी समुदाय संघटना आहेत. शासनव्यवस्था व राजकीय पक्ष यांच्यापासून स्वातंत्र्य राखून या संघटना कार्यरत असल्याचं दिसतं. विज्ञान, आरोग्य, शिक्षण आणि अगदी पर्यावरणीय शाश्वतता यांसह अनेक अवकाशांमध्ये त्या काम करतात. अभ्यासक आणि वैज्ञानिक यांच्या सहभागामुळे या संघटनांचं काम अधिक समृद्ध झालं. आपल्या देशात इतर कुठल्याही राज्यापेक्षा केरळमध्ये अकादमिक अभ्यासक आणि व्यापक जनता यांच्यातील हा संवाद अधिक उत्कट व रचनात्मक आहे.

गेल्या तीस वर्षांमध्ये मी किमान दोन डझन वेळा तरी केरळला भेट दिली असेल. तिथे विविध विषयांवरील सार्वजनिक बैठकांमध्ये नागरी समुदायामधील उत्साह व ऊर्जा मी स्वतः अनुभवली आहे. अगदी अलीकडे, गेल्या महिन्यात जानकीय समर समिती या संस्थेने निमंत्रित केल्यामुळे मी केरळला गेलो होतो. राज्याच्या दक्षिण भागातील मच्छीमारांचं प्रतिनिधित्व करणारी ही संघटना आहे. जानकीय समर समितीने विझिंजम इथे उभारण्यात येत असलेल्या एका प्रचंड मोठ्या बंदराला विरोध दर्शवण्याचं काम गेली काही वर्षं सुरू ठेवलं आहे. हे बंदर 'भारताचं सिंगापूर' ठरेल, त्यातून या भागाची मोठी भरभराट होईल, असा दावा राज्य शासनाने केला आहे. परंतु, या प्रदेशातील लोकांना अशा दाव्यांविषयी स्पष्टपणे शंका वाटते. हा प्रकल्प 'विध्वंसक विकासा'चंच खास उदाहरण असल्याचं लोकांचं मत आहे.

या समुद्री बंदर प्रकल्पाचं सखोल आकलन करून घेण्यासाठी जानकीय समर समितीने अभ्यासकांचा एक गट नियुक्त केला आणि सदर प्रकल्पाच्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी त्यांच्यावर दिली. या गटाने तयार केलेला अहवाल एक प्रकारे दाखला घालून देणारा आहे. आंतरविद्याशाखीय संशोधनाचा सर्वोत्तम नमुना असणाऱ्या या अहवालामध्ये पर्यावरणतज्ज्ञ, पृथ्वी-वैज्ञानिक, हवामान-वैज्ञानिक, समाज-वैज्ञानिक व अर्थशास्त्रज्ञ यांच्या दृष्टिकोनांचा मिलाप झालेला आहे. त्यात बरीच अनुभवजन्य माहिती समाविष्ट करण्यात आली असून बंदराचं बांधकाम सुरू होण्यापूर्वी आणि सुरू झाल्यानंतर त्या भागाची परिस्थिती दाखवणारी बोलकी छायाचित्रंही त्यात आहेत. या भागाच्या सर्व पैलूंशी संबंधित अनेकानेक वैज्ञानिक अभ्यासांचा आधार घेऊन हा अहवाल लिहिण्यात आला आहे. शिवाय, नव्याने केलेला क्षेत्राभ्यास, मुलाखती, सर्वेक्षण व सार्वजनिक सल्लामसलत, यांनी अहवालाला आणखी समृद्ध केलं आहे.

केरळमधील या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या उत्कृष्ट वैज्ञानिकांनी तयार केलेल्या अहवालाचं शीर्षक असं आहे : 'Our Beaches, Our Sea: Heritage of Fishing Communities, Usurfruct of all Citizens: Impact of the Vizhinjam International Seaport on the Beaches, Coastal Sea, Biodiversity, and the Livelihoods of Fishing Communities in Thiru-ananthapuram District.' भारतातील मोजक्याच विद्यापीठांमध्ये असा काटेकोर संशोधनावर आधारित अभ्यास करण्याची क्षमता आहे. अर्थातच, कोणताही सरकारी विभाग असा अभ्यास सादर करू शकणार नाही. विझिंजम समुद्री बंदरामुळे केरळमधील लोकांचा लाभ होण्याऐवजी त्यांचं नुकसानच होईल, असं या अहवालातील सर्वांगीण आकडेवारी-माहितीवरून व विश्लेषणावरून स्पष्ट होतं.

या बंदराचं बांधकाम सुरू होण्यापूर्वी विझिंजम हे केरळमधील सर्वांत मोठं व सर्वांत महत्त्वाचं मच्छीमार गाव होतं. तिथे सुमारे साडेचार हजार मच्छीमार कुटुंबं राहत होती, आणि हजारो होड्या होत्या. पावसाळ्यामध्ये


Date of Posting : 1-1-2024

इतर गावांमधील मच्छीमारांनाही हे बंदर सुरक्षित ठरायचं. ‘इथला मच्छीमारीचा व्यवसाय व्यवहार्य, शाश्वत आणि नफादायक स्वयंरोजगाराचा पर्याय म्हणून टिकून आहे, त्यामुळे या समुदायातील अनेक शिक्षित तरुणांनी जाणीवपूर्वक मच्छिमारी सुरू ठेवायची निवड केली. हे तरुण आधुनिक, लघुस्तरीय, तंत्रज्ञानकेंद्री तंत्र वापरतात आणि प्रस्थापित संस्थात्मक व्यवस्थांद्वारे थेट उपभोक्त्यांपर्यंत पोहोचण्याचे अभिनव मार्ग त्यांनी विकसित केले आहेत. त्यांच्यासाठी ही किनारपट्टी आणि समुद्र सखोल सांस्कृतिक महत्त्व राखणारा आहे’, असं अहवालात नमूद केलं आहे.

‘विझिंजम इंटरनॅशनल सीपोर्ट लिमिटेड’ (व्हीआयएसएल) या सदर प्रकल्पाच्या प्रवर्तक कंपनीने आवश्यक पर्यावरणीय परवानग्या मिळवण्यासाठी माहिती कशी दडपली, माहितीचा गैरवापर कसा केला आणि दिशाभूल करणारी मांडणी कशी केली, याची विस्तृत नोंद अहवालात घेतलेली आहे. या बंदराचा जैवविविधतेवर होणाऱ्या संभाव्य परिणामाची व्याप्ती कंपनीच्या ‘पर्यावरणीय परिणाम मूल्यमापना’मध्ये अतिशय कमी करून दाखवण्यात आली; मच्छीमारांच्या उपजीविकेची हानी किती होईल याबद्दल खूप कमी प्रमाण सुचवणारं अनुमान करण्यात आलं; पर्यटनावरील नकारात्मक परिणामही कमी करून दाखवण्यात आले; या प्रकल्पामुळे होणाऱ्या किनारपट्टीच्या हानीकडे दुर्लक्ष केलं; आणि बंदर उभारल्यानंतर कायमस्वरूपी गमवाव्या लागणाऱ्या कड्यांच्या व किनाऱ्यांच्या सौंदर्यमूल्याकडेही काणा डोळा केला.

‘अदानी समूह’ या प्रस्तावित प्रकल्पाचा प्रवर्तक आहे. सदर प्रकल्प चार प्रमुख निकषांवर अत्यंत सदोष ठरतो, याची मांडणी वैज्ञानिकांच्या अहवालात कष्टपूर्वक करण्यात आली आहे.

‘अर्थकारणा’च्या संदर्भात विचार करायचा तर, हा प्रकल्प बराच लांबत आला असून त्यात अनेक खर्चांची भर पडली आहे आणि संभाव्य लाभ फुगवून सांगण्यात आले आहेत.

‘समाजकारणा’संदर्भात बोलायचं तर, या प्रकल्पामुळे मच्छीमारांचं विस्थापन होईल आणि श्रीमंत व कष्टकरी वर्ग यांच्यातील तफावत विस्तारेल; परिमामी, विषमता तीव्र होतील. हा प्रकल्प किनाऱ्यांवरील गावातल्या महिलांवरचं ओझं वाढवणारा ठरेल; या महिलांना उपजीविकेसाठी दुसरीकडे जाऊन मोलकरीण म्हणून काम करणं भाग पडेल.

‘पर्यावरणा’संदर्भात या प्रकल्पामुळे प्रचंड हानिकारक परिणाम होतील, किनाऱ्यांचा व समुद्री जीवनाचा विध्वंस होईल आणि जलस्रोत प्रदूषित होतील. प्रकल्पामुळे मोजाव्या लागणाऱ्या पर्यावरणीय किमतीमुळे मच्छीमारांसमोरील उपजीविकेच्या शक्यता आणखी कमी होतील. किनारपट्टीवरील परिसंस्था अंगभूतरीत्या नाजूक असतात आणि अशा महाप्रकल्पांमुळे त्यांची अपरिवर्तनीय हानी होऊ शकते. आधीच आपल्यावर हवामानबदलाच्या संकटाचं सावट आहे; अशा वेळी सदर प्रकल्पानंतर चक्रीवादळासारख्या अनपेक्षित नैसर्गिक आपत्तींमुळे या भागात आणखी मोठा विध्वंस होईल.

बंदरप्रकल्पामुळे मासेमारी, पर्यावरणीय संरक्षण, पर्यटन, पाण्याची गुणवत्ता, संस्कृती व सौंदर्यमूल्यं यांचं संवर्धन, इत्यादींसारख्या परिसंस्थात्मक सेवांसंदर्भातील नुकसान वर्षाकाठी 2027 कोटी रुपये इतकं असेल, असा अंदाज वैज्ञानिकांनी अहवालात नोंदवला आहे. निव्वळ ही आकडेवारी लक्षात घेतली तरी हा प्रकल्प केरळसाठी अव्यवहार्य ठरतो.

शेवटी, ‘राजकारणा’चा मुद्दा विचारात घेतल्यावर असं दिसतं की, गोपनीय, अपारदर्शक व पूर्णतः लोकशाहीविरोधी मार्गांचा वापर करून हा प्रकल्प पुढे रेटण्यात आला. केंद्रातील भारतीय जनता पक्षाचं सरकार आणि केरळमधील काँग्रेसचं सरकार व डाव्या आघाडीची सरकारं, हे सर्वच लोकशाही तत्त्वांचं व प्रक्रियांचं निर्लज्ज उल्लंघन करण्यासंदर्भात दोषी असल्याचं अहवालात नमूद केलं आहे.

अशा रितीने, आर्थिक व्यवहार्यता, सामाजिक न्याय, पर्यावरणीय शाश्वतता व लोकशाही प्रक्रिया या दृष्टिकोनांनुसार अदानींचा व्हीआयएसएल प्रकल्प केरळमधील व भारतातील नागरिकांसाठी अपायकारक ठरेल, असं जानकीय समर समितीच्या अहवालात दाखवण्यात आलं आहे.

याशिवाय, इतरही काही मुद्दे या प्रकल्पाविरोधात जाणारे आहेत. उदाहरणार्थ, ‘सौंदर्यात्मक’ बाजूने विचार केला तर, सदर प्रकल्प अनेक किनारे नष्ट करेल;

हे किनारे सध्या 'प्रत्येक नागरिकाचा स्वर्ग' म्हणून अस्तित्वात आहेत; तिथे सामाजिक व आध्यात्मिक पोषणाचा अवकाश निर्माण झालेला आहे; संगीत, क्रीडा व उत्सवांचं हे ठिकाण आहे. शेवटी, या घडामोडींना 'राष्ट्रीय सुरक्षिततेचा'ही आयाम आहे. अदानी समूहाकडे आधीच तेरा समुद्री बंदरांचं व आठ विमानतळांचं नियंत्रण आहे. भारतभरातील, तसंच भारत व जग यांमधील मानवी आणि व्यापारी वाहतुकीबाबतीत एकाच खाजगी कंपनीला इतकं निर्णायक स्थान देणं निश्चितपणे देशाच्या सुरक्षिततेसमोर गंभीर धोका उत्पन्न करणारं ठरू शकतं.

या अविचारी प्रकल्पाचा संभाव्य विपरीत परिणाम सहन कराव्या लागणाऱ्या प्रदेशाविषयी प्रस्तुत अहवाल म्हणतो : 'इथल्या समुदायांची मुळं किनारपट्टीवरील प्रदेशांमध्ये सखोल रुजलेली आहेत आणि ते पिढ्यान्‌पिढ्या समुद्रांचे राखणदार राहिलेले आहेत. शाश्वत मासेमारीसंदर्भातील त्यांचे अनुभव पर्यावरणीय शहाणीव राखणाऱ्या दीपस्तंभासारखे आहेत; त्यातून समुद्री संसाधनांचं रक्षण होतं आणि बहुतांश केरळवासीयांना अत्यंत आवडणाऱ्या रुचकर समुद्री खाद्यपदार्थांची तजवीज होते. देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणाऱ्या मूल्यवान समुद्री खाद्याच्या निर्यातीत या मच्छीमारांच्या श्रमामुळे विशेष भर पडते. त्यांच्या परंपरांमुळे केरळचा सांस्कृतिक अवकाश संपन्न झाला आहे आणि पर्यटकांसाठी हे एक अनन्यसाधारण व आकर्षक ठिकाण ठरलं आहे'.

'समुद्रकिनारे म्हणजे केवळ जमीन आणि समुद्र यांचा संगम होणारा वालुकामय भूप्रदेश नसतो. समुद्रकिनाऱ्यांना खाजगी हितसंबंधांसाठी वापरायच्या क्रयवस्तू मानू नये किंवा अनुचित पायाभूत विकासाचा विषय ठरवू नये. किनारे आणि त्याजवळचे जलप्रदेश सक्रिय मच्छीमारांच्या मूलभूत हक्कांचा भाग मानायला हवेत. या मच्छीमारांना त्यांची उपजीविका, परंपरागत अधिकार टिकवण्यासाठी, या प्रदेशांचा वापर करता यायला हवा, आणि महत्त्वाचं म्हणजे आपल्या देशातील सर्व नागरिकांना या मूल्यवान संसाधनांचा उपभोग घेण्याची संधी मिळायला हवी,' असंही या अहवालात इतरत्र नोंदवलं आहे.

विशेष म्हणजे हा अहवाल केवळ टीका करण्याच्या प्रेरणेतून लिहिलेला नाही. सदर प्रकल्पाच्या सामाजिक व पर्यावरणीय परिणामांचं उपशमन करण्यासाठी काही रचनात्मक सूचनाही त्यात केल्या आहेत. आपला अहवाल 'विकास रोखण्यासाठीचे मार्ग शोधणारा नाही', उलट, 'केरळसाठी एकमेव व्यवहार्य मार्ग असणाऱ्या पर्यावरणीयदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या शाश्वत विकासाची विनंती करणारा' आहे, असं अहवालकर्त्यांनी म्हटलं आहे. 'आपल्या समोर येणारा हा महाप्रकल्प कोणत्याही पर्यावरणीय सुरक्षिततांचा विचार करणारा नाही, इथल्या नाजूक परिसंस्थेकडे काणा डोळा करणारा आहे आणि पारंपरिक पेशांची हानी करणारा आहे. ... या प्रकल्पात केरळ सरकारने बरीच गुंतवणूक केली आहे, त्यासाठी स्वतःच्या वित्तपुरवठ्यासोबतच वित्तीय संस्थांकडून प्रचंड कर्ज घेण्यात आलं आहे, आणि या सगळ्यात मच्छीमार समुदायांची उपजीविका व सर्वसामान्य लोकांचं शाश्वत हित मात्र बेपर्वाईने गहाण ठेवण्यात आलं आहे.'

केरळमधील वैज्ञानिकांनी तयार केलेला हा अहवाल इंटरनेटवर उपलब्ध आहे (पाहा : https://www.vizhinjamtheeram.org/report.php). इच्छुक वाचकांनी हा अहवाल वाचावा, अशी मी आग्रहाची विनंती करेन. या अहवालातील सखोल दस्तऐवजीकरण आणि समर्थ युक्तिवाद पाहून मी अचंबित झालो, तसंच इतर वाचकांनाही वाटेल, याची मला खात्री आहे. या अहवालाने मोठी लोकसेवा केली आहे- केवळ केरळमधील लोकांनाच नव्हे तर प्रत्येक लोकशाहीवादी भारतीयांना याचा उपयोग होईल. मोठमोठ्या कंपन्यांनी केलेले फसवे व विपर्यस्त दावे आणि त्यांना पाठबळ पुरवणारे राजकीय सत्ताधारी, यांच्या बाबत अधिक जागरूक होण्यासाठी हा अहवाल सहायक ठरावा.

अनुवाद- प्रभाकर पानवलकर

**रामचंद्र गुहा**, बंगळुरु

मीना कर्णिक

# हे तर वैचारिक खाद्यच!

'बोस्नियन पॉट' नावाचा एक पदार्थ आहे. बोस्नियामधल्या खाणकामगारांचा एक पारंपरिक पदार्थ. कामावर येताना यातला प्रत्येक जण आपल्या घरून एक वस्तू घेऊन येतो. बहुतेक वेळा यात विविध भाज्यांचाच समावेश असतो. अगदीच कुणाचं नशीब बरं असेल तर मांस असतं. जमिनीमधल्या एका खड्ड्यात मडकं ठेवलेलं असतं. त्यात हे सगळे पदार्थ टाकून शिजवले जातात.

पावो मॅरिनकॉविच यांच्या नव्या सिनेमाची, 'बोस्नियन पॉट'ची सुरुवातच ही आहे. एकेक खाणकामगार त्याच्या जवळची भाजी खड्ड्यात टाकतो आणि खाणीमध्ये काम करायला जातो. त्यांचे कामाचे तास भरेपर्यंत हा पदार्थ मंद आचेवर शिजत राहतो. काम संपलं की ते सगळे बाहेर येतात आणि गप्पा मारत, आपल्या जेवणाचा आस्वाद घेतात.

पण म्हणून सिनेमा ना रेसिपीशी संबंधित आहे, ना केवळ बोस्नियामधल्या खाणकामगारांशी. हा पॉट म्हणजे एक रूपक आहे आणि एका व्यक्तीची गोष्ट सांगता सांगता दिग्दर्शक त्यातून स्थलांतरितांच्या परिस्थितीवर भाष्य करतो.

सिनेमाचा नायक फारुक एक मध्यम वयीन लेखक आहे. अजूनतरी त्याला फारसं यश मिळालेलं नाही, पण त्याचे प्रयत्न चालू आहेत. सारायेवोमध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर तो आपल्या मायदेशातून ऑस्ट्रियातल्या ग्राझमध्ये राहायला आलाय आणि गेली बारा-पंधरा वर्षं तिथेच राहतोय. सुरुवातीला आपल्याला पडद्यावर दिसणारी बोस्नियन पॉटची गोष्ट फारुकनेच रेडिओसाठी लिहिलेली आहे.

फारुकपाशी फारसं काम नाही. अशातच, ऑस्ट्रियन सरकारच्या कडक नियमांनुसार फारुकच्या तिथे राहण्याच्या परमिटचं नूतनीकरण होत नाही आणि तो हादरतो. आपल्यापाशी काम आहे आणि त्यातून आपण देशाच्या महसुलामध्ये भर घालत आहोत, समाजाचं देणं फेडत आहोत हे सिद्ध करण्यावाचून त्याच्या समोर पर्याय नसतो.

एका बाजूला लेखक म्हणून स्वतःची ओळख शोधणं आणि दुसऱ्या बाजूला आपली मुळं याच देशात आहेत हे सिद्ध करणं- अशा दुहेरी कात्रीत फारुक सापडतो. त्याचं काय होतं याची ही गोष्ट.

दिग्दर्शकाने ही गोष्ट कुठेही दुःखाचे कढ काढत सांगितलेली नाही. किंबहुना, यातल्या अनेक प्रसंगांमधून विनोदनिर्मितीच होते. फारुकचं त्याच्या बिल्डिंगमधल्या बाईशी असलेलं अफेअर, युद्धाच्या आधी त्याने लिहिलेल्या नाटकाचा प्रयोग करण्याच्या कल्पनेने त्याचं झपाटून जाणं, प्रत्यक्ष प्रयोग होत असताना त्यात आलेले अडथळे हे सगळं हसतखेळत, हलक्या फुलक्या पद्धतीने दिग्दर्शक मॅरिनकॉविच दाखवतात आणि आजच्या जगाला भेडसावणाऱ्या प्रश्नावर भाष्यही करतात. स्थलांतरितांमधल्या विचारवंतांचं अस्वस्थपण अधोरेखित करतात आणि वेळ आली की आपोआप ते आणि आपण अशी दुही निर्माण होते याची जाणीव करून देतात. मुख्य म्हणजे बोस्नियन पॉटसारखी उत्तम रेसिपी तयार व्हायची असेल तर त्यात सगळ्या प्रकारच्या भाज्या

नोव्हेंबर २०२३ मध्ये गोव्यात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव झाला (इफी), त्या ठिकाणी विविध देशांतील विविध भाषांमधील अनेक चित्रपट पाहता आले. त्यापैकी बोस्निया, बल्गेरिया आणि स्पेन या तीन देशांमधले तीन अगदी वेगळे सिनेमे. एक स्थलांतरितांबद्दल बोलणारा, एक समाजातल्या वयोवृद्धांच्या स्थानाविषयी प्रश्न निर्माण करणारा आणि तिसरा तीस वर्षांनंतर दिग्दर्शनाकडे वळलेल्या दिग्दर्शकाचा.



पडाव्या लागतात, तरच त्याला चव येते हेही सांगतात.

एकच रंग, एकच भाषा, एकच धर्म... सगळं काही एकच. जगण्यात मुळी काही वैविध्यच नाही. कसं असेल असं जग? याची कल्पना खरं तर आपल्या देशातल्या बहुसंख्यांकांनी करून बघायला हवी. कसली चव असणार अशा जगण्यात?

या सिनेमात बोस्निया, क्रोएशिया आणि ऑस्ट्रिया अशा तीनही देशांतले कलाकार आहेत. एका प्रसंगात एरवी जर्मन बोलणारा फारुक समोरच्या बाईला रागाने काहीतरी बोलतो तेव्हा आपल्या भाषेत व्यक्त होतो. त्याच्या दुर्दैवाने त्या बाईला बोस्नियाची भाषा येत असल्यामुळे ती शांतपणे त्याला प्रत्युत्तर देते! मात्र, जर्मन किंवा बोस्नियन यांपैकी कुठलीही भाषा येत नसलेले आपण इंग्लिश सबटायटल्स वाचून सिनेमा समजून घेत असतो आणि मग असे छोटे, पण महत्त्वाचे बारकावे निसटून जातात.

दिग्दर्शक पावो मॅरिनकॉविच गोव्यामध्ये आलेले होते. त्यांना मी हाच प्रश्न विचारला. आणि भाषेतले बारकावे निसटतात हे त्यांनीही मान्य केलं. सिनेमा किती कमी बजेटमध्ये केला हे त्यांनी सांगितलं आणि आता राजकीय सिनेमे बनवणं दिवसेंदिवस फारसं सोपं राहिलेलं नाही असं मत व्यक्त केलं.

अशा परिस्थितीतही आपल्याला हवं ते सांगण्याचा प्रयत्न करणारे दिग्दर्शक आहेत, हेही नसे थोडके.

सिनेमाचा ट्रेलर पाहायचा असेल तर https://vimeo.com/833941114 या लिंकवर क्लिक करा.

‘ब्लागाज लेसन्स’ ही एका शिक्षिकेची गोष्ट आहे. म्हटलं तर क्राइम थ्रिलर, म्हटलं तर वयस्क, एकट्या राहणाऱ्यांच्या आयुष्यातल्या कारुण्याचं दर्शन घडवणारी. तेवढंच नाही, ही गोष्ट सांगताना दिग्दर्शक स्टीवन कोमान्दारेव यांनी बल्गेरियामधल्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करायचा प्रयत्न केलाय. 2017मध्ये त्यांनी ‘डायरेक्शन्स’ नावाचा सिनेमा केला होता, त्यानंतर 2019मध्ये त्यांचा ‘राउंड्स’ प्रदर्शित झाला. आणि ‘ब्लागाज लेसन्स’ने त्यांनी आपली त्रिसूत्री पूर्ण केली आहे. यातली ब्लागाची भूमिका करणाऱ्या एली स्कॉरचेवा तब्बल तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा कॅमेऱ्यासमोर उभ्या राहिल्या आणि त्यांनी अप्रतिम अभिनय केलाय.

काय आहेत या ब्लागाचे धडे?

आयुष्यभर शिक्षिकेचं, भाषा शिकवण्याचं काम तिने केलंय. त्यामुळे समोरच्याच्या भाषेतल्या चुका काढण्याची सवय तिला जडलीये. बल्गेरियामध्ये आलेल्या आणि तिथली भाषा शिकू इच्छिणाऱ्या तरुण मुलामुलींच्या शिकवण्याही ती घेतेय.

सिनेमा सुरू होतो तेव्हा ब्लागाच्या नवऱ्याचं नुकतंच,



'ब्लागाज लेसन्स'

आठवडाभरापूर्वी निधन झालंय हे आपल्याला कळतं. त्याच्या थडग्यासाठी ती एक चांगली जागा शोधतेय. एक जागा तिला आवडते, पण त्याचे पैसे सहजासहजी तिच्या खिशाला परवडणारे नाहीत. त्यातून, 'बाजाराचे नियम आहेत, जो पहिला येईल त्याला वस्तू मिळणार', असं ती जागा विकणाऱ्याने सांगितल्यामुळे लवकरात लवकर पैसे उभे करणं तिच्यासाठी महत्त्वाचं आहे. नव्हे, आता ते तिच्या आयुष्याचं मिशन आहे. दूर अमेरिकेत काम करणाऱ्या तिच्या मुलाला या सगळ्याशी फारसं देणंघेणं नाही, त्यामुळे पूर्ण जबाबदारी ब्लागाचीच आहे.

आणि एके दिवशी तिला फोन येतो. पोलिसांच्या क्राइम ब्रँचकडून. 'काही माणसं तुझे पैसे चोरायचा प्रयत्न करणार आहेत, पण आम्ही त्यांना पकडायचा प्रयत्न करत आहोत, त्यासाठी आम्ही सापळा रचलाय, तेव्हा ते जे सांगतील ते कर म्हणजे आम्हांला त्यांना रंगेहाथ पकडता येईल', वगैरे वगैरे.

घरात एकटी, वय झालेलं. ब्लागा स्वाभाविकच घाबरते. तेवढ्यात खरंच तिला चोरांचा फोन येतो. पोलिसांनी सांगितल्यानुसार ती चोर सांगतात ते सगळं करत जाते. आपल्या जवळची सगळी कॅश एका प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून गॅलरीतून खाली फेकून देते आणि घरात लपून बसते.

दुसऱ्या दिवशी ब्लागा पोलिस स्टेशनात जाते तेव्हा तिला कळतं की असा कोणताच फोन क्राइम ब्रँचने केलेला नव्हता. दोन्ही फोन चोरांचेच होते आणि आता आपले सगळे पैसे लुबाडले गेले आहेत. नवऱ्याच्या थडग्यासाठी जागा विकत घ्यायला आता ना तिला कोणी बँक कर्ज द्यायला तयार आहे, ना दुसरा कुठला सनदशीर मार्ग तिच्या समोर आहे. त्यातून तिची गोष्ट ऐकणारे बहुतेक जण, ''असा कसा तू मूर्खासारखा विश्वास ठेवलास'', असं म्हणून तिला वेड्यात काढताहेत.

ब्लागा हताश होते. निराश होते. पण हरत नाही.

एकट्या वृद्धांना हेरून अशा प्रकारे स्कॅम्स करणारी टोळी शहरात काम करतेय आणि त्यांच्यापासून वाचण्यासाठी कोणती खबरदारी घ्यायला हवी हे सांगण्यासाठी पोलिसांतर्फे एक सभा आयोजित केली जाते. त्यात ब्लागाला आपला अनुभव सांगावा लागतो. तिला ते सगळं फार अपमानास्पद वाटतं. मात्र, एक पोलिस आपल्या भाषणात या टोळीच्या कार्यपद्धतीचं वर्णन करतो आणि ब्लागाच्या डोक्यात काहीतरी सटकतं. ही टोळी गॅलरीतून टाकलेले पैसे उचलण्यासाठी भुरट्या चोरांचा वापर करत असतात. असे भुरटे मिळवण्यासाठी वर्तमानपत्रांमधून येणाऱ्या जाहिरातींमध्ये काही ठरावीक शब्दांचा उपयोग केला जातो हे ब्लागाला कळतं आणि ती थेट नाव आणि वय बदलून तशी जाहिरात प्रसिद्ध करते.

थोड्याच दिवसांत तिला फोन येतो आणि पहिलं काम मिळतं. जमिनीवर पडलेलं प्लॅस्टिकचं गाठोडं उचलायचं, त्यातून कमिशनचे पैसे काढून घ्यायचे आणि फोनवर सांगितल्या ठिकाणी आणून फेकून द्यायचं.

ब्लागा हे काम करू लागते.


Date of Posting : 1-1-2024

क्षणभर मनात येतं, एक शिक्षिका अशी गुन्हेगार बनू शकेल का? इतक्या सराईतपणे ते काम करू शकेल का? चुकीची भाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना रागावणारी बाई इतकं चुकीचं वागू शकेल का? मुळात, आपणही चूक करू शकतो, तेही इतकी भयंकर चूक करू शकतो हे ती कसं स्वीकारू शकेल? हे वास्तववादी आहे का?

पण, दिग्दर्शक इतक्या ठामपणे हे वास्तव मांडतो की सगळे प्रश्न मनातल्या मनात विरून जातात. आणि एली स्कॉरचेवा इतक्या कनव्हिक्शनने ब्लागा साकारते की त्यात कुठे खोट काढताच येत नाही. गुन्हेगारांच्या त्या जगात अधिकाधिक रुतत जाणाऱ्या ब्लागाचं शेवटी काय होणार? ब्लागा तिचे गुन्हेगार असलेल्यांचा सूड उगवणार का? आपल्या नवऱ्याच्या थडग्यासाठी हवी असलेली जागा तिला मिळणार का? हे प्रश्न मात्र आपली पाठ सोडत नाही. सिनेमा संपतो तेव्हा या ब्लागाच्या आयुष्यात आपण पूर्णपणे समरस झालेले असतो.

थ्रिलरला आवश्यक असलेली वातावरण निर्मिती, संगीत, प्रसंग या सगळ्यांमधून एक सकस सिनेमा आपल्या समोर साकार होतो. आणि तरीही तो केवळ थ्रिलर राहत नाही. समाजाचा वृद्धांकडे बघण्याचा दृष्टिकोन, त्यांचं एकटेपण, भांडवलशाही जगात त्यांचं हरवून जाणं, आपण या जगाचा भाग आहोत की नाही अशा परिस्थितीतलं त्यांचं जगणं या सगळ्यावर आपली गोष्ट सांगता सांगता दिग्दर्शक भाष्य करत असतो.

'ब्लागाजलेसन्स' चा ट्रेलर पाहायचा असेल तर https://www.youtube.com/watch?v=ZYV7IHZrvY4 या लिंकवर क्लिक करा.

दिग्दर्शक विक्तोर एरिसे यांचा 'क्लोज युवर आइज' मात्र अतिशय वेगळा आहे. या सिनेमाचं सिनॉप्सिस वाचून आपण एक रहस्यकथा पाहायला जाणार, असा ग्रह झाला होता. हुलिओ आरेनास नावाचा स्पॅनिश नट एका सिनेमाचं शूटिंग चालू असताना मध्येच नाहीसा होतो. त्याचं शव मिळत नाही, पण समुद्राजवळच्या कड्यावरून तो पडला आणि मेला असं पोलिस जाहीर करतात. मध्ये बरीच वर्षं लोटतात आणि 'कोल्ड केस मिस्टरीज'चा शोध घेणाऱ्या आणि सनसनाटी निर्माण करणाऱ्या टीव्हीवरच्या कार्यक्रमात हुलिओच्या असं नाहीसं होण्यावर एक एपिसोड करायचं ठरतं. कार्यक्रमाच्या निमित्ताने हा विषय पुन्हा ऐरणीवर येतो. ज्या सिनेमासाठी शूटिंग करत असताना तो नाहीसा झाला, त्या सिनेमाचा दिग्दर्शक मिगेल गराय कार्यक्रमात सहभागी होतो, सिनेमाची चित्रित झालेली शेवटची काही दृश्यं त्यात दाखवली जातात. आणि हुलिओच्या निघून जाण्यावर एक प्रश्नचिन्ह उभं केलं जातं.

पण, ही गोष्ट म्हणजे हा सिनेमा नाही. अजिबातच नाही. किंबहुना, तो त्यानंतरच सुरू होतो. आणि एका संथ लयीत त्याचा प्रवास होतो. या सिनेमाला कादंबरीसारखा ठेहराव आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेला स्वतःचा प्रवास आहे. अगदी छोट्या छोट्या व्यक्तिरेखाही गोष्टीत भर घालतात. त्या शेवटच्या सिनेमातली शेवटची दृश्यं आणि त्या नटाचा शेवट यांच्यामधल्या रिकाम्या जागा मिगेल गराय भरायला निघतो आणि या प्रवासात त्याला कोणकोणते शोध लागतात याची ही गोष्ट आहे.

पण, त्याआधी सिनेमाच्या दिग्दर्शकाविषयी, विक्तोर एरिसे यांच्याविषयी.

एरिसे यांचा जन्म 1940चा. म्हणजे आज त्यांचं वय 83 आहे. 1973मध्ये त्यांनी त्यांचा पहिला सिनेमा दिग्दर्शित केला, 'द स्पिरिट ऑफ बीहाइव्ह'. आजही स्पेनमधल्या सर्वोत्कृष्ट सिनेमांमध्ये याचं नाव घेतलं जातं. 40च्या दशकातल्या ग्रामीण स्पेनचं दर्शन या सिनेमात होतं. फ्रॅन्सिस्को फ्रॅन्को या स्पेनमध्ये सत्तेत

'क्लोज युवर आईज



असलेल्या हुकूमशहाच्या विरोधात सिनेमा करण्याचं धाडस त्या वेळी एरिसे यांनी दाखवलं होतं. त्यासाठी त्यांनी सिम्बॉलिझमचा उपयोग केला आणि आपलं म्हणणं प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याची काळजी घेतली.

त्यांनतर 1983मध्ये प्रदर्शित झालेल्या त्यांच्या 'एल सुर' या सिनेमाचंही खूप कौतुक झालं होतं. 1992मध्ये त्यांनी 'द क्विन्से ट्री सन' नावाची अॅन्तोनिओ लोपेझ गार्सिया या चित्रकारावर केलेली डॉक्युमेंटरी खूप गाजली. त्या वर्षीच्याा 'कान' चित्रपट महोत्सवामध्ये ज्युरी तसंच फिप्रेसीचा पुरस्कार तिला मिळाला.

'द शांघाय स्पेल' या हुआन मार्सेच्या कादंबरीवर एरिसे काम करत होते. त्यावर निघणाऱ्या सिनेमाचं दिग्दर्शनही ते करणार होते. पण, निर्मात्याने दुसऱ्या दिग्दर्शकावर ती जबाबदारी सोपवली. याचा फार मोठा धक्का एरिसे यांना बसला.

त्यानंतर आता तब्बल तीस वर्षांनंतर, त्यांची ही नवीकोरी फीचर फिल्म आलेली आहे. 'क्लोज युवर आइज.'

सिनेमाची सुरुवात होते तेव्हा दुसरं महायुद्ध नुकतंच संपलेलं आहे. फ्रान्समधल्या एका भव्य महालामध्ये राहणाऱ्या 'सॅड किंग'ला आपण पाहतो. त्याची सेवा करत असलेल्या चिनी नोकराला भेटतो. आणि त्याला भेटायला कुणी येणार आहे हे आपल्याला कळतं. हा पाहुणा स्पेनमधल्या डाव्या विचारसरणीचा आहे आणि त्याच्यावर सॅड किंगची एका चिनी बाईपासून झालेली पण आता हरवलेली मुलगी शोधून आणण्याचं काम सोपवण्यात आलंय.

या गोष्टीत आपण रमतोय की काय, असं वाटत असतानाच आपल्या लक्षात येतं की हे सिनेमामधलं दृश्य आहे. हा तो सिनेमा ज्याचं शूटिंग अर्ध्यावर आलेलं असताना हुलिओ अचानक नाहीसा झाला होता.

टीव्हीवरच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या मिगेलच्या डोक्यात पुन्हा एकदा हुलिओचा विचार येऊ लागतो आणि नेमकं काय घडलं हुलिओच्या बाबतीत याचं रहस्य स्वतः शोधायचं तो ठरवतो.

मिगेलचा हा प्रवास म्हणजे 'क्लोज युवर आइज'. इथे तो हुलिओच्या आता मोठ्या झालेल्या मुलीला भेटतो. ती म्हणते, ''मी लहान असताना तो कधी घरी नसायचा. त्यामुळे त्याच्या असण्याची मला सवय नव्हती. माझ्या आठवणीत आहे तो त्याचा आवाज. माझ्यासाठी हा आवाज म्हणजेच माझा बाप होता''.

तरुणपणी मिगेल आणि हुलिओ या दोघांचीही प्रेमिका असलेल्या मार्ताला तो भेटतो.

आणि जुन्या सिनेमांच्या रिळांचं जतन करणाऱ्या आपल्या एका मित्रालाही.

या सगळ्यांच्या बोलण्यामधून काही सूत्र सापडतंय का याचा मिगेल शोध घेत असताना आपण कधीतरी समुद्राकाठी असलेल्या मिगेलच्या घरी पोहोचतो. घर म्हणजे वाळूत बांधलेल्या खोल्या. आणि एक कुत्रा. आणि दोन शेजारी. रोज संध्याकाळी त्यांच्याशी मारलेल्या गप्पा, म्हटलेली गाणी... हे आयुष्य कसं अगदी निवांत.

पण, या निवांतपणामध्येही काहीतरी अधुरं आहे, मनाला कुरतडणारं आहे याची जाणीव आपल्याला कायम होत राहते. सिनेमाभर वापरलेल्या रंगांमधून, संगीतामधून आणि मिगेलच्या एकूणच असण्यामधून.

सिनेमाचा शेवट एका जुन्या, वापरात नसलेल्या थिएटरमध्ये होतो. त्या अर्धवट राहिलेल्या सिनेमाची काही रिळं दाखवून. हुलिओच्या नाहीसं होण्याचं रहस्य उलगडतं खरं, पण म्हणून या गोष्टीला क्लोजर मिळालंय असं वाटत नाही.

एक प्रकारे सिनेमातल्या दिग्दर्शकाच्या माध्यमातून एरिसेने तीस वर्षं आपल्या स्वतःच्या या क्षेत्रात नसण्याचा घेतलेला हा शोध आहे का? स्वतःच्या सिनेमाविषयी ते काही विधान करू पहाताहेत का? म्हातारपण, म्हातारपणातल्या आठवणी, मृत्यू यांबद्दलचं हे त्यांचं चिंतन आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, क्लोज युवर आइज म्हणताना त्यांनी स्वतःच्या कारकिर्दीचा हा शेवट असल्याचं सूचित केलंय का?

माहीत नाही. पण, तीन तास लांबीचा हा सिनेमा आपल्याला एका वेगळ्या जगात नेतो, विचार करायला लावतो आणि संपल्यानंतरही बराच काळ मनात रेंगाळत राहतो एवढं नक्की.

सिनेमाचा ट्रेलर पाहायचा असेल तर https://www.youtube.com/watch?v=HiYbhk21AAc या लिंकवर क्लिक करा.

**मीना कर्णिक,** मुंबई
meenakarnik@gmail.com
Mob. 9819767518


Date of Posting : 1-1-2024

राजन हर्षे व पंडित विद्यासागर

# ‘पक्षी उन्हाचा’ या पुस्तकाच्या निमित्ताने चर्चा

**प्रश्न :** हर्षे सर, गेली 50 वर्षं तुम्ही इंग्रजीमधून लेखन केलेलं आहे. मुख्यतः तुम्ही शास्त्रीय पद्धतीचं, संशोधनात्मक लेखन केलेलं आहे. आणि आता पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावर तुम्ही पुन्हा मराठीमध्ये इतकं महत्त्वाचं पुस्तक लिहिलं. त्याची थोडी पार्श्वभूमी सांगू शकाल?

**डॉ. राजन हर्षे :** इंग्रजीमध्ये मी पुष्कळ लिहिलं. ती सरावाची भाषा झाली होती. अनेक नियतकालिकं, वेबसाइट्स यांत माझं लेखन प्रसिद्ध झालं. इंग्रजीत माझ्या संशोधनात्मक लेखनाची पुस्तकंही प्रकाशित झाली. पण, जितकं चांगलं मराठीमध्ये मला लिहिता येतं तितकं अन्य कुठल्याही भाषेत येत नाही. मला फ्रेंच बोलता येते, इंग्रजी, हिंदी येते. पण मराठीइतकी चांगली कुठलीच भाषा मला बोलता येते, असं मला वाटत नाही. एके काळी मी मराठीत लिहीतही असे. 1968-69च्या दरम्यान ‘साधना’मध्ये माझे काही लेख प्रसिद्ध झाले आहेत. पण, पुढे इतकी वर्षं महाराष्ट्राबाहेर वास्तव्य झाल्यामुळे माझा मराठीशी संबंध तुटला. माझ्या घरातही मराठीपेक्षा जास्त कानडी बोलली जाते. पण, मराठीशी कुठल्या ना कुठल्या कारणाने संबंध येत होता. त्यामुळे आपण आपल्या प्रांतात, आपल्या लोकांत परत जावं असं मला वाटत होतं. घरट्यात परत यायचा मी प्रयत्न करत होतो. मराठी हे त्याचं महत्त्वाचं माध्यम होतं, म्हणून मी पुन्हा मराठीत लिहायला सुरुवात केली. पण, त्या सगळ्या प्रक्रियेला चालना विनोद शिरसाठ यांच्याकडून मिळाली. आम्ही पहिल्यांदा भेटलो ते एकमेकांना समजून घेण्यासाठी, एकमेकांचे मित्र होण्यासाठी. पण माझ्या पॅशनेट किंवा ओब्सेसिव्ह स्वभावामुळे मी सगळ्या विषयांवर अगदी मनापासून त्यांच्याशी बोललो. ते म्हणाले, “तुम्ही यावर काहीतरी लिहायला लागा”. तेव्हा निदान एक-दोन लेख तर लिहून बघू मग पुढे ठरवू, असं मी ठरवलं. पण हे निष्णात संपादक आहेत. त्यांच्या जाळ्यात मी अडकत गेलो. अशी दुसरी एकच व्यक्ती मला माहीत आहे ती म्हणजे, ‘ईपीडब्ल्यू’चे संपादक कृष्णराज. ते जिवंत असताना मी ईपीडब्ल्यूमध्ये जवळजवळ 26 वर्षं नित्यनेमाने लिहीत होतो. एक-दोन लेख लिहिल्यानंतर विनोद शिरसाठ आणि माझी मैत्री झाली. ते नेहमी मला म्हणायचे की, आता आणखी काहीतरी नवीन द्या. हा असा दुसरा संपादक आहे, ज्याच्यासाठी मी काही लिहिलं नाही तर मलाच मनातून अपराधी वाटायचं.

राजन हर्षे लिखित ‘पक्षी उन्हाचा : सात विद्यापीठांच्या आवारात’ या साधना प्रकाशनाच्या पुस्तकावरील चर्चेचा कार्यक्रम, नॅशनल नॅशनल बुक ट्रस्ट आयोजित पुणे बुक फेस्टिवलमध्ये, फर्ग्युसन कॉलेजच्या मैदानावर, 21 डिसेंबर 2023 रोजी दुपारी ठरलेला होता. मात्र एनबीटीने ऐनवेळी तो कार्यक्रम रद्द केला, तेव्हा त्याचा निषेध करून तो कार्यक्रम साधना प्रकाशनाने 22 डिसेंबर 2023 रोजी सकाळी, पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात घडवून आणला. त्या सभागृहात झालेली ही चर्चा आहे. डॉ. सतीश बागल हे आणखी एक नियोजित वक्ते आजारी असल्याने त्या दिवशी येऊ शकले नाहीत, मात्र त्यांचा बारा मिनिटांचा व्हिडिओ त्यावेळी दाखवण्यात आला. तो व्हिडिओ आणि या संपूर्ण मुलाखतीचा व्हिडिओ साधनाच्या यूट्यूब चॅनलवर उपलब्ध आहे. तो कार्यक्रम रद्द कसा झाला त्याची गोष्ट सर्व तपशीलांसह मागील अंकाच्या संपादकीयामध्ये सांगितलेली आहे.

म्हणून मी आपलं त्यांचं काम करून रिकामा व्हायचो! शिवाय, आतून काहीतरी उर्मी होतीच. कशाचंतरी दुःख होतं, कशाचातरी आनंद होता.

विद्यापीठामध्ये सगळ्या प्रकारची माणसं भेटतात. तिथे चांगली, विद्वान माणसंही असतात आणि काही अतिशय गर्विष्ठ आणि क्षुद्र मनोवृत्तीचेही असतात. हार्वर्ड विद्यापीठामध्ये किसिंजर होता, तेव्हाचा त्याचा एक अनुभव आहे. फॅकल्टीमधले लोक एकमेकांशी लढाया का करतात, याचं साधं वर्णन त्यांनी केलेलं आहे, ''stakes are very low but fights are so fierce.'' किरकोळ गोष्टींवरून ते भांडत बसतात, कारण आपण कोणीतरी महान आहोत आणि बाकीचे मूर्ख आहेत असंच सगळ्यांना वाटत असतं. हेच ॲकॅडमिकचं पहिलं लक्षण असतं. मीही तसं करत असेन कदाचित! एकंदर, विद्यापीठांमध्ये मला जे काही बरे-वाईट अनुभव आले त्यावर लिहावं असं मला वाटलं.

याशिवाय मला सगळ्यात मोठा धक्का वाटत होता, तो संस्था कोसळण्याचा. देशातल्या सगळ्या चांगल्या संस्था एकामागोमाग एक कोसळत आहेत, त्याच्याबद्दल आपण काहीतरी केलं पाहिजे, लिहिलं पाहिजे, असं मला वाटलं. संस्था कोसळायला लागल्या तर नागरिक आणि राज्य यांच्यामध्ये काहीच उरणार नाही. न्यायपालिकेचं काम समाधानकारक नाही, संसदेचं काम बंद आहे आणि विद्यापीठांची स्थिती खालावलेली आहे; अशी काळजी मला संस्थांबद्दल होती आणि विद्यार्थ्यांबद्दलही होती. हे लिहिण्याचं दुसरं एक कारण आहे, जे लोकांना आवडणार नाही- पण ते प्रामाणिक आहे. गुणवत्तेची कोणतीही कदर आपल्याला वाटेनाशी झाली आहे ही अगदी दुःखाची गोष्ट आहे. गुणवान माणसांना तुम्ही क्रूरपणे वागवत असाल तर तुम्ही कसे मोठे होणार? ही गोष्ट मला अनेक तऱ्हेने सांगायची इच्छा झाली.

आपण विद्यापीठांमध्ये जे अभ्यासक्रम तयार करतो, जे शिकवतो त्याचा समाजाशी काय संबंध आहे याच्यावर आपण विचार करतो का? हेही मला विचारायचं होतं. एखाद्या कोर्समध्ये आपण पाच हजार विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञान शिकवायला लागलो, तर ते बरोबर होईल का? तत्त्वज्ञान हा विषय महत्त्वाचा आहे, तो शिकलाच पाहिजे. कदाचित, अनिवार्यसुद्धा असायला हवा. पण त्याचं प्रमाण किती? समाजाला काय पाहिजे, आपण काय देऊ शकतो याचा समतोल राखला पाहिजे. क्वालिटी आणि क्वांटिटी यांच्यामध्ये समतोल कसा निर्माण करता येईल याच्यावरही आपल्याला विचार करायला पाहिजे.

तरुणाईकडे आपण प्रचंड दुर्लक्ष करत आहोत. एके काळी अब्दुल कलाम म्हणायचे की, डेमोग्राफिक डीव्हिडंट आपण मिळवणार. ते तर आता कुठल्या कुठे गेलं आहे. याचं प्रचंड दुःख मला आतून होत होतं. म्हणून मी ठरवलं की, अतिशय परखडपणे आपण आपले विचार मांडायचे. पण, या पुस्तकात कोणावर व्यक्तिगत टीका नाही, पॉलिसीजवर जरूर केलेली आहे.

**प्रश्न :** विद्यासागर सर, तुम्ही 40 वर्षं शास्त्रज्ञ म्हणून, कुलगुरू म्हणून काम केलेलं आहे. एका कुलगुरूंनी लिहिलेलं त्यांच्या कारकिर्दीविषयीचं पुस्तक - कार्यकथन असा शब्दप्रयोग त्याच्यासाठी केलेला आहे - त्यातलं तुम्हांला काय भावलं?

**डॉ. पंडित विद्यासागर :** पुस्तक वाचताना मी त्यात गुंतत गेलो. अनेक मुद्दे त्यात प्रभावीपणे पुढे येतात. या पुस्तकाचं शीर्षक समर्पक आहे. याच्यामध्ये काव्यात्मकता आहे, विस्तृतता आहे, सर्वसमावेशकता आहे. ऊन देताना सूर्य कुणावर भेदभाव करत नाही. ती भावना सरांच्या लिखाणामध्येही जाणवते. पुण्याचं सुरेख वर्णन त्यात आहे. पुण्यामध्ये आपण शिक्षणसंस्थेबाहेरही खूप शिकतो. त्या प्रकारची व्यक्तिमत्त्वं इथे आहेत, कार्यक्रम आहेत, संस्था आहेत. हर्षे सरांनी पुण्याविषयी लिहिलेलं आहे. त्यातून हा ॲम्बियन्स खूप चांगल्या पद्धतीने आपल्यापर्यंत पोहोचतो. त्यांनी त्यांच्या गुरूविषयी लिहिलं आहे, माझाही अनुभव त्या बाबतीत बराचसा तसाच आहे; किंवा तो अनेकांचा आहे. हे असं का होतं? आपण लहानपणापासून गुरूविषयी अवास्तव कल्पना करून देतो. 'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु..' इथूनच सुरुवात होते. पण तोही एक माणूस असतो याचा आपण कधी विचार करत नाही किंवा तसं शिकवलं जात नाही. एकदा मी एका श्लोकामध्ये 'परमेश्वराचं दक्षिण मुख मला नित्य दिसो', असं वाचलं. (दक्षिण म्हणजे उजवं.) म्हणजे परमेश्वरामध्येही काहीतरी डावं आहे! मग आपण तर माणसं आहोत. आपल्या संस्कारांमध्येच हे न्यून आहे. भावनेच्या भरात मुलांना आपण हे शिकवतो आणि पुढे मुलांचा भ्रमनिरास होतो. एखाद्या शिक्षकाचं


Date of Posting : 1-1-2024

(गैर अर्थाने) माणूसपण जागं होतं त्या वेळी त्याचा त्रास विद्यार्थ्यांना व्हायला लागतो. सरांनी लिहिलं आहे तसं गुरूबद्दल लिहायला लोक सहसा धजावत नाहीत. अर्थात, अशा गुरूंची उदाहरणं आपल्याला इतिहासातही सापडतात. द्रोणाचार्यांनी काय केलं हे आपल्याला माहीत आहे, पण आपण याची चर्चा कधी करत नाही. कारण गुरूला आपण खूप वरच्या दर्जाचे मानतो. काही प्रमाणात ते योग्यही आहे. पण, वास्तवाचंही भान - निदान उच्च शिक्षणाच्या स्तरावर तरी राखलं पाहिजे. या काही मुद्द्यांमुळे मी त्या पुस्तकांमध्ये गुंतत गेलो.

**प्रश्न :** हर्षे सर, तुम्ही तुमचे गुरू अनिरुद्ध गुप्ता यांच्याविषयी एक प्रकरण पुस्तकात लिहिलेलं आहे. एक विलक्षण गुरू आणि एक विलक्षण शिष्य, असं तुमचं नातं आहे. तुम्ही त्यात लिहिलं आहे की, अजूनही तुम्हांला त्यांची आठवण येते, त्यांच्याशी बोलावंसं वाटतं, वादविवाद करावासा वाटतो. नेमकं काय प्रकारचं तुमचं नातं होतं? आणि अजूनही ते वेगळ्या प्रकारे कसं काय टिकून राहिलं आहे?

**डॉ.हर्षे :** या विषयावर बोलणं खूप अवघड आहे. ते प्रकरण मी कसं काय लिहू शकलो हे माझं मलाच माहीत नाही. आम्ही गुरू-शिष्य होतो. मला त्यांच्यामुळे प्रचंड स्फूर्ती मिळाली यात वादच नाही. कसं लिहायचं, स्वतःचं सगळं लिखाण किती वेळा नापसंत करायचं हे मी त्यांच्याकडूनच शिकलो. कुठलंही भाषण कसं ऑर्गनाइज करायचं हेही मी त्यांच्याकडूनच शिकलो. प्रसंगी चांगले लेख आल्यानंतर त्यांच्याकडून पाठ थोपटली जात असे तेव्हा मला आनंद होत असे. आमच्या मैत्रीला, गुरू-शिष्याच्या नात्याला अनेक तऱ्हेचे पदर होते त्यामुळे ते शब्दांत मांडणं फार अवघड आहे. आम्हां दोघांना काव्याचा नाद होता, पोलिटिकल फिलॉसॉफी वाचायची सवय होती. पण, दुर्दैवाने त्यांच्या स्वभावामध्ये एक दुष्टपणा होता. त्याचा मला त्रासही झाला. ते मी लिहिलं आहेच. पुढे मी हैदराबादला गेलो, ते दिल्लीत राहिले. तेव्हा आमचे संबंध खूपच सुधारले. कारण त्यांनी मला 'जेएनयू'मधून घालवून दिलं होतं. त्यानंतर मात्र ते माझी खूप स्तुती करत असत. "माझा सगळ्यात चांगला विद्यार्थी राजनच आहे", असं ते म्हणत. माझ्या लेखांवर चांगल्या प्रतिक्रिया देत. हैदराबादच्या माझ्या सहकाऱ्यांनी मला खूप त्रास दिला. माझ्या इंटिग्रिटीवर प्रश्नचिन्ह उभं राहिलं. तेव्हा मी कुलगुरूंना पत्र लिहिलं की, माझ्यावर तुम्ही चौकशी समिती नेमा. त्यातूनही मी सहीसलामत सुटलो. माझ्यावर एक कोर्ट केस झाली, ती सहा वर्षं चालली आणि सहा वर्षांनी न्यायाधीशांनी सांगितलं की, हा मनुष्य प्रामाणिक आहे. पण, ते ऐकायला मला सहा वर्षं लागली! या सगळ्या प्रकरणांमध्ये अनिरुद्ध गुप्ता माझ्याशी फार प्रेमाने वागले. ते मला म्हणायचे की, Mediocres are ganging up against you.

पण, माझं एक महत्त्वाचं पुस्तक एका मोठ्या प्रकाशकाकडून आलं. त्याच्याविषयी मी त्यांच्याशीच आधी अनेक वेळा चर्चा केली होती. 'Twentieth century imperialism : shifting contours and changing conceptions.' ते आल्यावर मात्र त्यांना वाईट वाटलं. 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये त्यावर पहिल्यांदा लिहून आलं ते परीक्षण धक्कादायक होतं. त्या व्यक्तीला ते पुस्तक समजलंच नव्हतं. ते परीक्षण वाचून त्यांना थोडं बरं वाटलं. पण, त्याच्यानंतर जगभरात सलग 25-30 चांगली परीक्षणं आली. त्यामुळे ते जिथे जातील तिथे त्या पुस्तकावरून माझी स्तुती होत असे. त्याचा त्यांना आतून थोडा त्रास व्हायला लागला. ते पुस्तक मी लिहिलं, हा भुंगा अनिरुद्ध गुप्ता यांच्या डोक्यात कायम होता. त्या पुस्तकाला कोणी चांगलं म्हटलं की, ते दुःखी व्हायचे. पुढे मी कुलगुरू झाल्यानंतर त्यांना आणखी थोडं दुःख झालं. हा मनुष्यस्वभाव आहे. छोट्या छोट्या ईर्ष्या-असूयांमधून माणसं वर येत नाहीत.

पण, हा मनुष्य चांगलं लिहिणारा आहे, असंही त्यांना माझ्याबद्दल वाटायचं. एकदा 'यूजीसी'मध्ये माझ्यावरून काहीतरी वाद झाला तेव्हा ते म्हणाले, "माझं आणि त्याचं अलीकडे हाडवैर जरी असलं तरी मी इतका हलकट नाही की तो चांगला एक्स्पर्ट आहे असं म्हणणार नाही." पण ते हाडवैरही त्यांच्या बाजूने होतंच. मला त्यांच्याबद्दल फार प्रेम वाटायचं. त्यांचा क्रिटिसिजमही इतका सुंदर असायचा की, तो वाचून मला पुन्हा लिहावंसं वाटायचं. 'India's non alignment and attempt at conceptual reconstruction' असा एक लेख मी लिहिला होता. त्यावर त्यांनी माझ्याशी जाहीर भांडण घेतलं. World the stage, India the actor and non-alignment the script असं म्हणून त्यांनी

त्याचा प्रतिवाद केला होता. अशा आमच्या जाहीर लेखी लढायाही खूप झाल्या. ते गेल्यानंतर मला खूप त्रास झाला. मी त्यांच्यावर खूप चांगला स्मृतिलेखही लिहिला होता. अजूनही ते माझ्या सोबत असतात. कारण त्यांनी मला विचार करण्याची पद्धत (method of thinking) आणि संशोधनाची शिस्त (discipline in research) दिली, त्यातून मी माझी पद्धत निर्माण केली. आणि आम्ही दोघांनी जी पद्धत निर्माण केली त्यातून मी संकल्पसारख्या विद्यार्थ्यांना शिकवलं. त्यामुळे आता मी किंवा गुप्ता दोघेही या जगात नसलो तरी दोघेही जिवंतच असू; कारण संकल्पसारख्या विद्यार्थ्यांकडे ते सगळं आता आहे. जगात गुरू आणि शिष्याचं नातंच असं आहे की, गुरूही कधी मरत नाही आणि शिष्यही कधी मरत नाही. दोघेही पुढे चालत राहतात. मॉडर्न हायस्कूलमध्ये बी. आर. देशपांडे नावाचे शिक्षक मला शिकवायला होते. त्यांचाही उल्लेख मी माझ्या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणामध्ये केलेला आहे. इतिहास का लिहिला जातो, त्याचा अर्थ काय हे ते उत्तम शिकवायचे. त्यांनी इतिहास शिकवताना अनेक प्रयोग केले. आजसुद्धा मला त्यांची आठवण येते. ते कसं शिकवायचे हे मी जगातल्या अतिशय उत्तम इतिहासकारांना सांगितलं आणि त्यांनी शिकागोला त्याचा उपयोग करायला सुरुवात केली. 'Nothing is more powerful than an idea whose time has come.' असं व्हिक्टर ह्युगो म्हणायचा. देशात आर्थिक सुधारणा होत होत्या तेव्हा मनमोहन सिंग म्हणाले की, the idea of reforms has come and we have to undergo reforms. त्यामुळे गुप्ता गेले तरी आमचे वाद एकमेकांत चालूच असत.

**प्रश्न :** सर, विविध प्रकारची माणसं तुम्हांला विद्यापीठामध्ये प्रशासक म्हणून हाताळावी लागतात. प्राध्यापक, त्यांचे इगो यांना कसं हाताळलं जातं?

**डॉ.विद्यासागर :** 'Care for the process, don't look at the person' हे माझं तत्त्व आहे. माणूस कोण आहे यापेक्षा, त्याचा प्रश्न काय आहे, त्याला काय हवं आहे याच्याकडे लक्ष दिलं तर बरेचसे प्रश्न सुटू शकतात. विद्यार्थ्यांच्या बाबतीतही असंच होतं. विद्यार्थी संघटना आणि त्यांचे प्रतिनिधी यांच्या बाबतीतही अनेक कंगोरे असतात. ते जे बोलतात ते फक्त वरवरचं असतं, त्याच्या मागचा उद्देश वेगळाच असतो. तो समजून घेतला तर आपण त्या माणसाशी योग्य व्यवहार करू शकतो. काही तोंडावर स्तुती करतात आणि मागे त्यांचं वेगळंच मत असतं, तर काही उलटही असतात.

बीसीयूडी (Board of College and University Development) डायरेक्टर म्हणून काम पाहत असताना, सर्व महाविद्यालयं आणि विद्यापीठांचे सगळे विभाग यांचं ॲकॅडेमिक्स मीच पाहायचो. तेव्हा मला असं दिसलं की, शिक्षकांची संख्या ज्या विभागामध्ये कमी– तिथे सगळ्यात जास्त वादंग. रिकामा वेळ जिथे असेल तिथे खूप भांडणं असायची. त्यामुळे विज्ञान शाखेमध्ये कमी भांडणं होती. सामाजिक शास्त्रे आणि कला विभागांमध्ये अगदी क्षुल्लक कारणांवरून भांडणं असायची. एवढ्या पदव्या घेतलेले लोक इतक्या किरकोळ कारणावरून भांडतात याचं मला आश्चर्य वाटायचं आणि ती सोडवायला ते माझ्याकडे यायचे. काही विभागांमध्ये इतकी भांडणं असायची कि ती पाहून वाटायचं, तुम्ही तत्त्वज्ञान शिकता की नक्की काय शिकता? आपण उच्च शिक्षित होतो, तेव्हा आपण सुशिक्षित होतोच असं नाही. उलट वर्तमानाबद्दल आपण जास्तीतजास्त बालिश होत जातो की काय, असं मला वाटतं. त्यामुळे अशा लोकांशी व्यवहार करताना आपण आपल्या मुलांशी जसं वागतो तसं करावं लागायचं. त्याचं कधीकधी वाईटही वाटायचं. कुलगुरू म्हणजे सगळ्या प्रश्नांचं उत्तर! खरं तर त्यांच्याकडेच सगळी उत्तरं असतात; पण, ते कुलगुरूपाशी येऊन शोधायचं आणि त्याला त्रास द्यायचा, ही मानवी प्रवृत्ती आहेच.

शिक्षक कधीकधी अनावश्यक गोष्टींनाही चालना देतात. मी नांदेडला नुकताच गेलो होतो. तेव्हा कुणाचीतरी जयंती साजरी होत होती. तेव्हा मी विचारलं की, यासाठी मुलांकडे एवढा पैसा कुठून आला? विद्यापीठाने तर दिले नाहीत? तेव्हा कळलं की, तो शिक्षकांनी दिला. मग मी शिक्षकांना बोलवून विचारलं की, तुम्ही का वर्गणी दिली? तेव्हा मला उत्तर मिळालं, "ती द्यावीच लागते". "पुण्यात तर कुठल्याही विद्यार्थ्याने मला वर्गणीसाठी विचारण्याचं धाडस केलं नाही. इथे ही काय पद्धत आहे?" असं मी म्हटलं. अशा अनेक गोष्टी असतात, त्या समजून घेऊन तुम्हांला त्यांच्याशी वागावं लागतं.

मनुष्यस्वभाव तर खूप विचित्र आहे. एक उदाहरण सांगतो. एक बाई होत्या. त्या खूप हुशार होत्या. त्यांची


Date of Posting : 1-1-2024

पुस्तकंही चांगली होती, पण त्यांना 'रीडर'चं प्रमोशन मिळालं नाही. मग त्यांनी अपील केलं, ते फेटाळलं गेल्यावर त्या राज्यपालांकडे गेल्या, तिथेही ते फेटाळलं गेलं. तरीही सतत न्यायालय-राज्यपाल असं त्यांचं चाललंच होतं. मी कुलगुरू म्हणून तिथे गेल्यावर त्यांची बाजू पाहिली. ती अजिबात बरोबर नव्हती. जे झालं होतं, ते योग्यच होतं. हे मी राज्यपालांना पटवून दिलं, त्यांनीही ते मान्य केलं. नंतर त्या मला भेटायला आल्या. मी त्यांना म्हटलं, "तुम्ही तुमच्या वडिलांना घेऊन या." मग मी त्यांना म्हटलं की, तुम्हांला एवढंच करायचं आहे का आयुष्यभर? तुमच्यामध्ये इतक्या क्षमता आहेत, तुम्ही चांगल्या गोष्टी करू शकता. आज ना उद्या बढती मिळेलच. एकदा मिळालं नाही म्हणून नंतर मिळणार नाही असं नाही. तुम्ही हे सगळं सोडून द्या आणि तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करा. सुदैवाने, त्यांनी ते ऐकलं. आता त्यांनी खूपच चांगलं काम केलेलं आहे.

मी नांदेडला गेलो तेव्हाच मी आधी सगळ्या शिक्षकांना भेटून विचारलं की, तुम्ही आधी काय करत होता, आत्ता काय करत आहात आणि पुढे काय करणार आहात हे मला सविस्तर सांगा. त्यात मला काही चांगले लोक सापडले, जे त्या वेळी काहीच करत नव्हते. "क्षमता असूनही तुम्ही काहीच का करत नाही?" या माझ्या प्रश्नावर त्यांनी कारणं द्यायला सुरुवात केली. "कारणं देणं सोडून द्या आणि उद्यापासून कामाला लागा", असं मी त्यांना बजावलं. त्यात एक शिक्षक होते, त्यांनी एका वर्षात 'नेचर'मध्ये पेपर लिहिला. नांदेडमध्ये राहून हे करणं अवघड होतं. पुढे ते पुणे विद्यापीठामध्ये आले. माणसांना हाताळायचं म्हणजे त्यांचे प्रश्न समजून घ्यायचे आणि त्याच्या पलीकडे जाऊन मुलांना जसं सांभाळतो तसं करायचं हे करावं लागतं. खरं म्हणजे हे करायला लागू नये...

**प्रश्न :** हर्षे सर, एखाद्या व्यक्तीमध्ये 'प्रोफेसरिअल क्वालिटी' आहे किंवा नाही हा कायमच तुमच्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. ही प्रोफेसरिअल क्वालिटी नेमकी असते काय? प्राध्यापकांकडून नेमकं काय अपेक्षित असतं?

**हर्षे :** अगदी सामान्य शब्दांत सांगायचं तर प्राध्यापकामध्ये 'रेंज' असते. पुष्कळ तऱ्हेचं वाचायची आणि पचवायची क्षमता असली पाहिजे. तसंच 'डेप्थ' आणि 'पावर ऑफ ॲनॅलिसिस' असली पाहिजे. Range, Depth and Power of analysis, that makes a professor. Range means you can cut across disciplines and read what you want to read. 'डेप्थ' ही सततच्या वाचनातून आणि चिंतनातून येते. पॉवर ऑफ ॲनॅलिसिस तुमच्या ॲनॅलिटिकल कपॅसिटीवर ठरते.

आपल्याकडे काही प्रोफेसर कारकुनी मानसिकतेचे असतात आणि उलट चांगले असिस्टंट प्रोफेसर प्रोफेसरिअल असतात. त्यांच्याकडे प्रतिभा असते. शिक्षणक्षेत्रामध्ये बहुसंख्य लोक सुमार दर्जाचे असतात. त्याच्यामुळे एखादा असिस्टंट प्रोफेसर - जो तल्लख बुद्धीचा असतो - त्याला त्रास होतो. भारतातल्या शिक्षणक्षेत्रावर एकाने संशोधन केलेलं आहे. त्याच्या मते, प्रत्येक विभागामध्ये असे एक-दोन लोक असतात, त्यांच्याविषयी तुम्हांला काही करता येत नाही. पाच लोक सुमार दर्जाचे असतात आणि त्यांना तसं असण्यातच आनंद असतो. दोन लोक तल्लख असतात. कुलगुरुपदावरच्या व्यक्तीला असं सगळ्यांना सांभाळावं लागतं. गंमत म्हणून एक उदाहरण सांगतो. आमच्याकडे प्रोफेसरिअल क्वालिटीज असलेला एक असिस्टंट प्रोफेसर होता. त्याचा डीन मात्र अगदीच बेताचा होता. त्या असिस्टंट प्रोफेसरला अमेरिकेत एका परिषदेसाठीचं आमंत्रण आलं. त्याचा सगळा खर्च तेच देणार होते. पण त्याच्या डीनने लिहून दिलं, 'परीक्षेचे दिवस आहेत आणि मला याची पर्यवेक्षक म्हणून गरज आहे.' मग तो कसा जाईल? तेव्हा मी माझा अधिकार वापरून सांगितलं की, हा या विद्यापीठाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. आपल्या विद्यापीठातलं कुणीतरी एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निमंत्रित आहे व त्याचा खर्चही ते करणार आहेत. तेव्हा त्यांना जाऊ द्या. डीनने विचारलं, "मग पर्यवेक्षण (invigilation) कोण करील?" त्यावर मी म्हटलं की, त्यासाठी मी तिथे येतो, पण त्याला जाऊ द्या.

केम्ब्रिज विद्यापीठामध्ये एक सुमार दर्जाचा मनुष्य आला होता, रसेल तिथे होता. त्याने 'असा मनुष्य या विद्यापीठामध्ये येऊच कसा शकतो', यावर पानभर लिहिलं आहे. आता अशी परिस्थिती आहे की, सर्व विद्यापीठांमध्ये असलीच माणसं असतात, एखादाच कोणी तरी 'ब्राइट' निघतो. विद्यापीठामध्ये ज्याला


Date of Posting : 1-1-2024

सगळ्यात जास्त वाईट वागवलं जातं, तो नेहमी प्रोफेसरिअल असतो! त्याचं आउटपुट चांगलं असतं, त्याला शिकवता चांगलं येतं, विद्यार्थी खूश असतात. जेव्हा लोकांना त्याचा त्रास होतो तेव्हा ते काहीतरी खुसपट काढतात, आत्मपरीक्षण मात्र करत नाहीत.

अलाहाबाद विद्यापीठ हे अतिशय प्रतिष्ठित विद्यापीठ आहे. अनेक मोठाले नेते तिथे शिकलेले आहेत. मेघनाद सहाय, हरिवंशराय बच्चन, फिराक गोरखपुरी अशी माणसं जिथे निर्माण होतात तिथे आता काम न करणारी माणसं पाहून वाईट वाटतं. पुष्कळदा माणसं आपल्या चांगल्या भूतकाळाबद्दलच बोलत असतात. पण, मुंगीला एव्हरेस्टवर बसवून ठेवलं म्हणून मुंगीचा हत्ती होतो का? छोटी माणसं नेहमी छोटीच राहतात. विद्यापीठांमध्ये धाडसी, ध्येयवादी, पराक्रमी माणसं पाहिजेत; ती त्याग करायला तयार असली पाहिजेत; खरं बोलायला त्यांना लाज वाटता कामा नये. प्रोफेसर असा असला पाहिजे. जॉइंट सेक्रेटरीच्या, नेत्याच्या पुढे-मागे करतो त्याला प्रोफेसर कसं म्हणावं?

**प्रश्न :** या पुस्तकाच्या सगळ्या प्रकरणांमध्ये एक समान धागा आहे. तो म्हणजे, शिकवण आणि संशोधन याच्या मधला समतोल. विद्यापीठाच्या प्रशासनाकडून येणाऱ्या जबाबदाऱ्या, प्राध्यापकांना करावी लागणारी कामं आणि प्राध्यापकांचा मूळ संशोधनाचा पिंड किंवा त्यांची शिकवण्याची आवड हा समतोल कसा नेमका साधला जातो?

**विद्यासागर :** आपण भारतातल्या उच्च शिक्षणाचा विचार करतो, तेव्हा त्यामध्ये अनेक प्रकारची विद्यापीठं येतात. केंद्रीय विद्यापीठं, राज्य विद्यापीठं, अभिमत विद्यापीठं, खासगी विद्यापीठं... आणि आता क्लस्टर विद्यापीठंही आहेत. केंद्रीय विद्यापीठांची विद्यार्थिसंख्या मर्यादित असते, शिकवण्याचा ताण कमी असतो, त्यांना निधी चांगला उपलब्ध असतो, सोयी असतात. तिथे जास्त चांगल्या पद्धतीने संशोधन होणं अपेक्षित आहे. राज्य विद्यापीठांमधल्या काही विद्यापीठांमध्ये - जसं पुणे विद्यापीठामध्ये - एक परंपरा होती. त्या काळामध्ये तिथे 'वर्कलोड'चा बाऊ नव्हता. शिक्षकांची संख्याही चांगली होती. त्यामुळे संशोधन आणि शिकवणं यांचा समतोल होता. तिथे भौतिकशास्त्र विभागामध्ये मी 30 वर्षं काम केलं. आमच्या विभागामध्ये हा समतोल चांगला होता कारण वर्कलोड अवाजवी नव्हता. आता परिस्थिती खूप बदललेली आहे. राज्य विद्यापीठाचे प्रश्न केंद्रीय विद्यापीठांहून वेगळे आहेत. संलग्नित महाविद्यालयांचं दायित्व त्या विद्यापीठांवर असतं. हे सगळं सांभाळून तिथे संशोधन करायचं असेल तर योग्य ते स्वातंत्र्य मिळालं तरच शक्य असतं. पूर्वी विद्यापीठांमध्ये इतकी स्वायत्तता होती की, सरकारी अधिकारी तिथे हस्तक्षेप करू शकत नव्हता. अलीकडच्या काळामध्ये हे स्वातंत्र्य कमी-कमी होत चाललेलं आहे. प्रशासकीय वरचश्मा वाढतो आहे. एखादा प्रशासकीय अधिकारी दोन महिने एखाद्या विद्यापीठाचा इन्चार्ज झाला की, तो शिक्षणावर अधिकारवाणीने बोलू लागतो. कुलगुरूसुद्धा स्वतःचं स्थान आणि स्वायत्तता टिकवण्यासाठी प्रयत्न करत नाहीत असं दिसतं. या सगळ्याचा परिणाम शिक्षकांवर होतो. त्यांचं स्वातंत्र्य संकुचित होतं. विद्यापीठातल्या शिक्षकाला बायोमेट्रिक करावं लागत असेल, तर त्याला काय स्वातंत्र्य राहिलं? मी नोकरी करत होतो, तेव्हा असं काहीच नव्हतं. माझ्या वेळापत्रकाप्रमाणे येऊन तास घेतले की, मी माझं माझं काम करायला मोकळा होतो. ते स्वातंत्र्य कमी होत चाललं आहे. अनावश्यक बंधनं आणि सरकारी हस्तक्षेप कमी व्हायला हवा.

याला दुसरीही बाजू आहे. मी एका सरकारी अधिकाऱ्याबरोबर यावर चर्चा केली. तेव्हा ते म्हणाले, "विद्यापीठं काहीच करत नाहीत. मग आम्हांला करावं लागतं." विद्यापीठाने आपली कामं व्यवस्थितपणाने केली तर सरकारी हस्तक्षेप अजिबात होत नाही हा माझा पाच वर्षांचा अनुभव आहे. पण आपणच आपलं घर नीट सांभाळलं नाही तर मग बाहेरचा हस्तक्षेप अटळ आहे. इतके विद्यार्थी असतील तर इतके शिक्षक, असा कायदा आता विद्यापीठांनाही लागू केला आहे, पूर्वी तो महाविद्यालयांपुरता होता. संशोधनावर याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तसंच, शिक्षकांच्या जागाही भरल्या जात नाहीत. 40चा स्टाफ आता 14वर आलेला आहे. त्याच्यामुळे हर्षे सर म्हणाले ती व्यापकता, विस्तृतता प्राध्यापकांमध्ये कमी होत चालली आहे. मी दहा वर्षांपूर्वी निवृत्त होऊन अजूनही शिकवतो आहे आणि माझ्यासारखे अनेक लोक आहेत. ही परिस्थिती फार भयावह आहे. ती बदलली नाही आणि संशोधन केलं गेलं नाही तर शिक्षणाची गुणवत्ता

कमी-कमीच होत जाणार. शिक्षक संशोधन करत नसेल तर त्याचं ज्ञान अद्ययावत राहूच शकत नाही. त्याने पूर्वी घेतलेलं जे ज्ञान असेल, त्याचा 'एक्स्पोनेन्शिअल डिके' होतोच. मग दहा वर्षांनंतर त्याच्या जवळ काहीच शिल्लक राहत नाही. कारण ज्ञान पुढे जात असतं आणि आपण कुठेच गेलेलो नसतो. ही भयावह परिस्थिती येऊ नये यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**प्रश्न :** हर्षे सर, तुम्ही पॅरिसमध्ये होता. त्याच्या आधी तुम्ही पुण्यात शिकलात. तुम्हांला परदेशांत स्थायिकही होता आलं असतं. पण तुम्ही भारतात आलात आणि जाणीवपूर्वक भारतातल्या शिक्षणक्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतलात. असं तुम्ही का केलं आणि मागे वळून बघताना तुम्हांला काय वाटतं?

**हर्षे :** पूर्वी युरोप-अमेरिकेतल्या चांगल्या विद्यापीठांमध्ये भारतीय विद्यापीठांना कमी लेखलं जायचं ही वस्तुस्थिती आहे, आजही परिस्थिती तशीच आहे. जोपर्यंत आपल्या लोकांना तिथे मानाने वागवलं जात नाही तोपर्यंत तिथे राहायचं आणि त्यांच्या कल्पनांवर विश्वास ठेवून काम करायचं हे माझ्या मनाला कधी पटलं नाही. कुठेतरी माझा स्वाभिमान सतत दुखावला जायचा. भारतात अशी विद्यापीठं असली पाहिजेत आणि होऊ शकतील यावर माझा पूर्ण विश्वास होता. जेएनयू हे माझ्या मते तेव्हाही नक्कीच आंतरराष्ट्रीय दर्जाचं विद्यापीठ होतं आणि पुढे तर ते अधिकृतपणे झालंच. हैदराबाद विद्यापीठही तसंच होतं. भारतात चांगल्या शिक्षणसंस्था उभ्या राहिल्याच पाहिजेत असं मला वाटत होतं. इकडे येण्याचं ते एक प्रमुख कारण होतं. अजूनही माझा तोच विचार आहे. जास्तीतजास्त विद्यार्थी भारतातून कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, अमेरिका किंवा इतर युरोपीय देशांमध्ये जातात. आपले सगळे पैसे बाहेर जातात. याचं कारण आपल्याकडे पुरेशी चांगली विद्यापीठं नाहीत. या गोष्टीची आपल्याला अजूनही शरम वाटत नाही, याची मला खंत वाटते. आपल्या लोकांना आपण प्रोत्साहन देत नाही, कुठेतरी बाहेर त्यांना मान्यता मिळते. त्यामुळे इथेच, पुन्हा पुन्हा प्रयत्न केला पाहिजे. आता पुन्हा सगळी विद्यापीठं उद्ध्वस्त व्हायची वेळ आलेली आहे. वाटेल ते आदेश येतात आणि त्यांना ते पाळावे लागतात. कधीकधी मला वाटतं की, सगळं मोडून काढलं आणि सगळ्याचा विध्वंस झाला तरीसुद्धा हे पुन्हा उभं राहू शकत. चीनमध्ये असंच झालं. माओमुळे सगळ्याचं वाटोळं झालं. पण, मागच्या 40 वर्षांत चीनमध्ये अशी विद्यापीठं उभी राहिली की, आज जगामध्ये त्यांचं नाव घेतलं जातं. त्यामुळे निराश होण्याचं कारण नाही. मात्र, हा आपला देश आहे आणि आपण इथंच काहीतरी करून दाखवण्यात आपला स्वाभिमान आहे असं आपल्याला वाटलं पाहिजे. मी काही मोठा राष्ट्रवादी मनुष्य आहे असं नाही; पण, मला इथल्या लोकांचं प्रेम आहे. इथल्या गरिबातल्या गरीब विद्यार्थ्याला चांगल्यात चांगलं शिक्षण मिळालं पाहिजे आणि त्यासाठी पब्लिक सेक्टरमधली विद्यापीठं चांगल्या पद्धतीने जगली पाहिजेत, हा मला महत्त्वाचा मुद्दा वाटतो. राजकीय किंवा प्रशासकीय हस्तक्षेपामुळे विद्यापीठं बिघडत आहेत हे उघडउघड दिसतंच आहे. वाटेल त्या लोकांना कुलगुरुपदावरती घेतलं जातं. हे सगळं उघड्या डोळ्यांनी बघायचं आणि त्यावर भीतीपोटी काहीच म्हणायचं नाही, ही गोष्ट तर मला आणखीच शर्मनाक वाटते.

माझ्या सुदैवाने किंवा दुर्दैवाने मला 20 कुलगुरूंची अपॉइंटमेंट करण्याची संधी मिळाली. पूर्वी कुलगुरुपदासाठी अशा मुलाखती होत नसत. एखाद्या चांगल्या विद्वानाची नेमणूक त्या पदावर होत असे. पण, आता त्याच्या जाहिराती काय निघतात, लोक अर्ज काय करतात! लोकांना लक्षात आलं की, मी कुलगुरू पदाच्या निवडीसाठी पॅनेलमध्ये सदस्य आहे की, लोक माझे गोडवे गायला सुरुवात करतात. तुम्ही खूप मोठे स्कॉलर आहात, वगैरे म्हणता आणि एकदा निवड झाली, की माझी स्कॉलरशिप संपते! ही लाचारी कशासाठी? चांगली माणसं निवडावी आणि त्या पदावर बसवावीत. आमच्या प्राध्यापकांनीच स्वतःला इतकं खाली आणलं आहे की स्वाभिमानी माणसं कुलगुरू व्हायच्या फंदात पडणारच नाहीत. ही जरी विडंबना आज असली, तरी त्या वेळचा भारतात यायचा माझा निर्णय चुकला असं मला अजिबात वाटत नाही. माझ्याकडून जास्तीतजास्त करण्याचा मी प्रयत्न केला. अनेक वेळा मला परदेशांत बोलावलं तरी मी गेलो नाही. त्याच्याबद्दल मला काही खंत वाटत नाही. मला इथेच काम करायचं आहे आणि इथेच मरायचं आहे हे मला नक्की माहीत आहे.

**प्रश्न :** विद्यासागर सर, आता कुलगुरुपदासाठी लोक

अर्ज करतात पण तुमची नेमणूक झाली होती. कुलगुरू म्हणून तुम्ही जेव्हा काम करत होतात तेव्हा अशा प्रकारचं पुस्तक तुमच्या समोर आलं असतं तर त्याचा काय उपयोग होऊ शकला असता?

**विद्यासागर :** उपयोग निश्चितच झाला असता. कारण, या पुस्तकाची खूप वैशिष्ट्यं मला दिसतात, ती काम करणाऱ्याला उपयुक्त आहेत. आपणच स्वीकारलेली व्यवस्था आपण बदलू शकत नसलो तरी त्यात आपण जास्तीतजास्त चांगलं काय करू शकतो एवढं आपल्या हातात असतं. कुलगुरुपदाच्या शर्यतीत पडायची माझी इच्छा नव्हती; पण लोक म्हणाले म्हणून मी गेलो. चार वेळा मी पहिल्या पाचमध्ये असूनही मला नाकारलं गेलं. तरीही लोक म्हणाले की, आमच्यासाठी आणखी एकदा जा. मग माझी नांदेडला निवड झाली. कुलपतींना वाईट वाटत होतं की, चार वेळेला या माणसाला आपण परत पाठवलं. त्यांनी ते मला नंतर बोलूनही दाखवलं, तो त्यांचा मोठेपणा. मग माझ्या घरच्यांनी मला विचारलं की, नांदेडला कशाला जाता? इथे पुण्यात तर तुमचं चांगलं चाललं आहे. तेव्हा मी त्यांना सांगितलं की, कुलगुरूंच्या हातात एक सबंध संस्था येते. आणि जे बदल व्हायला पाहिजेत असं तुम्ही जन्मभर सांगत फिरता, ते करण्याची संधी तुम्हांला मिळते. ही संधी ती घेतली पाहिजे म्हणून मग मी ते स्वीकारलं आणि माझ्या पद्धतीने काम केलं. कुणाचाही, कुठलाही हस्तक्षेप होऊ दिला नाही. त्याचे काही तोटेही असतात. तुम्हांला अनेक समित्यांवर घेतलं जात नाही, बाजूला ठेवलं जातं. पण त्याने काही फरक पडत नाही. तरीही तुम्ही चांगलं काम करू शकता.

हे पुस्तक वाचताना मला काही गोष्टी भावल्या, त्यांचा शेवटी उल्लेख करणं मला आवश्यक वाटतं. 50 वर्षांहून अधिक कालखंडाचं विस्तृत चित्रण या पुस्तकात दिसतं. खूप चांगल्या प्रकारे घेतलेला हा शिक्षणातील अनुभवांचा परामर्श आहे. हा परिप्रेक्ष्य मला तसा मर्यादित वाटतो; कारण हे लेखन फक्त केंद्रीय विद्यापीठांशी संबंधित आहे. पण तरीही तो प्रातिनिधिक आहे. त्याचे अनेक घटक, आयाम सगळीकडे लागू होतात. गुणवत्ता आणि सामाजिक न्याय यांच्यातला समतोल राखणं आवश्यक आहे, हा संदेश या पुस्तकात दिसतो. या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. कारण सुमारीकरणाला सामाजिक परिस्थितीसुद्धा कारणीभूत असू शकते हेही आपण लक्षात घेतलं पाहिजे. पण दोन्हींकडून कधीकधी अतिरेक होतो. गुणवत्तेच्या निकषावर एखादी व्यक्ती निवडली जाते किंवा नाकारली जाते, तेव्हा लगेच त्याला जातीयतेचा रंग दिला जातो. हे होता कामा नये. त्याच्यामध्ये संतुलन असलं पाहिजे.

मानवी संबंधांची गुंतागुंत अनाकलनीय आहे हे या पुस्तकात वारंवार स्पष्ट होतं. आपण एका विशिष्ट विचाराने पुढे जात असलो तरी आजूबाजूची माणसं कशी विचार करतात हे समजून घेणं खूप अवघड असतं. जीवनात ध्येयवाद जपायला हवा हे तत्त्व या पुस्तकात प्रखरपणे मांडलेलं आहे. जागतिक तोडीच्या शिक्षणसंस्था भारतात निर्माण व्हायला हव्यात याची गरज पुस्तकातून प्रकर्षाने जाणवते. यासाठी कुठला मार्ग अवलंबावा त्याच्या खुणाही पुस्तकात जागोजागी दिसतात. या पुस्तकाची भाषा ओघवती आहे, निवेदन पारदर्शी आहे. काही गोष्टी सांगायला अवघड असतात, लिहायला त्याहून अवघड असतात. आपण एखादा विचार केला तरी तो योग्य शब्दांत मांडणं ही फार कठीण गोष्ट आहे. हर्षे सरांनी या पुस्तकात ते सहजपणे साधलं आहे, हे या पुस्तकाचं वैशिष्ट्य आहे. काही ठिकाणी स्पष्ट विधान करणं त्यांनी टाळलेलं आहे, निर्देश केलेला आहे. लेखकाचा व्यासंग, त्याचं बहुआयामी व्यक्तिमत्त्व, धैर्य, ध्येयवाद, मूल्यांवरील श्रद्धा यात प्रकर्षाने दिसून येते. मनस्वीपणे घेतलेल्या अनुभवांचं हे सादरीकरण आहे. वाचनानुभव समृद्ध करणारं असं हे पुस्तक आहे. त्यासाठी हर्षे सरांचे मनापासून आभार आणि अभिनंदन!

संवादक : **डॉ. संकल्प गुर्जर**

शब्दांकन : **सुहास पाटील**

(सप्टेंबर 2021 ते डिसेंबर 2022 या काळात राजन हर्षे यांनी लिहिलेले बारा दीर्घ लेख साधना अंकातून प्रसिद्ध होत राहिले. त्या सर्व लेखांचे पुस्तक **'पक्षी उन्हाचा : सात विद्यापीठांच्या आवारात'** या नावाने साधना प्रकाशनाकडून आले. त्या पुस्तकाचे प्रकाशन, 15 डिसेंबर 2023 रोजी पुणे येथील एस.एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनच्या सभागृहात, गिरीश कुबेर यांच्या हस्ते व विवेक सावंत यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. हे पुस्तक amazon.in वर आणि sadhanaprakashan.in वरही विक्रीसाठी उपलब्ध आहे, शिवाय हे पुस्तक e-book स्वरूपात Kindle वर उपलब्ध आहे.)

दृष्टिक्षेप

आसाराम लोमटे

# 'गावठाण' ते 'रिंगाण'!

पन्हाळा किल्ल्याच्या पायथ्याला केवळ पाचशे-सहाशे लोकसंख्येचे निकमवाडी हे गाव आहे. गावाच्या शिवारात जास्त प्रमाणात भातशेती. तसा कोल्हापूर हा भरपूर पर्जन्यमानाचा पाणीदार जिल्हा, पण निकमवाडी मात्र कमी पावसाचा शिवार. पाऊस पडला तरच शेती पिकते अन्यथा, दुष्काळ पाठ सोडत नाही. कृष्णात खोतचं हे गाव. शालेय शिक्षण जवळच्याच पन्हाळ्याला झालं आणि ते पूर्ण करून कोल्हापूरच्या शहाजी कॉलेजला कृष्णातने बी. ए. ला प्रवेश घेतला. बी.ए.ला असताना नाटक लिहून ते बसवलं. त्यानंतर तीन नाटकं लिहिली. अर्थात, ती प्रसिद्ध झाली नाहीत, पण लिहिण्याच्या सुरुवातीच्या काळातली अभिव्यक्ती ही नाटकांच्या माध्यमातून झाली. पुढे कृष्णातनं कविताही लिहिल्या. त्याच्या कादंबरीलेखनातही अधूनमधून जी काव्यात्मकता डोकावते तिची सुरुवात ही अशी झालेली आहे. 1990-91 मध्ये बी.एड. झाल्यानंतर पुढे पोटापाण्याचा संघर्ष सुरू झाला. काही काळ क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या शिक्षणसंस्थेत वसतिगृहाचा रेक्टर म्हणून काम केलं. पुढे पन्हाळा सोसायटीच्या कळे येथील माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम सुरू झालं. दुसऱ्या बाजूला शिक्षण मात्र सुरूच होतं. इतिहास, राज्यशात्र आणि मराठीतून एम.ए. केलं. त्यानंतर कळे इथेच ज्यूनिअर कॉलेजमध्ये काम करायला प्रारंभ झाला. या ठिकाणी अतिशय समृद्ध असं ग्रंथालय असल्याने झपाटून वाचन सुरू झालं. मोठे मोठे लेखक वाचले. त्यातूनच लिहिण्याची प्रेरणा निर्माण झाली. अशी सगळी कृष्णातची पार्श्वभूमी आहे.

'गावठाण' ही कृष्णातची पहिली कादंबरी. लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात शेषराव मोहिते यांनी राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या मदतीने नवलेखन शिबिर घेतलं होतं. तिथं अनेक नवे लिहिणारे आलेले होते. कृष्णातची पहिली भेट त्याच शिबिरात झाली होती. तेव्हा नुकतीच त्याची मौजेच्या दिवाळी अंकात 'गावठाण' ही लघुकादंबरी प्रसिद्ध झाली होती. शिबिरातील अनेक वक्त्यांनी या कादंबरीचा उल्लेख आपल्या भाषणातून केला होता. आता जेव्हा 'गावठाण'च्या निर्मितिप्रक्रियेविषयी कृष्णातला विचारल्यानंतर त्यानं या लेखनामागची कहाणी सांगितली.

''सुरुवातीच्या काळात लिहिण्या-वाचण्याच्या उपक्रमात हजेरी लावणं, आसपासच्या साहित्य संमेलनांना जाणं, असं सगळं चाललेलं होतं. औदुंबर येथील साहित्य संमेलनाला गेलो होतो. तिथे श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांची भेट झाली. ''मी काही लिहिलं आहे, ते तुम्हांला वाचायला द्यायचं आहे'', असं मी त्यांना म्हणालो. मग त्यांनी मला त्यांचा फोन नंबर दिला आणि एके दिवशी फोन करून 'कराडला या', असं सांगितलं. एका दिवशी सुट्टी पाहून मी रविवारी जेव्हा

कृष्णात खोत यांची ओळख मागील दोन दशकांपासून थोड्याच पण वैशिष्ट्य पूर्ण कादंबऱ्या लिहिण्यासाठी आहे. ग्रामीण जीवनाचे व सर्वसामान्य माणसांचे जगणे त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी आहे. त्यांनी लिहिलेली व्यक्तिचित्रे आणि कथा यांचेही वेगळे कौतुक झालेले आहे. त्यांना अनेक पुरस्कार वेळोवेळी मिळालेले आहेत. नुकताच त्यांच्या 'रिंगाण' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कारही जाहीर झाला आहे. त्या निमित्ताने आजच्या पिढीतील आघाडीचे कथाकार (अलीकडेच त्यांची 'तसनस' ही कादंबरीही आली आहे) आसाराम लोमटे यांनी घेतलेला हा कृष्णात खोत यांच्या साहित्याचा वेध.

कराडला पोहोचलो तेव्हा श्रीनिवास विनायक कुलकर्णी हे मला घेण्यासाठी चक्क बसस्टॅन्डवर आलेले होते. मी लिहिलेली कादंबरीची वही त्यांच्याकडे सोपवली आणि विसरूनही गेलो. साधारण महिन्याभराने त्यांचा फोन आला की, 2001च्या दिवाळी अंकासाठी 'गावठाण' ही लघुकादंबरी स्वीकारली आहे. मौजेच्या दिवाळी अंकात ती प्रसिद्ध झाल्यानंतर जाणकारांचे फोन यायला लागले. अनेकांनी कादंबरी आवडली म्हणून सांगितलं. काही कार्यक्रमांमधून या नुकत्याच मौजेत छापून आलेल्या कादंबरीचा आवर्जून उल्लेख होऊ लागला. त्यानंतर ही कादंबरी 2005ला मौजेने प्रसिद्ध केली. बाळ ठाकूर यांचं मुखपृष्ठ आणि आतील रेखाटनांसह ती अत्यंत देखण्या रूपात वाचकांसमोर आली.''

''आनंदी ही या कादंबरीची नायिका आहे. तिच्यासारख्या कित्येक मुली कमी वयात लग्न होऊन ढोरकष्टांना जुंपल्या जातात. भयंकर दारिद्र्य वाट्याला आलेल्या, तरीही सतत दुःखाला सामोरे जाणाऱ्या आणि उपजत शहाणपण अंगी असलेल्या एका विवाहित मुलीचा जीवनसंघर्ष पुस्तकरूपात आल्यानंतर सगळीकडून चांगल्या प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली. आनंदीचा संसार, तिचे माहेरचे, सासरचे लोक; एवढेच नाही तर तिथला निसर्ग अशा सगळ्या गोष्टी मी या कथानकात गुंफल्या. पन्हाळगडच्या पायथ्याशी असलेला माझ्या गावाचा भोवताल... या भोवतालातच अशा अकाली संसाराला जुंपलेल्या अनेक मुली मला दिसत होत्या. त्यांतलीच आनंदी मी माझ्या शब्दांत उभी केली. ज्या परिसरात ती वाढते-घडते तो सगळा परिसर जिवंत करण्याचा प्रयत्न केला. या कादंबरीने एक आत्मविश्वास दिला आणि लेखक म्हणून एक स्थान निश्चित केलं'', हे कृष्णात आवर्जून सांगतो.

'गावठाण' ही म्हटलं तर एका छोट्या कुटुंबातली गोष्ट होती. पण पुढच्या कादंबरीत कृष्णातने राजकारण या एका सर्वस्पर्शी, सर्वसंचारी अशा विषयाला हात घातला. 'रौंदाळा' ही कृष्णातची दुसरी कादंबरी 2008ला पॉप्युलर प्रकाशनाकडून प्रसिद्ध झाली. गाव हाच या कादंबरीचा नायक आहे. 'खेड्याकडे चला म्हणणाऱ्या महामानवास' अशी या कादंबरीची अर्पणपत्रिका आहे. या कादंबरीविषयी कृष्णात म्हणतो, ''1990च्या दशकापर्यंत स्थितिशील असणाऱ्या गावांमध्ये बदलाने वेग घेतला. राजकारणाचे डावपेच माणसांचं जगणं उद्ध्वस्त करू लागले. एरवी आपापल्या कामातच गुंतलेल्या माणसांना जणू राजकारणाची चटक लागली. एखाद्या चुरगाळून फेकून दिलेल्या कागदासारखी गावांची अवस्था झाली. गावांचं पार बकालीकरण झालं. 'रौंदाळा'मध्ये मी अशाच गावाचं चित्र रेखाटलं आहे. साध्या ग्रामपंचायतीच्या, सोसायटीच्या निवडणुकीत गावं किती ढवळून निघतात. शह-काटशहांचं राजकारण चालतं. माणसं उभी करण्याचं, त्यांना निवडून आणण्याचं, पाडण्याचं राजकारण पेट घेत राहतं. गावच्या गावं त्यात धुमसत राहतात. सतत आपल्या प्रतिस्पर्ध्याची जिरवण्यासाठीच जणू माणसे टपलेली आहेत असे वाटत राहते. गावावर आपली हुकमत कशी राहील याचाच सदैव विचार सर्व राजकारणग्रस्त लोक करत राहतात. 'रौंदाळा' ही कादंबरी याच सूत्राभोवती गुंफलेली आहे. कादंबरीच्या शेवटी 'गाव म्हणायचं का वणवा' असं वाक्य येतं, ते का तर ही कादंबरी वाचल्यानंतर लक्षात येईल.

'धूळमाती' ही कादंबरी मौज प्रकाशन गृहाने 2014 या वर्षी प्रसिद्ध केली. 'गावठाण'सारखीच ही लघुकादंबरी म्हणता येईल. कधीकाळी जमिनीशी असलेले भावनिक नाते आणि मातीची ओढ कालांतराने बदलली. विशेषतः रस्त्यालगतच्या जमिनींना सोन्यासारखा भाव आला. जमिनीवरून होणारे संघर्ष, हेवेदावे खेड्यापाड्यांत वाढले. या कादंबरीतला 'नारगुंडीचा माळ' हे जमिनीच्या संघर्षाचे केंद्र आहे. स्वतः जमीन नसणारी माणसे मोठमोठ्या जमीनदारांच्या जमिनी कसतात. सावकार किंवा मोठे जमीनदार आपल्या जमिनी अशा कुळांकडे देतात. नारगुंडीचा माळही दाजी सावकाराने अशाच एका राबणाऱ्या कुटुंबाकडे सोपवलेला आहे. हा माळ दाजी सावकार विकायला काढतो. वाटेल ती किंमत मोजून तो विकत घ्यायचा असा विचार हा माळ कसणारे कुटुंब करते. ज्या मातीत आपण जीव ओतला आहे ती जमीन दुसऱ्या कुणी घेण्याची कल्पनाच सहन होणारी नसते. म्हणून कोणत्याही परिस्थितीत ही जमीन हातची जाऊ द्यायची नाही, या जिद्दीने कुटुंबातले सर्व जण कामाला लागतात. नातेवाइकांकडून पैसे आणायचे, जवळचे किडूकमिडूक विकायचे, पण ही जमीन हातची जाऊ द्यायची नाही असा विचार हे राबणारे कुटुंब करते. मात्र, यातही गावातले वैमनस्य डोके वर काढते. लोक आपापले हेवेदावे बाहेर काढतात.



कृष्णात खोत

सरळमार्गी माणसांच्या आयुष्यातही अनेक संकटे वाढवून ठेवलेली असतात. शेवटी अशा माणसांचाही तोल सुटतो. रान मिळवण्यासाठी चालू असलेला संघर्ष विफल होतो. गावातल्या शिरजोर प्रवृत्ती हातातोंडाशी आलेला घास काढून घेतात. ज्या रानात घाम ओतला असा 'नारगुंडीचा माळ' हातातून निसटण्याची पाळी येते तेव्हा संयमाचा कडेलोट होतो. अगदी शेवट म्हणून पाषाणाच्या नारगुंडीबाबासमोर दादाकडून नारळ, उदबत्ती आणि पाण्याचा तांब्या ठेवला जातो. ''निम्मा जल्म झाला. तू पोसलंस तुझ्या या मातीवर. आता पुढल्या जल्मात तुझी नि माझी मातीसाठीच पडली तर गाठ नाहीतर कुठली आली?'' असं दादा म्हणतात. एवढ्यात अण्णा चक्क एक दगड उचलून नारगुंडीबाबावर घालतो. त्या पाषाणाच्या देवावर आपला संताप व्यक्त करतो. नारगुंडीबाबाला काही होत नाही, पण घातलेल्या दगडाच्या मात्र ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. अण्णाच्या डोळ्यांत आग उतरलेली असते. छोट्या छोट्या वाक्यांमधून कृष्णात हा प्रसंग उभा करतो.

''मी मातीत पुरल्यागत उभा होतो.

देव दाजीगत हिरवागार हसत होता.

सूर्य माथ्यावर ऊन थापित होता.

मी पुढे गेलो. दादांना उठवलं. त्यांचं डोळे डबडबलं.

अण्णाचं नि माझंही डोळं गळायला लागलं.

दादांना दोघांनी धरलं. आम्ही घराकडं येऊ लागलो.

नात्यातल्या माणसाची माती सावडून आल्यागत''.

इथं ही कादंबरी संपते.

'रौंदाळा'ला गाव हा नायक होता, तर 'झड-झिंबड'मध्ये पाऊस हाच नायक आहे. ही कादंबरी आकाराला कशी आली आणि लेखक म्हणून कृष्णातला या कादंबरीबद्दल काय वाटतं? असं विचारल्यानंतर तो जरा विस्ताराने सांगतो. त्यातून कादंबरीची पार्श्वभूमी लक्षात येते.

''साधारणपणे 2000 या वर्षी पत्नीच्या नोकरीनिमित्त पाटपन्हाळा या गावी मी राहण्यास गेलो. जन्मगाव निकमवाडी जरी कोरडवाहू असले तरी पाटपन्हाळा मात्र भरपूर पाण्याचा परिसर. दोन्ही बाजूंनी नद्या. एक जांभळी आणि दुसरी कासारी. या गावात जेव्हा राहायला आलो तेव्हा पावसाळ्याचे दिवस होते. शिवारात भरपूर ऊसमळे, वाहणाऱ्या नद्या आणि चहूबाजूंनी डवरून आलेला निसर्ग. साहजिकच हा सगळा परिसर पाहून मी आनंदून गेलो. इथूनच मी माझ्या कळे या नोकरीच्या गावी जात असे. त्या वेळी मी भाड्याच्या घरात राहत होतो. घरमालक कोल्हापूरला असायचे. 2005च्या पावसाळ्यात पाटपन्हाळ्याच्या पुलावर पाणी आलं. गावाचा अन्य ठिकाणांशी असलेला संपर्क तुटला. घरातही बेभान वारा आणि पाऊस शिरला. घराची एक भिंत पडलेली, पण तसल्या पावसातही ती टिकून राहिली. त्याच काळात मुलगा आजारी पडलेला. अशा वेळी रात्र-रात्र झोप लागायची नाही. औषध आणण्यासाठी सकाळी उठून वाट विचारत बाहेर पडलो. पाण्यातून भोगाव हे सात किलोमीटर अंतर असलेलं गाव गाठायला पाच तास लागले. परत यायला पाच तास... याच अनुभवावर मी 'पाऊस' या नावाची कथा लिहिली. जेव्हा पावसाळा संपला तेव्हा घरमालकांनी भिंत बांधली. पण त्या दिवसांचं सावट मनावर कायम होतं. त्या काळात रात्र-रात्र झोप लागायची नाही. भिंत पडल्याच्या या अनुभवावर मौजेच्या दिवाळी अंकात 2007 मध्ये 'झड' ही कथा लिहिली. पावसाळा असा प्रत्येक वेळी नवनवे अनुभव देत होता. 'झड-झिंबड'ची सुरुवात इथून झाली आहे.''

पावसाच्या अनुषंगाने सर्व संदर्भ आणि ऐवज गोळा करून प्रत्यक्ष कादंबरी-लेखनापर्यंत झालेला प्रवासही


Date of Posting : 1-1-2024

मोठा वेधक आहे. कृष्णातच्या तोंडून तो ऐकताना या विषयासाठी त्याने घेतलेले परिश्रम लक्षात येतात. तो सांगतो की, ''कादंबरीच्या अनुषंगाने पावसासंबंधीच्या सगळ्या नोंदी करत गेलो. माझं गाव कोरडवाहू आणि आईचं माहेर हे नदी असणारं गाव होतं. त्यामुळे आई जात्यावर ज्या ओव्या म्हणत असे त्या नोंदवून घेतल्या होत्या. शिवाय, आईने कधी तरी लहानपणी हस्त नक्षत्राची कहाणी सांगितली होती. ती परत तिच्या तोंडून ऐकली. या कहाणीची टिपणं टिपून घेतली. पावसाच्या प्रत्येक नक्षत्राला आपल्या गावाकडच्या माणसांनी काही विशेषणं दिलेली आहेत. नक्षत्रानुसार पडणाऱ्या पावसाचे वर्णन लोकांनी केलेलं आहे. हे सगळं मनात साठवत होतो. पूर, अतिवृष्टीच्या बातम्या, वर्तमानपत्रांतून आलेल्या नोंदी गोळा करत होतो. लोकांच्या बोलण्यातून येणारा पाऊस, असं सगळं ऐकत होतो. माझा अनुभव, ऐकिव माहिती, जाताना-येताना पाहिलेलं पावसाचं रूप, त्या काळातल्या वर्तमानपत्रांच्या बातम्या आणि या सर्वांची संगतवार मांडणी करून संपूर्ण पावसाला कवेत घेण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे 'झड-झिंबड'होय.''

''पावसाचा लोकजीवनावर पडलेला ताण, त्याने केलेली वाताहत, पावसाचा तडाखा सोसलेली माणसे पावसाला शिव्या देत असत. पावसाला उद्देशून बोलत असत. संतांनी जसं विठ्ठलाशी भांडण केलं, विठ्ठलाशी जसा संतांचा दावा होता तसाच या सगळ्या माणसांचा पावसाशी दावा असल्याचं मी पाहत होतो. त्यातूनच खापऱ्याझोड्या, झाडपाड्या, गावबुडव्या, शिवारतुडव्या, उरबडव्या, घरपाड्या, शिवारकुजव्या असे पावसासंबंधीचे अनेक शब्द मला सुचायला लागले. पाऊस जणू हेच एक पात्र आहे अशा पद्धतीने या माणसांचा जीवनव्यवहार मी पाहत होतो. तेव्हाच पाऊस हीच या कादंबरीची मुख्य व्यक्तिरेखा आहे असं मला मनोमन वाटलं.'' कृष्णात जे सांगतो त्याचं प्रत्यंतर प्रत्यक्ष कादंबरी वाचताना येतं.

'झड-झिंबड' हे नाव कादंबरीला कसं दिलं गेलं हे विचारल्यानंतर कृष्णात सांगतो, ''झड नावाची कथा मौज दिवाळी अंकात छापून आलेलीच होती. त्यामुळे तेच नाव कादंबरीला द्यावं का असा प्रश्न मनात होता. तशी कादंबरीला ठोस अशी कथा नव्हती. पाऊस हाच कादंबरीभर व्यापून राहिलेला आहे मग 'सावट' हे नाव निश्चित केलं होतं. पुन्हा 'झिंबड' हे नाव ठरवलं. पॉप्युलर प्रकाशनच्या संपादक अस्मिता मोहिते यांच्याकडे हे लेखन पाठवल्यानंतर त्यांनी मला लगेच पहिली प्रुफं पाठवली. त्यानंतर दोन मुखपृष्ठं माझ्याकडे पाठवून दिली. त्यातले एक कादंबरीसाठी निश्चित केले. कादंबरीच्या ब्लर्बसाठी अस्मिता मोहिते यांनी राजन गवस यांच्याकडे कादंबरीचे प्रूफ पाठवले होते. गवस सरांनी कादंबरी वाचून एके दिवशी फोन केला. त्यांना कादंबरी आवडली आणि फोनवरच त्यांनी ब्लर्बचा मजकूर सांगितला. त्यानंतर काही दिवसांनी त्यांचा फोन आला. तोवर कादंबरीचे फायनल प्रूफ, मुखपृष्ठ ब्लर्बसह त्यांच्याकडे पाठवले होते. ''एवढे नवे शब्द या कादंबरीत तू घडवले आहेस तर कादंबरीचे नावसुद्धा अशाच पद्धतीने एखादा नवा शब्द घडवून झाले तर चांगले होईल'', असे गवस सर म्हणाले आणि त्यांनीच 'झड-झिंबड' असा एक नवाच शब्द सुचवला. हेच कादंबरीचे नाव कायम झाले. पाऊस नसला तरीही माणूस रडतो आणि अतोनात झाल्याच्या नंतरही तो माणसाला रडवतो. त्यामुळेच 'पाऊस भिजक्या डोळ्यांना' अशी या कादंबरीची अर्पणपत्रिका आहे.''

'रिंगाण' ही कृष्णातची २०१७ ला प्रसिद्ध झालेली कादंबरी. माणूस आणि निसर्ग हे सूत्र तर या कादंबरीला आहेच, पण या कादंबरीचे आणखी एक परिमाण थक्क करणारे आहे. पाळीव प्राण्याचा आदिमतेपर्यंतचा प्रवास रेखाटणारी ही महत्त्वाची कादंबरी आहे. ही कादंबरी कशी सुचली ते कृष्णात सांगतो.

''मी 1990 ला क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या वस्तिगृहाचा रेक्टर म्हणून सोनवडेला काम करत होतो. त्या वेळी वस्तिगृहात वेगवेगळ्या गावांतून आलेली धरणग्रस्तांची मुले त्यांच्या व्यथा सांगत असत. हे गाव धरणापासून दोन-तीन किलोमीटरवर आहे. या ठिकाणी धरणग्रस्तांच्या मुलांची मोफत शिक्षणाची सोय अण्णांनी केली होती. यातल्या अनेक मुलांची गावे ही धरणात गेलेली होती. त्या गावांना मी बऱ्याचदा गेलो होतो. शनिवारी या मुलांचे पालक जवळच्या आठवडी बाजाराला आले की मुक्कामाला वस्तिगृहात येत. एवढ्या दूरवरून लेकरांच्या भेटीसाठी पायी चालत आल्यानंतर त्यांना एक दिवस मुक्कामच करावा लागत असे. त्या वेळी त्यांच्या बोलण्यातून अनेक गोष्टी यायच्या. ते गावातल्या म्हाताऱ्या माणसांविषयी बोलत, नातेवाइकांचे हाल सांगत.''


Date of Posting : 1-1-2024

‘‘माझ्याकडे बोडके नावाचा एक विद्यार्थी होता. जो वयाने माझ्यापेक्षाही मोठा होता. त्याने मला त्याच्या धनगरवाड्यावर एकदा नेलं. त्या वेळी मी तिथं अस्वलाने पायाचा लचका तोडलेला एक जण धोतराच्या फडक्याने पाय बांधून बसलेला पाहिला होता. कोणत्याही औषधोपचाराशिवाय तो जंगलातून फिरत होता. आपली दररोजची कामं करत होता. त्यानंच मला कोल्ह्याच्या व वाघाच्या अनेक रंजक कथा सांगितल्या. दरम्यान, 1993 ला ती नोकरी सोडून मी माझ्या गावाजवळच्या शाळेत आलो; पण त्या भागात मला सतत जावं वाटत असे. ज्या ज्या वेळी तिकडे जाईल त्या त्या वेळी मी धरणावर आणि जंगलात जात असे. चांदोली अभयारण्य घोषित झाल्यानंतर अनेक वाडे-पाडे उठवले गेले होते. त्या भागात पुन्हा कधी गेल्यानंतर या उठवलेल्या वाड्या-पाड्यांना मी भेटी देत असे. या ठिकाणी राहणारी माणसं आणि त्यांचं जगणं मी पाहिलं. प्रत्येक वर्षी किमान एकदातरी या उठलेल्या वाड्या-पाड्यांवर मी जात असे आणि त्यांची पडझडही जवळून पाहत असे. माझी पहिली ‘गावठाण’ ही कादंबरी 2005 ला आली. या कादंबरीची प्रुफं माझ्याकडे तपासायला आली होती. त्याच काळात ‘रिंगाण’चा हा विषय डोक्यात आकार घ्यायला सुरुवात झाली होती.’’

‘रिंगाण’चा नायक देवाप्पा हा आकाराला कसा आला, याबाबतही मोठी उत्सुकता होती. कृष्णात सांगतो, ‘‘एकदा असाच धरणाच्या वरच्या भागात फिरायला गेलो होतो. जुन्या जंगलातल्या वाटा नष्ट होत होत्या. जंगल खात्याने नव्या वाटा निर्माण केल्या होत्या. मूळ रहिवाशांना जर आपल्या आधीच्या गावात दर्शनासाठी जायचं असेल तर जंगल खात्याची परवानगी घ्यावी लागत होती. वरच्या भागात केवळ खुंदलापूरचा धनगरवाडा तेवढा शिल्लक होता, तोही आता उठवला जाणार आहे असं कानावर येत होतं. तिथे एक म्हातारा मला भेटला. तो थकलेला होता. त्याचं कोणीच नातेवाईक आता जंगलात राहिलेलं नव्हतं. सगळं जंगल रिकामं झालं होतं. माणसं पांगलेली होती. माझं प्रुफं तपासायचं काम झालं की मी संध्याकाळी रोज फिरायला बाहेर पडत असे. कधीकधी धरणाच्या वर असलेल्या जंगलात जाई. माझ्या बरोबर असणारे मला या धरणाच्या अनेक गोष्टी सांगत. बुडालेल्या गावांच्या जंगलातून हद्दपार करण्यात आलेल्या माणसांच्या, जनावरांच्या कथा या वेळी कानावर पडत आणि त्यात दररोजच नव्याने भर पडत असे. त्या ठिकाणच्या म्हाताऱ्याला भेटायचं, गप्पा मारायच्या असं बऱ्याचदा घडत असे. त्या वेळी येता-जाता अनेकदा सोडलेल्या म्हशी दिसायच्या. सुरुवातीला त्यांच्याकडे माझं लक्ष नव्हतं. धरणाच्या खाली असणाऱ्या गावातल्या लोकांच्या या म्हशी असतील असा माझा समज होता; पण जरा बारकाईने बघितलं तर त्यांच्यात एक वेगळेपण जाणवत होतं. एकत्र कळप करून त्या राहायच्या. कुणी नवा माणूस आला तर त्याच्याकडे बारकाईने लक्ष द्यायच्या. त्यांच्या अंगावरचे केस भरपूर वाढलेले होते आणि त्यांच्या जवळ जाण्याची भीती वाटत होती. या म्हशी माणसाकडे अशा का बघतायेत, त्यांना इतर प्राण्यांचे भय वाटत नसेल का- असे अनेक प्रश्न घेऊन मी त्या म्हाताऱ्याला भेटलो. या म्हशी माणसाला पाहिलं की आता बिथरून जातात. एकटक पाहतात. माणसाची सावलीही पडू देत नाहीत आणि माणूसही त्यांच्या जवळ जाईल असं आता त्यांचं वागणं राहिलेलं नाही. पुनर्वसन झालं तेव्हा भाकड जनावरं माणसांनी इथेच सोडली आणि ती नव्या मुलखात राहायला गेली. ही भाकड जनावरं आता रानटी जनावरागत माणसांना आपल्याजवळ फिरकू देत नाहीत. त्या म्हाताऱ्याने हे सगळं सांगितलं आणि कादंबरीचं बीज माझ्या डोक्यात पडलं. पाळीव प्राण्याचा रानटी होण्यापर्यंतचा प्रवास मला दिसायला लागला आणि त्यावरच मी ‘वसप’ या नावाची कथा मौजेच्या दिवाळी अंकात लिहिली. 2008 मध्ये ही कथा छापून आली.

‘‘एकदा एका धरणग्रस्तांच्या वसाहतीच्या शाळेत गेलो होतो. त्या ठिकाणी धरणाचा नकाशा भिंतीवर काढलेला होता आणि त्यात बुडालेल्या गावांचा उल्लेख होता. या शाळेत एक म्हातारा मुलांना पोहायला, झाडावर चढायला शिक्षकांची परवानगी घेऊन येत असे. तो जंगलातल्या आठवणीही सांगायचा. तो या अभयारण्यातला पुनर्वसित होता. त्याची गावाबद्दलची ओढ जराही कमी झालेली नव्हती. त्याचं मन या गावात रमत नव्हतं. त्याची तडफड मी जवळून पाहत होतो आणि हीच तडफड मी देवाप्पाला बहाल केली. अर्थात, कोणत्याही एकाच व्यक्तीवर ही व्यक्तिरेखा बेतलेली नाही. आधी भेटलेल्या खुंदलापूरच्या म्हाताऱ्यापासून ते या म्हाताऱ्यापर्यंत अनेकांच्या व्यक्तिमत्त्वाचा अंश


Date of Posting : 1-1-2024

देवाप्पा उतरलेला आहे. देवाप्पाची जगण्याची लढाई, त्याने आपल्यात करून घेतलेला बदल, म्हशीसोबतचा त्याचा संघर्ष असे सूत्र मी गुंफुले. देवाप्पाच जगणं आणि म्हशींचं जगणं यांची सरमिसळ लेखनाच्या आशयद्रव्यात झाली.''

''देवाप्पा आपली म्हैस आणायला निघालेला दिवस ते दुसऱ्या दिवसापर्यंत... असा दोन दिवसांचा कालावधी कादंबरीत येतो. मात्र, गतकाळाच्या अनेक गोष्टी यात फ्लॅशबॅक पद्धतीने येत राहतात. जवळपास दोन पिढ्यांचा कालपट कादंबरीत येतो. या सर्व गोष्टींच्या मी आधी नोंदी केल्या होत्या, टिपणं काढली होती. आठवडी बाजाराला आलेल्या आणि वस्तिगृहात एक दिवस मुक्काम करून राहिलेल्या अनेक माणसांचे बोलणं मला जसं आठवेल तसं मी नोंदवून ठेवलं. देवाप्पा घडवत असताना या सगळ्या गोष्टी कामी आल्या. आम्ही शाळेत जाताना वाटेला पन्हाळगडाची जी उंच तटबंदी होती त्यावर दगड मारून आमच्या ताकदीचा अंदाज येता जाता अजमावत असू. त्याच पद्धतीने देवाप्पा झाडावर दगड मारून आपली ताकद किती आहे हे पाहतो. म्हशीबरोबरच्या संघर्षात असताना तो लघवी करतो आणि या वयात आपली लघवी किती लांब जाते हे पाहतो, आम्ही गमतीने लहानपणी असं करायचो.''

कादंबरीदरम्यान देवाप्पा सगळं बोलत राहतो. ही त्याची सगळी स्वगतं त्याला ओळख न दाखवणाऱ्या म्हशीला उद्देशून आहेत. त्यात एक प्रकारची काव्यात्मकता आहे. तो चिडतो, हळहळतो तर कधी म्हशीला प्रेमाने चुचकारतो. या सगळ्या झटापटीला एक लय आहे. ती लय पकडण्याचा प्रयत्न कृष्णातने भाषेच्या द्वारे केला. त्यामुळे अनेक ठिकाणी कादंबरीत काव्यात्मक असा भाग येतो. अर्थात, या सर्व कादंबऱ्या लिहिण्याआधी कृष्णातने काही कविताही लिहिलेल्या आहेत. 'रिंगाण' कादंबरीत तर त्याच्यातला कवी अनेकदा दिसून येतो. म्हैस आणि आपल्यात पडलेलं अंतर दूर व्हावं यासाठी देवाप्पाची धडपड चाललेली आहे. शेवटच्या टप्प्यातली त्याची ही धडपड जिवावर बेतलेली आहे. प्राणांतिक आहे. पण किमान या झटापटीमुळे तरी आपण आपल्या मूळ भूमीचे दर्शन घेत आहोत याविषयीचं समाधान देवाप्पाच्या मनात आहे. जो प्रवास या कादंबरीतल्या म्हशींनी केला तोच प्रवास अन्य प्राणीही करतील. जे प्राणी पाळीव झाले आहेत त्यांना संधी मिळाल्यानंतर ते परत आपल्या मूळ प्रवृत्तीवर जातील आणि हे रिंगण पूर्ण करतील असं मत काही जाणकारांनी कृष्णातजवळ व्यक्त केलं आहे. आपल्या मूळ प्रवृत्तीत जाण्यासाठी करावा लागणारा संघर्ष किंवा तो संघर्ष करण्याची ताकद प्राण्यांच्या शरीरात निसर्गाने शाबूत ठेवलेली असेलच, असा विचार कृष्णातच्याही मनात आला आणि कादंबरीला त्याने 'रिंगाण' असं नाव दिलं. 'रिंगाण' या शब्दाला आणखी एक संदर्भ आहे. एखाद्याशी जर निकराचा संघर्ष सुरू झाला असेल तर त्याला ''तू माझ्या तावडीत गावशीलच ... न्हाय तुझं रिंगाण काढलं तर बघ''. असं म्हणण्याची एक पद्धत आहे. ती एक प्रकारची परतफेडच असते. यात एक आव्हान आहे. समोरासमोर दिलेलं आव्हान, चढाईची भाषा असं या शब्दात आहे. म्हणून 'रिंगाण' या शब्दाला हा असा आणखी एक चढाईखोर संदर्भ आहे. आधीचं 'तुटल्या मुळाचा कोंब' हे जे नाव या कादंबरीला दिलेलं होतं ती आता या कादंबरीची अर्पणपत्रिका आहे.

...अशी ही सगळी कृष्णातच्या कादंबरी-पंचकाची गोष्ट आहे. 'नांगरल्याविन भुई' हे त्याचे व्यक्तिचित्रांचे आणखी एक पुस्तक आहे. 'रौंदाळा' या त्याच्या कादंबरीतून गावपातळीवरचे राजकारण आलेले असले तरी मुख्यत्वे निसर्ग आणि माणूस हाच त्याच्या कादंबरीलेखनाचा गाभा आहे. 'झड-झिंबड' आणि 'रिंगाण' या दोन्ही कादंबऱ्यांमधून ही बाब प्रकर्षाने दिसून येते. 'रिंगाण'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर होण्यापूर्वी माया पंडित यांनी या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद केला आहे. शब्द पब्लिकेशननेच तो प्रसिद्ध केला आहे. कृष्णातचे लेखन आता भाषेच्या मर्यादा ओलांडून आणखी विस्तारत जाईल. 'गावठाण'पासून सुरू झालेला हा प्रवास 'रिंगाण'च्या रूपाने एका निर्णायक वळणावर आलेला आहे. आणखीही नवीन वळणे गाठण्यासाठी, खूप काही लिहिण्यासाठी कृष्णातला भरभरून सदिच्छा!

**आसाराम लोमटे,** परभणी
aasaramlomte@gmail.com
Mob. 8329911787


Date of Posting : 1-1-2024

संदीप भुयेकर

# ‘झड-झिंबड’ : कादंबरीतील पर्यावरणीय संवेदन

कृष्णात खोत यांनी ग्रामीण कादंबरीलेखनात एक स्वतंत्र ठसा उमटवला आहे. ‘गावठाण’, ‘रौंदाळा’, ‘धूळमाती’, ‘रिंगाण’ या त्यांच्या प्रकाशित कादंबऱ्या आहेत. ‘नांगरल्याविन भुई’ हा त्यांचा वाचनीय व्यक्तिचित्रण संग्रह आहे. याखेरीज अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व ललितबंध प्रकाशित झाले आहेत. ‘रिंगाण’ या त्यांच्या कादंबरीला 2023 चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला असल्याने ही कादंबरी चर्चेत आली असली, तरी त्यांचे यापूर्वीचे कादंबरीलेखनही तितकेच सशक्त आहे. बदलते पर्यावरण आणि गावखेड्यांवर त्याचे उठणारे ओरखडे खोत यांनी ठळकपणे त्यांच्या कादंबऱ्यांत चित्रित केले आहेत. या अनुषंगाने पाऊस आणि ग्रामीण जीवन यांची सर्वस्वी वेगळी मांडणी करणारी त्यांची कलाकृती म्हणजे ‘झड-झिंबड’ (2012) होय. पाटपन्हाळा या कासारी नदीतीरावरील छोट्याशा खेडेगावात हे कथानक घडते. हे गाव डोंगरकपारींत वसले आहे. गावाचे फारसे नागरीकरण झालेले नाही. सर्वसामान्यपणे खेडेगावात असणाऱ्या रीतीभाती, अंधश्रद्धा, आपुलकी, हेवेदावे हे सगळे या कादंबरीत असले, तरी ‘पाऊस’ या कथासूत्राभोवतीच दोनशेअकरा पानांची सबंध कादंबरी फिरत राहते.

**‘झड-झिंबड’मधील व्यक्तिरेखा**

झड-झिंबड या कादंबरीतील पाटपन्हाळे या गावाला पूर्वी शहराशी जोडणारे एकमेव साधन म्हणजे नाव असते. नाव ज्याप्रमाणे पाण्यावर तरंगते त्याप्रमाणेच या गावातील माणसांची आयुष्यंही तरंगती, पण प्रवाही असतात, त्यात साचलेपणा नसतो. गावात काही सुष्ट-दुष्ट लोक असतातच. शामा, हमीद, दशरथ हे जिवलग मित्र या कादंबरीचे नायक आहेत. थोरात हा गावातील निपुत्रिक जमीनदार किंवा परंपरागत खलनायक आहे. त्याने दत्तक घेतलेला मुलगा गावचा सरपंच आहे; पण, तो शहरात राहतो. गावच्या समस्यांशी त्याला काहीही घेणेदेणे नाही. खोटी सरकारी कागदपत्रे बनवून आपला जास्तीतजास्त फायदा कसा होईल याचा विचार करणाऱ्या ऐदी प्रवृत्तीचे तो प्रतिनिधित्व करतो. सत्तेचा आणि श्रीमंतीचा वापर करून सगळ्याच गोष्टी आपल्याला हव्या तशा घडविता येतात, या गोष्टीचा या बाप-लेकांना दर्प चढलेला आहे व एकंदरीत त्यामुळे थोरातांची माणुसकीच नामशेष झाली आहे. त्याशिवाय, गवताची हुटी रचणारा आणि लोकांची निसटलेली हाडे बसविणारा आबा कावणे व म्हशी पाळणारे गजाप्पा माने

> ‘झड-झिंबड’मध्ये पाऊस या एकाच निसर्गतत्त्वाशी निगडित सर्व बाजूंचा ऊहापोह केला आहे. पाऊस हा कृषिजन संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपण निसर्गाशी फारकत घेत आहोत की निसर्गघटकांशी योग्य ते समायोजन साधत नाही हे द्वंद्व लेखक वाचकाच्या मनात उपस्थित करतो. माणूस कितीही प्रगत झाला तरी तो निसर्गघटकांना आव्हान देऊ शकत नाही, नैसर्गिक घटकांपुढे माणसाची ताकद खुजी पडते, हे सत्य या कादंबरीतून वाचकांपुढे येते. चलच्चित्रासारखी डोळ्यांसमोर उभी राहणारी निसर्गचित्रणे आणि पर्यावरणाविषयी वाटणारी आदिम आस्था हे कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यांचे बलस्थान आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांमध्ये हा समान धागा आपल्याला सापडू शकतो.

व पांडू शिंदे, थोराताचा हरकाम्या नोकर भिका, एका हातात इंजेक्शनची सुई व दुसऱ्या हातात अंगाऱ्याची पुडी असणारा देवरशी डॉक्टर, नाना पांगे, आंदू गवंडी इत्यादी इतर पात्रे आहेत.

**'झड-झिंबड'मधील आशयसूत्रे :**

पर्यावरणीय संदर्भात कादंबरीत खालील आशयसूत्रे आढळतात.

1. पर्यावरणातील मानवी हस्तक्षेप

पूल झाल्यानंतर पारंपरिक दळणवळणाचे साधन असलेली नाव ही सरकारजमा केली जाते आणि पूल हेच केवळ दळणवळणाचे साधन उरते. हा पूलच पाण्यात गेल्यावर, वाटेचीच वाट लागल्यावर गावाची त्या पावसाळी दिवसात कशी दैना उडते, याचे चित्रण ही कादंबरी करते. पुलाच्या बांधकामामुळे नदीला येणारी पाण्याची फुगी व पिके पाण्याखाली जाणे हे पर्यावरणातील मानवी हस्तेक्षेपाचे (Anthropogenic activities)चे सूचन करतात. निलगिरी ही महाराष्ट्रातील स्थानिक वृक्षाची प्रजात नव्हे, परंतु व्यापारी तत्त्वाने तिची जागोजागी लागवड केलेली आढळते. पश्चिम महाराष्ट्रात शेताच्या बांधांवर निलगिरीची खूप झाडे आढळतात. या झाडासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे उन्हाळ्यात कधीकधी निलगिरीच्या झाडाखालची पिके लवकर वाळलेली दिसतात. पाण्याचा अति उपसा करत असल्यामुळे निलगिरीची पाने जाड असतात. त्यामुळे वाऱ्या-पावसात ही झाडे पडल्यामुळे विजेच्या तारांचे व शेतीचे मोठे नुकसान होत असते. बऱ्याचदा रस्त्यावर ही झाडे पडल्यामुळे वाहतूक ठप्प होते. कादंबरीत निलगिरीच्या झाडामुळे बरेच नुकसान झाल्याचे उल्लेख आहेत. या झाडाच्या लागवडीमुळे स्थानिक प्रजातीच्या वृक्षांच्या लागवडीकडेही दुर्लक्ष होते. शामाला याबाबतचे ज्ञान आहे. हमीदच्या घरावर निलगिरीचे झाड कोसळू शकते ही शक्यता गृहीत धरून शामा त्याला सावध करतो, ''तुला मागंच बोललोय. निलगिराची जात लगीच लय वाढतीय आनि लगीच मोडतीया बी!''

1.जंगलातील वृक्षतोडीमुळे प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. याचेही कादंबरीत उल्लेख येतात. हे वन्य प्राणी मग मानवी वस्तीत शिरल्याने माणसांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो.

**2. पावसाची अनियमितता व त्याचे परिणाम**

कादंबरीच्या प्रारंभी पाऊस लागावा म्हणून लोक प्रार्थना करताना दिसतात. कादंबरीच्या प्रारंभी यजुर्वेदातील वरुण प्रार्थनेचा श्लोक देऊन लेखकानेही वरुणाच्या रौद्रपणाचे सूचन केले आहे. पाऊस जेव्हा पडत नाही तेव्हा लोक त्याचे महत्त्व जाणतात. 'पावश्या घूऽ पावश्या घूऽ'च्या आरोळ्या देत पावश्या पक्षीही त्याला साद घालतो. रणरणत्या उन्हात पावसाने यावे असे वाटणेही निसर्गाइतकंच स्वाभाविक आहे. काही दिवसांनी हाच आक्रस्ताळा पाऊस रौद्र रूप धारण करतो आणि गावाची वाताहत होते. दशरथच्या गरोदर मुलीला बाळंतकळा चालू होतात. गावात एकच कामचलावू डॉक्टर असतो. त्यामुळे तिला शहरात कोल्हापूरला नेणे गरजेचे असते. पुलावर पाणी आल्याने वाट बंद होते. तरीही शामा व हमीद प्रयत्नांची पराकाष्ठा करून नदी पार करायला पाहतात व पावसातच सुदैवाने ती बाळंत होते. तिचे लहान मूल सारखे किरकिर करते, पण औषध शहरातून आणणे शक्य होत नाही.

गवताची हुटी रचणारा व लोकांची सरकलेली हाडे मूळ जागी बसवण्यात हातखंडा असलेला आबा कावणे नातीच्या पोराच्या जावळासाठी कोल्हापूरला जातो व परत येताना पुलावरून वाहून जाऊन मृत्यू पावतो. नाना पांगेने कर्ज काढून उभा केलेली केळीची बाग वाऱ्यापावसाने उद्‌ध्वस्त होते. वाट बंद झाल्याने डेअरीला दूध घालणे बंद होते. नंदूचा मामा बैलांसकट वाहून जातो. झाड तारेवर पडल्याने विजेच्या तारा तुटून, शॉक लागून गजाप्पा मरतो. हमीदच्या घरावर निलगिरीची फांदी पडल्याने खापऱ्या फुटतात व त्या मिळवण्यासाठी त्याला गयावया कराव्या लागतात. बाजीराव लगारे या युवकाला नोकरीचा कॉल येतो, पण गावाबाहेर जायला वाटच उरली नसल्याने तो मुलाखतीस उपस्थित राहू शकत नाही. गिरण्या लायटीअभावी बंद पडतात. त्यामुळे दळप-कांडपाची समस्या उद्भवते. रस्ताच बंद झाल्याने किराणा सामान उपलब्ध होऊ शकत नाही.

वाळवंकराची पावसाच्या माऱ्याने भिंत पडते. आंदू भवंडाचे घर पडून त्याची म्हातारी मरते. थंडी-गारठ्याने बुळकांडी लागून हमीद व वाळवंकराच्या शेरड्या मरतात. पांडू शिंदे शेतावरच्या घरात



गुराढोरासकट पुरात अडकतो. ढोरांना वाचवण्यासाठी तो जिवापाड प्रयत्न करतो. पुढे त्याला व शामाच्या रेड्याला पिसाळलेला कुत्रा चावतो, पण रेबीजची लस घेणे वाट झाल्याशिवाय शक्य होत नाही; हे असे सारे वरुणाचे कणुणोपनिषदच कृष्णात खोतांनी मांडले आहे. पावसाच्या अनियमितपणाबद्दल निवेदक लेखक म्हणतो की, मुरव्या जिरव्या पाऊस आता लागत नाही. वर्षाचा एकदम चार-आठ रोज लागतो. पण पावसाची अशी अनियमितता उपयोगाची नाही.

पुराने गावाला वेढल्यानंतर लेखकाने त्याचे केलेले वर्णन अत्यंत प्रत्ययात्मक आहे. ''सगळा गाव पावसानं जाळं टाकल्यागत झालता. विचित्र काळजीत अडकला होता. कोण घरामागच्या लागलेल्या पाण्यात, कोण घरामागच्या झाडानं मांडलेल्या गहिवरांत. कोण जनावरांच्या वैरणीत. कोण घरच्या भिंतीना चढत निघालेल्या ओलीत. कोण शिवारातली पिकं गेली त्यात. कोण जोपासलेली झाडं गेल्याच्या दुःखात, कोण घरातलं माणूस आजारी पडलेलं त्यात. कोण आपल्या शेताचा ठावठिकाणा नसल्याच्या चिंतेत. कोण खापरीतनं पाझरणाऱ्या पाण्याच्या काळजीत. कोण शेजारच्या गावात असणाऱ्या पै-पावण्याच्या लेकीबाळीच्या विचारात, तर कोण आणखी कशात आणि कशात''

अतिवृष्टीमुळे भूस्खलनाचा धोकाही संभवतो. डोंगरावरील वृक्षराजीचे प्रमाण कमी झाले की हा धोका अजून जास्त होतो. कादंबरीत या भूस्खलनाचेही उल्लेख आले आहेत. डोंगरातून मार्ग काढत आलेल्या नंदू वाळवकराला हा प्रकार दिसतो. व तो सर्वांना ही हकिकत सांगून सचेत करतो. तो म्हणतो, ''डोंगरात खाली आलो. एका जाग्याला मोठ्ठं रान खचलंय. तटच तुटून गेलाय. व्हगळीच्या व्हगळी तुंबल्यात लय खोल. सगळा तुटलेला डोंगर खाली आला तर गाव बुजवील आपलं. मला पावसानं डोगराची व्हगळ बघून खरंच गावाची काळजी वाटू लागली. काळूबाईचा डोंगर खचाय लागलाय. वर देऊळ आणि डोंगर सगळा खाली याचाच'' (पृ. 87). भू-स्खलनाच्या अशा घटना आता सह्याद्री डोंगररांगात जागोजागी घडताना आढळतात. माळीण गाव दुर्घटना, रायगडमधील इर्शाळवाडी ही याचीच उदाहरणे आहेत.

पावसाच्या अतिरेकाने लोक हैराण होऊन त्याला शिव्या घालू लागतात. कादंबरीच्या प्रारंभी पावसाची आतुरतेने वाट पाहणारे गावकरी कादंबरीच्या शेवटी पावसाला वैरी मानू लागतात. लेखकाची भाषाही मग अजून काव्यात्म होऊन त्याचे वर्णन करते- ''पाऊस वैरी, गावाचा, शिवाराचा, माणसांचा, ढोरागुरांचा, शेरडाकरडांचा, सगळ्यांच्या जगण्याचा. पाऊस मरणाचा मैतर. पाऊस जगण्याचा वैरी!'' या कादंबरीतील पर्यावरण व माणूस यांच्या संबंधावर भाष्य करताना राजन गवस म्हणतात, ''गावाचे जगणे निसर्गावर अवलंबून; त्यामुळे निसर्ग ही देवता. तिची सावली घ्यायची, पण तिला ओरबाडायचं नाही. निसर्गातून हवं तेवढंच घ्यायचं. निसर्गाचा विध्वंस करायचा नाही. निसर्गाला दुखापत केली तर तो आपल्यालाही जगू देत नाही. अशा धारणेवर वाढलेल्या गावात अचानक बाहेरच्या शक्ती घुसल्या. त्यांनी निसर्गाच्या विध्वंसाचं टोक गाठलं. तणाव तयार झाला. निसर्ग आणि माणूस यांच्यात ताण निर्माण झाल्यानंतर होणारी माणसाची ससेहोलपट खोत या कादंबरीत चित्रित करतात. माणूस निसर्गाला जेव्हा दुखापत करतो तेव्हा आपोआपच निसर्गाचा कोप ओढवून घेतो. आपल्या जगण्यात वादळ निर्माण करतो. या वादळाचा निर्माताही तोच आणि बळीही तोच ठरतो. याचा प्रत्यय ही कादंबरी देते!''

**3. आपात्कालीन समूहभाव**

अतिवृष्टीमुळे गावाला पुराचा वेढा पडल्यानंतर

गावकरी एक-दुसऱ्यांना मदत करताना आढळतात. राजू रावण कधीही कुणाला शेतात पाय ठेवू न देणारा असला तरी अतिवृष्टीच्या वेळी गजाप्पाला स्वतःहून आपल्या शेतातला पाला काढून ने म्हणून सांगतो. अतिवृष्टीच्या वेळी घरात तांदूळ व पीठ नसल्याचे हमीद दशरथला सांगतो तेव्हा दशरथ त्याला आपल्याकडील तांदूळ व पीठ ने, म्हणून सांगतो. दशरथची बायको तर त्याला तांदूळ व पिठाची गठळीच बांधून देते. आपल्याकडे आहे त्या गोष्टी आपण वाटून खायला हव्यात, असे ती म्हणते.

दशरथच्या बाळंतकळा चालू झालेल्या मुलगीला शामा, हमीद, दिना ही मंडळी आपला जीव धोक्यात घालून नदीच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न करतात. शामा कावणे आबाचे प्रेत पुराच्या पाण्यातून पाठीला बांधून आणतो. पावसामुळे घरांची झालेली पडझड सावरण्यासाठी सगळेच गावकरी एकमेकांना मदत करतात. हमीदची बायको दशरथच्या नातीला आपले दूध पाजते. गुरुजी आपल्याकडचे तापाचे औषध शामाच्या मुलाला देतात. गावात कुणाचेही काहीही बरेवाईट झाले तरी सगळे गावकरी हळहळताना दिसतात. यावरून आपत्तीच्या वेळी गावकऱ्यांचे माणूस म्हणून एक असणे अधोरेखित होते.

याविषयी सुशील धसकटे लिहितात... ''अशा आणीबाणीच्या स्थितीत कामी येतो, तो गावाचा एकजूट-सामूहिकपणा. आपल्याकडे आहे नाही ते सर्व अडल्या-नडल्यांना दिलं-घेतलं जातं. अशा वेळी जे आढ्यतेनं वागतात. त्यांना समजावलं जातं. एवढंच नव्हे तर दसूच्या बाळंत झालेल्या मुलीचं अंगावरचं दूध जातं. बाळ रडरड रडत असतं. अशा वेळी दसूची बायको हमीदच्या बायकोला सांगावा धाडते आणि हमीदची बायको स्वतःच्या पित्या मुलीला ठेवून दसूच्या नातवाला दूध पाजायला जाते. इथे दसूचा हिंदू धर्म आडवा येत नाही की, हमीदचा मुस्लिम धर्म.'' जात-धर्म, गरीब-श्रीमंत असल्या कुठल्याही अडथळ्यांशिवाय निःसंकोचपणे माणूसधर्म पाळत गाव निसर्गाच्या या संकटाला सामोरं जातं. माणूस म्हणून माणुसकीची बूज परोपरीने राखली जाते. मानवी सहजीवनाचं भेदाभेदविरहित मनोरम व माणुसकीमय दर्शन घडते.

**4. ढिसाळ पर्यावरणीय व्यवस्थापन**

कादंबरीत पर्यावरणीय व्यवस्थापनाविषयी अनास्थेच्या अनेक नोंदी येतात. खेड्यातील विजेचे भारनियमन आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांविषयी पर्यायाने शेतीच्या जलसिंचनाविषयी प्रशासकीय पातळीवर फारसे गांभीर्य आढळत नाही. नाना पांगे वाचत असलेल्या वर्तमानपत्रातील बातम्यांतून अनेक पर्यावरणीय समस्यांचे सूचन होते. 'यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार...तोवर त्याच पानावर बातमी 'लाइट बोर्डावर मोर्चा', दुसरी बातमी. तिसरी बातमी 'पाण्यासाठी वणवण फिरताहेत जिल्ह्यातली निम्मी गावं'. डोक्यावर घागरी घेतलेल्या करपून गेलेल्या बायकांची चित्रं, तर दुसऱ्या चित्रात खोल गेलेली विहिरीतली घागर आणि तिथं घागर कुडचून भरणारी मुलं. सगळ अंगावर येणारं, खेड्यातलं भारनियमन आणखी चार तासांनी वाढणार.'' प्रशासकीय धोरणांची आखणी करताना 'कुठे पूर तर कुठे दुष्काळ' असे स्थानिक पर्यावरणाचे पैलू गांभीर्याने लक्षात घेतले जात नाहीत.

नदीवर पूल बांधत असताना तिथल्या उंचीचा विचार करून तो बांधणे अपेक्षित असते. परंतु, स्थानिक राजकारणी लोक त्यात ढवळाढवळ करून आपल्या स्वार्थासाठी पर्यावरणीय तथ्यांना बाजूला ठेवून कमी उंचीच्या ठिकाणी तो बांधतात. त्यामुळे तो पावसाळ्यात लवकरच बुडतो व अनेक नव्या समस्या उद्भवतात. पूल झाल्यानंतर त्याच्यामुळे होणाऱ्या पर्यावरणीय बदलांचा अभ्यास (EIA) होणे अपेक्षित होते. परंतु, पूल झाल्यानंतर लगेचच नाव सरकारजमा केली जाते. त्यामुळे आपात्कालीन परिस्थितीमध्ये गावाचा संपर्कच तुटतो.

कादंबरीत मुंबईत गटारी तुंबण्याचाही उल्लेख येतो. ढिसाळ पर्यावरणीय व्यवस्थापनाचे ते उदाहरण आहे. ''गटरातल्या गहाणीमुळं गटरंच सगळी पॅक झालीत. दुसऱ्या मजल्यावर काही ठिकाणी पाणी गेलयं.''

पर्यावरणीय आपत्तींमध्ये जीव गमावलेल्या माणसांना शासकीय मदत मिळण्याची कोणतीही शाश्वत व विश्वासार्ह योजना नाही. त्यामुळे शासकीय मदतीविषयी लोक साशंक आहेत. त्यासाठी जुळवावयाच्या शासकीय कागदपत्रांविषयी आणि कटकटींविषयी ते मनातून वैतागून गेले आहेत. साशंक झाले आहेत. आपत्ती

व्यवस्थापनाविषयी किंवा जीवरक्षक कौशल्यांविषयी (Life Saving Skills) कादंबरीतील पात्रे अनभिज्ञ असताना आढळतात. कादंबरीतील हणमंत लगारे हा युवक छपराच्या आढ्याला वालं बांधून वाऱ्यानं हलणार सपार हाताला तिढा देऊन धरून बसतो आणि त्याच्या हाताला अपंगत्व येते, पुराच्या पाण्यातून जीव धोक्यात घालून नदी ओलांडणे हेदेखील आपत्ती व्यवस्थापनाच्या नियमांना धरून नाही.

**5. खेड्याची शाश्वतता, स्वावलंबन व पारंपरिक शहाणपण** (Traditional Wisdom) **नष्ट होणे**

या कादंबरीचा आत्मा म्हणजे पाऊस. पाऊस हा काही अंशी खलनायकाचे काम करीत असला, तरी सखल भागात पूल बांधल्याने व पारंपरिक दळवळणाचे साधन नाव न उरल्याने उद्भवलेली परिस्थितीच खल आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात खेड्याची शाश्वतता व स्वावलंबन संपले. पूर्वी स्वतःच्या गरजा स्वतः भागविणाऱ्या खेड्याला अगदी साध्यासाध्या गोष्टींसाठी शहराकडे लाचार होऊन जावे लागते. शहराशी संपर्क तुटला की गाव अगदी अगतिक होऊन जाते. सगळ्या भौतिक सोयीसुविधा शहरातून संक्रमित होत असतात. ग्रामीण भागातील लोकांना त्यांचा हव्यास असतो. ते या वस्तूंच्या आहारी जातात. टी.व्ही, टेलिफोन, भ्रमणध्वनी, औषधे, शिक्षण एवढेच नव्हे तर स्वतःच्या शेतात पेरावयाच्या बी-बियाणेविषयीही, गाईम्हशींच्या गर्भरेतनासाठीही तो परावलंबी होत असतो. स्वार्थांध लोकांच्या टोळ्या मग गावकऱ्यांना लाचार बनवून लुटायला धावतात. भौतिकता आणि शाश्वतता यांच्या परिघावर नेऊन ठेवून सुजाण वाचकाला विचारप्रवण करण्याचे काम 'झड-झिंबड' करते. आपल्या दिशाहीन धावण्यातून काही महत्त्वाचे निसटून तर गेले नाही ना? आणि त्या निसटल्याने आपल्या जिवावर तर बेतणार नाही ना? याचे भान 'झड-झिंबड' देते. या निसटलेपणाच्या काही खुणा प्रारंभीच्या पृष्ठांत आढळतात.

कादंबरीतील शामा हा गर्भरेतनासाठीचा रेडा पाळणारा शेतकरी आहे. परंतु, कृत्रिम गर्भरेतनाच्या पद्धती विकसित झाल्यामुळे रेड्यांची मागणी कमी होते. परंतु, या गर्भरेतनासाठीच्या कांड्याही भ्रष्टाचारी लोकांमुळे निकृष्ट दर्जाच्या मिळू लागतात. त्यामुळे गाई-म्हशींच्या अनेक स्थानिक प्रजाती नष्ट होण्याचाही धोका वाढला.

गावातील आबा कावणे हा लोकांची हाडे बसविण्याचे काम करत असे; परंतु आता त्यांच्या मृत्यूनंतर गावात असे काम करणारी कुणी व्यक्तीच उरत नाही. पंड्याची बायको डॉक्टर उपलब्ध नसल्याने पारंपरिकरीत्या देण्यात येणारे औषध हळद-मिठाचा लेप त्याच्या सुजलेल्या शरीरावर लावते. बाळंतपण करण्यासाठी पारंपरिकरीत्या गावोगावी उपलब्ध असलेल्या सुईणी आता मिळत नाहीत. आनुक्कानंतर बाळंतपण करणारी व नवजात अर्भकाची काळजी घेणारी ज्ञानी स्त्री आता गावात कोणी उरलेली आहे असे वाटत नाही. गावाचे हे पारंपरिक शहाणपण (Traditional Wisdom) नष्ट होत असल्याचे लेखक सूचित करू पाहतो. लोककथा आणि लोकगीतेही नष्ट होताहेत, यातून पाऊस व नदी यांच्याविषयी प्रकट होणारा आदरभाव व पारंपरिक शहाणपण नष्ट होताना दिसते.

**'झड-झिंबड'मधील इतर पर्यावरणीय संदर्भ**

वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध शेतीचे तुकडीकरण होऊन बांधांची संख्या वाढते. 'झड-झिंबड'मध्ये पावसाने इंदूच्या वावराचा बांध राधाच्या वावरात जातो व त्या दोघींची भांडणे लागतात. राधा आणि इंदू या सख्ख्या जावा असतानादेखील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात न घेता भांडतात. याविषयी नीला जोशी म्हणतात, ''अत्यंत विपरीत आणि भीषण परिस्थितीतही माणूस इतका स्वार्थी आणि संकुचित मनाने कसा बरे वागतो? जागतिकीकरणाचे जे अनेक परिणाम आहेत त्यांतीलच हा एक परिणाम आहे की, नव्या व्यवस्थेत लूट हाच धर्म बनू लागला आहे. लोकांना बाकी कशाचे सोयरसुतक उरलेले नाही. हे या कादंबरीचे आशयसूत्र वाचकाला विचारप्रवृत्त करते, अंतर्मुख करते.'' शेतात पेरावयाच्या बियाण्यांची उगवणक्षमतेचीही (Germination Capacity) खात्री देता येत नाही. कृषी पर्यावरणाचा शेतकऱ्यांवर व एकंदर ग्रामसंस्कृतीवर बराच परिणाम झालेला आढळतो. हा परिणाम नकारात्मक स्वरूपाचा आहे.

कादंबरीतील आबा कावणेला बरीच गावठी औषधे (Vernacular Medicines) माहीत असतात. हमीद व वाळवकरांच्या शेळ्यांना बुळकांडी लागते तेव्हा ते त्यावर औषध म्हणून कळकीच्या बेटाचा पाला शोधायला


Date of Posting : 1-1-2024

जातात. ही बेटेदेखील ग्रामीण भागात आता दुर्मीळ होत चालल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागात 'रेबीज' या आजारावर गावठी औषध मिळते, असा उल्लेख आहे. रक्तचंदन नावाच्या झाडाच्या खोडाचा उपयोग कादंबरीतील पात्रे सूज उतरवण्याच्या कामी करतात. गावात वानरांनी उच्छाद मांडून खापऱ्यांची वाट लावली असा उल्लेख येतो. कादंबरीतील हमीद व पंड्या मिसाळ यांना भरपूर मासे सापडतात. यातून जलीय परिसंस्थेतील सजीवांची परिसंस्था निकोप असल्याचे समोर येते. खेकड्यांचे वर्णन वाचताना त्यांची संख्या परिसरात बरीच असावी, हे अधोरेखित होते. कादंबरीत हुलगं नावाच्या पिकाची प्रजात नष्ट झाल्याचा उल्लेख येतो. त्याच्या उपयुक्ततेसंबंधीदेखील चर्चा होते. या सगळ्या संदर्भांतून गावात असलेल्या अनेक स्थानिक वनस्पती, प्रजाती आता नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे लेखक सांगू इच्छितो.

लोकांनी जंगलातील झाडांची तोड केल्यामुळे आता लाकूड पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही, हा संदर्भ कादंबरीत येतो.

श्रीमंत लोक करीत असलेल्या अतिरिक्त ऊर्जावापराचा संदर्भ येतो. ''रातदिवस पंख्याचा वारा घेत बसल्याल्या पुढाऱ्यांना कुठला अंधार नि कुठला घाम मर्दा... त्यास्नी इथल्या मातीतल्या माणसांची काळजी नाही. नोटावाल्यांची त्यास्नी काळजी.'' या संदर्भात नंदकुमार मोरे लिहितात, ''बदलत्या काळात मानवाचा निसर्गाशी वेगवेगळ्या पातळ्यांवर संघर्ष सुरू आहे. याला सर्वस्वी या सृष्टीवरचा मानव हाच प्राणी जबाबदार आहे. त्याने आपल्या सुखांसाठी स्वार्थीपणाने निसर्गाची अपरिमित हानी चालवलेली आहे. त्याचे परिणाम जगभर दिसू लागले आहेत. निसर्गाचे संतुलनच बिघडून गेले आहे. त्यामुळे मृग नक्षत्रामध्येच पावसाची 'झड-झिंबड' व्हावी आणि एका गावात हाहाकार माजावा यात नवल ते काय? असे अघटित प्रसंग आता जीवनाचाच भाग बनले आहेत.''

'झड-झिंबड'मध्ये औद्योगिक प्रकल्प नाही, परंतु नदीवर सखल भागात बांधलेला पूल व पारंपरिक वाहतुकीचे साधन नाव उपलब्ध नसणे- यामुळे गावकऱ्यांच्या होणाऱ्या गैरसोईचे चित्र रेखाटले आहे. बऱ्याचदा रस्ते करताना किंवा धरणे बांधताना तिथून पावसाळ्यात पुराचे पाणी वाहणार असते. याचा विचार न करता भराव टाकला जातो. त्यामुळे नदीचे पाणी पाठीमागील पाणलोट क्षेत्रात तुंबते व पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात पाण्याखाली जाते. पर्यावरणीयदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्रात 2019 व 2021मध्ये आलेल्या महापुराचे प्रमुख कारण हा भराव असल्याचे समोर आले आहे.

'झड-झिंबड'मध्ये पाऊस या एकाच निसर्गतत्त्वाशी निगडित सर्व बाजूंचा ऊहापोह केला आहे. पाऊस हा कृषिजन संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपण निसर्गाशी फारकत घेत आहोत की निसर्गघटकांशी योग्य ते समायोजन साधत नाही हे द्वंद्व लेखक वाचकाच्या मनात उपस्थित करतो. माणूस कितीही प्रगत झाला तरी तो निसर्गघटकांना आव्हान देऊ शकत नाही, नैसर्गिक घटकांपुढे माणसाची ताकद खुजी पडते, हे सत्य या कादंबरीतून वाचकांपुढे येते. चलच्चित्रासारखी डोळ्यांसमोर उभी राहणारी निसर्गचित्रणे आणि पर्यावरणाविषयी वाटणारी आदिम आस्था हे कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यांचे बलस्थान आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांमध्ये हा समान धागा आपल्याला सापडू शकतो.

**संदीप भुयेकर**

sandipbhuyekar9@gmail.com

सहाय्यक प्राध्यापक, काशी हिंदू विश्व विद्यलय

**संदर्भ :**

1. खोत कृष्णात, झड-झिंबड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 2012, पृ. 95.
2. तत्रैव, पृ. 108.
3. गवस राजन : कृष्णात खोत यांचे कादंबरीलेखन, 'ऐवजी' अंक 12, एप्रिल 2013, पृ. 55.
4. धसकटे सुशील : लोकसत्ता-लोकरंग, रविवार, 6 जानेवारी 2013, पृ. 06.
5. खोत कृष्णात, उनि. पृ. 17.
6. तत्रैव, पृ. 61.
7. जोशी नीला, पानोपानी जीवन विस्कटणारा पाऊस : झड-झिंबड, मुराळी, मार्च 2013, पृ.3.
8. खोत कृष्णात, उनि. पृ. 14.
9. मोरे नंदकुमार, झड-झिंबड- एका पावसाची गोष्ट, मुक्त शब्द, ऑगस्ट 2015, वर्ष सहावे, अंक चौथा, पृ. 12.

ज्वारीची कहाणी : ४

धनंजय सानप

# ज्वारीच्या काढणीसाठी तंत्रज्ञानच विकसित केलेले नाही

देशाने 1990च्या नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाची (खाउजा) दारं खुली केली. त्यामागचा उद्देश देशाला विकासाकडे घेऊन जाण्यासाठी परकीय गुंतवणुकीला मार्ग मोकळा करून देणे, असा होता. त्यानुसार देशातील सर्व क्षेत्रांत परकीय गुंतवणूक होऊ लागली. त्यामुळे सेवाक्षेत्रापासून तर उद्योगक्षेत्रापर्यंत अभूतपूर्व बदल झाले. नवीन तंत्रज्ञान देशात येऊ लागले. श्रम, वेळ आणि पैसा यांची बचत करणारं तंत्रज्ञान सर्वच क्षेत्रात आलं. अर्थात, कृषी क्षेत्रातलाही या बदलाचे वारे स्पर्शून गेले. त्यामुळे कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाचा वापर करण्यात येऊ लागला. 90 च्या दशकात देशातील कृषी यांत्रिकीकरणाची गती संथ होती. मात्र, 90नंतर कृषी क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात पाय रोवायला सुरुवात केली. त्यामुळे कृषी यांत्रिकीकरणाची उपलब्धता काही प्रमाणात वाढली.

त्यापूर्वी देशातील कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाचा पहिला प्रयोग हरित क्रांतीदरम्यान होऊ लागला होता. देशातील गहू आणि तांदळाच्या उत्पादनात वाढ झाली तशी यांत्रिकीकरणाच्या दृष्टीने जे काही बदल कृषी क्षेत्रात झाले ते याच दोन प्रमुख पिकांना मध्यवर्ती ठेवून झाले. परिणामी, आजही गहू आणि तांदूळ पिके वगळता इतर पिकांच्या बाबतीत यांत्रिकीकरणाचा वापर अत्यल्प आहे. आजही यांत्रिकीकरणाचं जाळं देशभर विस्तारलं नाही.

‘इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्च’ (आयसीएआर) संस्थेच्या अहवालानुसार, देशातील गहू आणि तांदूळ या पिकांच्या अनुषंगाने लागवडीपासून ते काढणीपर्यंत प्रक्रिया करण्यासाठी विविध यांत्रिकीकरणाचा सर्वाधिक वापर होतो. त्याखालोखाल कडधान्य, तेलबिया, नगदी पीक- जसे की, कापूस आणि ऊस यांच्या उत्पादनासाठी यांत्रिकीकरणाचा वापर केला जातो. श्रम, वेळ आणि पैसा यांच्या दृष्टीने कृषी यांत्रिकीकरण महत्त्वाचे आहे. परंतु, देशातील मोठ्या शेतकरीसमूहापर्यंत कृषी यांत्रिकीकरणाचा फायदा पोहोचलेला नाही. आजघडीला देशातील सर्वच पिकांच्या पेरणीसाठी 70 टक्के यांत्रिकीकरणाचा वापर केला जातो. परंतु, पिकाच्या काढणीच्या वेळी गहू आणि तांदूळ वगळता इतर पिकांसाठी 32 टक्क्यांहून कमी प्रमाणात यांत्रिकीकरणाचा वापर केला जातो. तर सर्वाधिक यांत्रिकीकरणाचा वापर गहू पेरणीसाठी 65 टक्के केला जातो. तसेच तांदूळ आणि उसासारख्या पिकांसाठी अनुक्रमे 30 आणि 20 टक्के वापर करण्यात येतो. आयसीएआरच्या या आकडेवारीवरून देशातील कृषी

कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, रोबोटिक्सचा वापर शेतीक्षेत्रात होऊ लागला आहे. देशात मात्र ज्वारीसारख्या पिकांच्या काढणीसाठी तंत्रज्ञानच अजूनही विकसित करण्यात सरकार, संशोधन संस्था आणि खाजगी कंपन्यांना यश आलेलं नाही. जागतिक भरडधान्य वर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेवर नजर फिरवली तरी तंत्रज्ञानाच्या बाबत असलेली उदासीनता डोळ्यात ठळकपणे भरते. त्यामुळे इतक्या उदासीन पद्धतीने यांत्रिकीकरणाचा विचार करून चालणार नाही. ज्वारीचं उत्पादन वाढवण्यासाठी पूरक स्थिती निर्माण करावी लागेल आणि त्यासाठी सरकारला कंबर कसून मैदानात उतरावे लागेल.


Date of Posting : 1-1-2024

यांत्रिकीकरणच्या अवस्था सहज लक्षात येतात. अर्थात, यासाठी सरकार पातळीवरची अनास्था कारणीभूत आहे.

'खाउजा'नंतर देशातील अन्य क्षेत्रांचा उभा-आडवा विस्तार झाल्याने साहजिकच रोजगारांच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील मनुष्यबळ शेतीऐवजी उत्पनाचं साधन म्हणून अन्य क्षेत्रातील संधीचा शोध घेऊ लागले. त्यातून कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या कमी झाली. आज ग्रामीण भागात मजूर मिळत नसल्याचे शेतकरी सांगतात. लागवड आणि काढणीच्या वेळखाऊ प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचं नुकसान होतं. मजुरांची संख्या कमी होण्यामागे विविध कारणं असली तरी ग्रामीण भागात त्याचा थेट फटका कृषी क्षेत्राला बसतो आहे.

ज्वारी पिकाच्या अनुषंगाने यांत्रिकीकरणाची स्थिती लक्षात घेतली तर दुर्लक्षित स्थिती असल्याचे दिसते. आनंदगाव (ता. केज जि. बीड) येथील ज्वारी उत्पादक शेतकरी संभाजी आबा तवसे सांगतात, "एकूण 10 एकर शेतजमीन आहे. त्यापैकी 3 एकरवर रब्बी ज्वारी पेरली आहे. पेरणी तिफनीनं केली. मजूर मिळत नाही. मागच्या वर्षी कापणीसाठी मजुरी 3 हजार रुपये एकर होती. एकरी पेंढी बांधणीसाठी 1 हजार 600 रुपये आणि कणीस खुडणीसाठी एकरी 3 हजार 200 रुपये इतका खर्च आला. मळणीयंत्राचा खर्च वगळता कापणी, बांधणी आणि खुडणीसाठी 8 हजार 500 रुपये खर्च येतो. इतका खर्च काढणीच्या वेळी इतर पिकांना येत नाही. रब्बीत गहू पेरला होता. काढणीसाठी एकरी 2 हजार रुपये खर्च आला. कारण आपल्याकडे गहूकाढणी मशीन पोहोचलं आहे. वेळ, श्रम आणि पैशाची त्यामुळे बचत होते. ज्वारीचं मात्र तसं नाही. काढणीसाठी मजुरांना विनवणी करावी लागते. आणि पैसाही अव्वाच्या सव्वा द्यावा लागतो. त्यामुळे ज्वारी काढणीचं मशीन तयार केलं पाहिजे."'

ज्वारीची काढणी प्रक्रिया किचकट आहे. पूर्वी ज्वारीचे धाट मुळापासून उपटून घेतले जात असे; पण आता विळ्याने कापणी करून घेतली जाते. धाट कापून त्याच्या पेंढ्या बांधल्या जातात. जेणेकरून धाट वाळून कडक होते. धाट वाळल्यानंतर कणीस खुडायला सोपे जाते. आणि जनावरांसाठी चांगला सुका चारा म्हणून कडबाही मिळतो. त्यानंतर कणीस एकत्र करून मळणीयंत्राच्या मदतीने काढणी केली जाते. मात्र, या प्रक्रियेत वेळ आणि खर्च वाढतो. त्यामुळे ज्वारीची काढणीयंत्राची गरज ज्वारी उत्पादक शेतकरी व्यक्त करतात. ज्वारी काढणीयंत्राचे प्रयत्न अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि हैदराबाद येथील ज्वारी संशोधन संस्थेकडून करण्यात आले होते. परंतु ,त्याला व्यावसायिक स्तरावर आणण्यात अडचण असल्याचे या क्षेत्रातील जाणकार सांगतात.

**अडचणी काय?**

जगभरात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व असे बदल घडून आले आहेत. त्याचा वापर कृषी क्षेत्रात केला जात आहे. जगातील सर्वांत मोठ्या ज्वारी उत्पादक अमेरिकेत यंत्राच्या मदतीने ज्वारी काढणी केली जाते. अमेरिकेत पशुखाद्य, जीवाश्म इंधन आणि मानवी खाद्यासाठी ज्वारीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. हजारो एकर क्षेत्र असल्याने अमेरिकेतील शेतकरी ज्वारी काढणीसाठी आकाराने मोठे यंत्र वापरतात. अशा प्रकारचे यंत्र भारतात आणता येऊ शकतात. परंतु, या यंत्रांचा आकार लक्षात घेता, अशा यंत्राने भारतातील छोट्या तुकड्यात विखुरलेल्या जमिनीच्या तुकड्यावर काढणी करणं शक्य नाही. देशात आजघडीला जवळपास 80 टक्के शेतकरी अल्प भूधारक आहेत. त्यामुळे क्षेत्राच्या आकाराची मर्यादा लक्षात घेऊन यंत्रनिर्मिती करावी लागेल, असं जाणकारांचं मत आहे.

ज्वारीच्या काढणीसाठी यांत्रिकीकरणाची दुसरी सर्वांत मोठी अडचण म्हणजे, ज्वारीच्या धाटाची उंची. देशात विविध संशोधन संस्थांनी विकसित केलेल्या वाणांमध्ये धाटांची उंची एकसारखी नाही. त्यात अन्य कारणांमुळेही धाटांची उंची एकसमान नसते. जमिनीतील पोषणमूल्य, जमिनीचा पोत, हवामानातील बदल, पाणी, खत आणि आंतरमशागत अशा विविध कारणांमुळे धाटांच्या उंचीत फरक येतो. अशा वेळी ज्वारी काढणीच्या यंत्राने कणीस आणि कडबा यांपैकी एकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे नुकसान झाले तर त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो. कृषी अभियांत्रिकी अभ्यासकांच्या मते, ज्वारीची उंची एकसारखी असेल तर त्यासाठी यंत्र तयार करणे शक्य होईल. मध्य प्रदेशमधील कृषी यांत्रिकीकरण संस्थेने

यंत्रनिर्मितीसाठी प्रयत्न केले होते. परंतु, ज्वारीच्या धाटांची उंची एकसारखी नसल्यामुळे तो प्रयोग अयशस्वी ठरला. कारण, यंत्राला मर्यादा असतात. ते स्वयंचलित असो वा मानवचालित. दर शंभर धाटांमध्ये सात ते आठ प्रकारच्या उंचीचे धाट येतात. अशा वेळी यंत्राचा फायदा होत नाही. ही अडचण ओळखून वाणनिर्मितीत आणि कृषी यांत्रिकीकरणात अग्रेसर असणाऱ्या देशातील संशोधन संस्थांनी काम करणे गरजेचं आहे.

तिसरी मर्यादा आर्थिक आहे, पिकाच्या काढणीयंत्राची किंमत जास्त असणे. त्यामुळे देशातील अल्प भूधारक शेतकरी ते खरेदी करू शकत नाहीत. त्यामुळे सरकारने अशा यंत्राची निर्मिती करण्यासाठी विशेष प्रयत्नाबरोबरच यंत्रावर अनुदान देणे गरजेचे आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाचे माजी कुलगुरू आणि कृषी यांत्रिकीकरणाचे तज्ज्ञ व्यंकट मायंदे सांगतात, “कृषी क्षेत्रात मजुरांची संख्या लक्षात घेता ज्वारी काढणीयंत्राची गरज आहे. त्या दृष्टीने विशेष प्रयत्न काही कृषी अभियांत्रिकी संशोधन संस्था करत आहेत. परंतु, त्याची व्यावहारिक बाजू लक्षात घेणे गरजेचे आहे. ज्वारीचं दिवसेंदिवस घटत जाणारं क्षेत्र चिंतेची बाब आहे. यंत्र तयार करताना जमिनीचा, पिकातील अन्नद्रव्यांचा आणि हवामानाचा विचार करावा लागतो. या बाबी लक्षात घेऊनच यंत्रं तयार केली जातात.”

संशोधन संस्थांच्या मर्यादा, हाही यामध्ये महत्त्वाचा मुद्दा आहे. संशोधन संस्थांमध्ये गुंतवणूक वाढवण्यासाठी सरकारच्या पातळीवर उदासीनता आहे. त्यामुळे संशोधकांनी विकसित केलेली यंत्रं प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यांचा प्रचार-प्रसार करण्यापासून ते व्यावसायिकीकरणापर्यंत अनास्था पाहायला मिळते. कृषी क्षेत्रात संशोधन आणि अत्याधुनिक पद्धतीच्या तंत्रज्ञानाची प्रचंड गरज निर्माण झालेली आहे. परंतु, अशा संशोधनाला गांभीर्याने घेण्याची गरज सरकारला वाटत नाही. त्यामुळे यांत्रिकीकरणाच्या क्षेत्रात संशोधन संस्थांनाही मोठी झोप घेताना मर्यादा येतात. परिणामी, दुय्यम दर्जाची आणि जुगाडू वृत्तीची सवय देशातील संशोधन संस्थांनाच लागली आहे. त्यामुळे आणीबाणीच्या प्रसंगी जुळवाजुळव करण्याची ‘जुगाड’ मानसिकता निर्माण होते. शेतकरी पांडुरंग कदम (ता. मंगळवेढा जि. सोलापूर) सांगतात, “माझ्याकडे रब्बीत मालदांडी ज्वारीची आठ एकरवर लागवड केलेली. आता उसाचं क्षेत्र काही भागात वाढलंय. त्यासोबतच



मजूर शेतातील कामासाठी मिळत नाही. शहरात जाऊन काम करण्यावर सगळ्यांचा भर आहे. ज्वारी काढणीसाठी दरवर्षी मजुराची अडचण येते. त्यामुळे दोन वर्षांपूर्वी ट्रॅक्टरला पुढच्या बाजूने लोखंडी जाळीचा फणा बसून ज्वारी उपटून घेतली. पण, त्यात नुकसान जास्त झालं. कडबा अर्ध्यातून तुटला. कणसाला फटका बसला. त्यामुळे संशोधन संस्थांनी अशा प्रकारचे यंत्र तयार करावे, अशी आमची मागणी आहे." पांडुरंग कदम प्रातिनिधिक उदाहरण आहे. त्यांच्यासारखे प्रयोग इतरही शेतकरी करत असतात. पण, केवळ गरज आहे म्हणून तयार करण्यात आलेल्या 'जुगाडा'तून दीर्घ काळ फायदेशीर ठरणारं यंत्र तयार होत नाही, असा काही प्रयोगशील शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

महाराष्ट्रासारख्या ज्वारी उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या राज्यातील संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठांमध्ये उपयुक्त संशोधन होणे अपेक्षित असते. परंतु, या संस्थाही अजगरासारख्या सुस्त आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षांत कृषी क्षेत्रात घडणाऱ्या बदलाची गती कासवासारखी आहे. आजही ज्वारी काढणीसाठी या संस्थांकडून लोखंडी 'चिमटा' शेतकऱ्यांना शिफारस केला जातो. तोही मानवचालित. या अवजाराचा वापर करण्यापेक्षा शेतकरी विळा किंवा कोयत्यानं ज्वारी काढणीला प्राधान्य देतात. शेतकरी सदानंद काटकुळे शिवाजीनगर येथील (ता. गंगाखेड, जि. परभणी) सांगतात, "रब्बीत दीड एकर ज्वारी होती. ती काढणीसाठी मजूर मिळत नव्हतं म्हणून शेजारच्या शेतकऱ्याने कृषी प्रदर्शनातून आणलेला लोखंडी चिमटा मागवून घेतला. कापसाची झाडं उपटून घेण्यासाठी वापरतात तशा आकाराचा चिमटा होता. दीड एकर ज्वारी उपटून घेण्यासाठी तीन दिवस लागले. श्रम आणि वेळेची अजिबात बचत झाली नाही. ज्वारी उपटून घेतल्यावर वाटलं, यापेक्षा कोयत्यानं वा विळ्यानं कापून घेतली असती तर वेळ आणि श्रमाची बचत झाली असती. यंदा ज्वारी घ्यायची (पेरणी करणार नाही) नाही. पक्कं ठरवलंय." अशी व्यथा सर्वच ज्वारी उत्पादक शेतकरी व्यक्त करतात. शेतकऱ्यांची श्रम आणि वेळेची बचत करण्याची अपेक्षा अत्यंत व्यावहारिक आहे. परंतु, त्याची दखल घेऊन त्यावर उपाय शोधायला अजगरासारख्या सुस्त पडलेल्या यंत्रणेला वेळ नाही की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून आडकाठी केली जाते की काय, अशी शंका घ्यायला जागा आहे. खाजगी यंत्रनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना असं यंत्र तयार करण्यात 'अर्थ' दिसत नाही. त्यामुळे त्यांच्याकडून यात भरीव असं काही होण्याची सुतराम शक्यता नाही. अशा वेळी जबाबदारी येते ती सरकारची. मानवयंत्राच्या मदतीने शेती कामे करण्याचा ध्यास घेऊन जगभरातील नामांकित संस्था काम करत आहेत. परंतु, केंद्र सरकारला मात्र त्यात स्वारस्य दिसत नाही.

कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, रोबोटिक्सचा वापर शेतीक्षेत्रात होऊ लागला आहे. देशात मात्र ज्वारीसारख्या पिकांच्या काढणीसाठी तंत्रज्ञानच अजूनही विकसित करण्यात सरकार, संशोधन संस्था आणि खाजगी कंपन्यांना यश आलेलं नाही. जागतिक भरडधान्य वर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेवर नजर फिरवली तरी तंत्रज्ञानाच्या बाबत असलेली उदासीनता डोळ्यांत ठळकपणे भरते. त्यामुळे इतक्या उदासीन पद्धतीने यांत्रिकीकरणाचा विचार करून चालणार नाही. ज्वारीचं उत्पादन वाढवण्यासाठी पूरक स्थिती निर्माण करावी लागेल आणि त्यासाठी सरकारला कंबर कसून मैदानात उतरावे लागेल. अन्यथा, भरडधान्य वर्ष पुन्हा एकदा 'बोलाचा भात आणि बोलाचीच कढी' ठरल्याशिवाय राहणार नाही, यात तिळमात्र शंका नाही.

**धनंजय सानप, पुणे**
dhananjaysanap1@gmail.com
Mob. 9850901073

*(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने २०२१मध्ये शरदचंद्र पवार इन्स्पायर फेलोशिप ललित वैचारिक (नॉनफिक्शन) अभ्यास-संशोधनासाठी तीन तरुणांना दिली होती. त्यातील एक असलेल्या धनंजय सानप याने 'ज्वारी' या पिकाचा विविधांगी अभ्यास केला असून, त्यावर आधारित लिहिलेली १० ते १२ भागांची मालिका 'साधना'तून 'ज्वारीची कहाणी' या नावाने पुढील अडीच-तीन महिन्यांत क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.)*
*- संपादक)*


Date of Posting : 1-1-2024

इंग्रजी पुस्तक

जी. डी. पारेखअ

# सर्व काही सत्तेसाठी...

इंदिरा गांधी-राजनारायण-नरसिंह राव-वाजपेयी-राजीव गांधी- बाळासाहेब व भाऊराव देवरस-सोनिया गांधी- व्ही.पी.सिंग इत्यादी टोकाचे राजकीय विरोधक जेव्हा एकमेकांना सहकार्य करण्याच्या भूमिकेत दिसतात, तेव्हा मन चक्रावून जाते. ज्या राजनारायण यांनी इंदिरा गांधींच्या निवडणुकीविरुद्ध खटला भरून त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करवले व त्यांना पुढील सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र ठरवले; त्याच राजनारायण यांनी आपल्याच पक्षातील विरोधकांचा काटा काढण्यासाठी इंदिरा गांधींना आपल्या मदतीचा हात पुढे केला आणि इंदिरा गांधींनी त्यांच्या मदतीने जनता पक्षात फूट पाडण्याचा डाव साधला. पंतप्रधान पदावरून पायउतार झालेले नरसिंह राव विरोधी पक्षांतर्फे झालेल्या पंतप्रधान वाजपेयींना अणुबॉम्ब तयार आहे, याची माहिती देऊन त्याचा स्फोट करण्यासाठी वाजपेयींचा पाठपुरावा करताना दिसतात. तर, आपल्याच पक्षातील अडवाणींना पाठिंबा देणाऱ्या कल्याण सिंग यांना उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याची संधी मिळणार नाही, याची तजवीज करण्यासाठी वाजपेयी नरसिंह राव पंतप्रधानपदी असताना त्यांना साकडे घालताना दिसतात. आणीबाणीच्या काळात तुरुंगात असलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन अध्यक्ष बाळासाहेब देवरस इंदिरा गांधींना सहकार्य करण्याची भाषा करतात व त्यासाठी केवळ पत्र देऊन थांबत नाहीत; तर आपले बंधू भाऊराव देवरस यांच्यातर्फे इंदिरा गांधी व राजीव गांधींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात. राजीव गांधी अनेकदा भाऊराव देवरस यांना वाकून नमस्कार करताना दिसतात. एवढेच नाही, तर राजीव गांधी भाऊराव देवरस यांना आलिशान मोटार भेट देताना दिसतात. ज्या गांधी-नेहरू कुटुंबांचा संघ परिवार हिंदुत्वाचा विरोधक म्हणून द्वेष करताना दिसतो व त्याच कारणासाठी राहुल गांधींना पाण्यात पाहताना त्याच गांधी-नेहरू परिवारातील इंदिरा गांधी, बांगलादेशच्या निर्मितीच्या लढ्यावेळी दाखवलेल्या कणखर नेतृत्वाचे श्रेय हिंदू तत्त्वज्ञानाला देताना दिसतात. एवढेच नव्हे तर, आपल्या प्रसंगाच्या आणि अडचणीच्या वेळी अनेक देवदेवतांचा धावा करताना महंत-महाराजांचा आशीर्वाद घेताना दिसतात. त्याच परिवारातील राजीव गांधी भाऊराव देवरसांच्या सल्ल्यानुसार आयोध्यातील रामलल्लाच्या दर्शनासाठी दरवाजा उघडण्याची व्यवस्था करताना दिसतात. तसेच, त्या वेळच्या संबंधित मंत्र्यांचा विरोध डावलून टीव्हीवर

देशाच्या राजकारणात आमूलाग्र बदल करणारे वेगवेगळ्या पंतप्रधानांनी घेतलेले ऐतिहासिक निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतले? त्याची प्रक्रिया काय होती? त्यामध्ये कोणत्या गोष्टींचा प्रभाव होता? त्या त्या पंतप्रधानांच्या मतांचा व विचारसरणीचा भाग किती होता? यामागे मूळ व तात्कालिक प्रेरणा कोणती होती? या सर्व गोष्टींवर लेखिका अतिशय सबळ पुराव्यानिशी प्रकाश टाकतात. नीरजा चौधरी या पुरस्कारप्राप्त पत्रकार, स्तंभलेखक व निष्णात राजकीय विश्लेषक आहेत.त्यांच्या चाळीस वर्षांच्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत त्या 'इंडियन एक्स्प्रेस' या इंग्रजी दैनिकाच्या राजकीय विभागाच्या संपादक होत्या. सदर पुस्तकात त्यांनी देशाच्या इतिहासाची दिशा बदलणाऱ्या वेगवेगळ्या पंतप्रधानांनी घेतलेल्या सहा महत्त्वाच्या निर्णयप्रक्रियांवर सखोल भाष्य केलेले आहे.

रामायण मालिका दाखविण्याची संमती देतात. ज्या व्ही. पी. सिंग यांनी बोफोर्स प्रकरणावरून राजीव गांधी यांना निवडणुकीत बहुमत मिळू दिले नाही, त्या व्ही.पी. सिंग यांचा सल्ला सोनिया गांधी आपण पंतप्रधानपद स्वीकारावे की नाही, यासाठी घेताना दिसतात. एवढेच नाही, तर तसा सल्ला सोनिया गांधी वाजपेयींकडेही विश्वासाने मागताना दिसतात. असे एका मागोमाग एक धक्के लेखिका नीरजा चौधरी आपल्या 'हाऊ प्राइम मिनिस्टर डिसाइड्स' (How Prime minister Decides) या पुस्तकात सहजपणे देतात. शेरलॉक होम्स किंवा आपल्याकडील बाबूराव अर्नाळकर आदी रहस्यकथा-लेखकांना मागे टाकेल अशी अनेक रहस्यांमागोमाग रहस्ये नीरजा चौधरी आपल्या पुढे उलगडत असतात. अणुबॉम्ब स्फोटात किंवा त्यासंबंधीच्या धोरणाचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये त्या वेळचे पंतप्रधान, संबंधित प्रशासकीय अधिकारी व शास्त्रज्ञ त्यासंबंधी किती गुप्तता पाळतात हेही पाहण्यासारखे आहे. कधी अशी सल्लामसलत देशाच्या राजधानीबाहेर आपल्या देशात जाऊन, एवढेच नाही- तर अन्य देशांत जाऊनही करताना दिसतात.

देशाच्या राजकारणात आमूलाग्र बदल करणारे वेगवेगळ्या पंतप्रधानांनी घेतलेले ऐतिहासिक निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतले? त्याची प्रक्रिया काय होती? त्यामध्ये कोणत्या गोष्टींचा प्रभाव होता? त्या त्या पंतप्रधानांच्या मतांचा व विचारसरणीचा भाग किती होता? यामागे मूळ व तात्कालिक प्रेरणा कोणती होती? या सर्व गोष्टींवर लेखिका अतिशय सबळ पुराव्यानिशी प्रकाश टाकतात. नीरजा चौधरी या पुरस्कारप्राप्त पत्रकार, स्तंभलेखक व निष्णात राजकीय विश्लेषक आहेत. त्यांच्या चाळीस वर्षांच्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत त्या 'इंडियन एक्स्प्रेस' या इंग्रजी दैनिकाच्या राजकीय विभागाच्या संपादक होत्या. सदर पुस्तकात त्यांनी देशाच्या इतिहासाची दिशा बदलणाऱ्या वेगवेगळ्या पंतप्रधानांनी घेतलेल्या सहा महत्त्वाच्या निर्णयप्रक्रियांवर सखोल भाष्य केलेले आहे. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीत दारुण पराभव झालेल्या इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर येण्यासाठी कोणती रणनीती वापरतात? सर्वोच्च न्यायालयाचा शहाबानो खटल्याचा निकाल दुरुस्ती करण्याच्या नादात निधर्मी राजीव गांधी कोणती घोडचूक करतात? तत्त्वतः आरक्षणास विरोध असणारे व्ही.पी. सिंग आपली सत्ता कायम राखण्यासाठी देशाच्या राजकीय सत्तेचा पट बदलणाऱ्या मंडल आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय कशा स्वरूपात घेतात? पी.व्ही. नरसिंहरावांच्या अनेक सूत्रांनी सांगूनही निर्णय न घेता स्थितप्रज्ञ राहण्यामुळे बाबरी मशीदचे पतन कसे होते आणि परिणामतः त्यामुळे संपूर्ण राजकारण कसे बदलते? मोरारजी देसाई पंतप्रधान असताना अणुस्फोट न करण्याच्या त्यांच्या धोरणाला पाठिंबा देणारे त्या वेळच्या राजकीय समितीतील सदस्य व शांतताप्रिय असलेले वाजपेयी अणुस्फोट कसा घडवतात? सर्वांत 'कमकुवत पंतप्रधान' म्हणून संभावना करण्यात आलेले मनमोहन सिंग पक्षातील व पक्षाबाहेरील विरोधांना डावलून अणु करारासारखा ऐतिहासिक निर्णय कसा घेतात आणि भारत व अमेरिका यांच्यातील राजकीय मैत्रीची प्रक्रिया कशी सुरू करतात? या सर्व घटनांचे जवळपास परिपूर्ण दर्शन घडते. त्या त्या वेळेची, त्या त्या पंतप्रधानांची मानसिकता, अपरिहार्यता आणि या सर्व निर्णयप्रक्रियेमध्ये प्रभाव टाकणारे असंख्य घटक यांसंबंधीचे बारीकसारीक तपशील आपल्या समोर उलगडतात. त्यासाठी पंतप्रधान, राजकारणातील महत्त्वाच्या व्यक्ती, प्रशासकीय अधिकारी, धोरणकर्ते आणि मध्यस्थी- अशा शेकडो व्यक्तींच्या मुलाखती नीरजा चौधरी घेताना दिसतात. अशा निर्णयप्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे काही लॉबी कशा कार्यरत असतात हे पाहण्यासारखे आहे. जेव्हा अशी निर्णयप्रक्रिया दुसऱ्या देशाशी संबंधित असते तेव्हा दोन्ही देशांतील मध्यस्थ कशी सूत्रे हलवतात हे पाहणेही मनोज्ञ आहे.

बाबरी मशीद आणि अयोध्येचे राम मंदिर या संबंधातील हिंदू-मुस्लिमांचा वाद सामोपचाराने मिटणे शक्य असूनही तो का मिटत नाही? अशा तडजोडींसाठी अनेकांनी केलेले प्रयत्न वाया कसे जातात? अशी तडजोड दृष्टिपथात आलेली असताना त्या त्या काळच्या संबंधित राजकीय व्यक्तींनी, पंतप्रधानांनी व संबंधित संघटनेतील नेत्यांनी यासंबंधीचे श्रेय केवळ आपल्याला मिळणार नाही, म्हणून अशा तडजोडींपासून कसे दूर होतात? एवढेच नव्हे, तर त्या त्या वेळेच्या संबंधित न्यायालयाने निर्णय प्रक्रियेसाठी केलेली दिरंगाई किंवा काही वेळा घेतलेले विवादास्पद निर्णय हे सारे




पाहणे अतिशय क्लेशकारक आहे. वर उल्लेख केलेले अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक निर्णय अथवा न-निर्णय या सर्वांमागे सत्ता मिळवणे अथवा कायम राखणे, ही एकच प्रेरणा दिसते आणि सर्व राजकारण्यांचे पाय मातीचेच असतात किंवा काही वेळा तर ते चिखलाचेच असावेत असे जाणवते.

या सर्व सत्तेच्या सारीपाटात काही वेळा दुर्मीळ असे माणुसकीचे दर्शनही घडताना दिसते. वाजपेयींची भावी पंतप्रधान म्हणून परदेशी पाहुण्यांना ओळख करून देणारे नेहरू किंवा तेच वाजपेयी शिवराज पाटील यांच्या मतदारसंघात त्यांच्या विरोधी निवडणूक प्रचारात शिवराज पाटील यांच्या चांगल्या कामाचीही वाखाणणी करताना दिसतात. वाजपेयींना किडनीचा आजार आहे हे समजताच त्यांच्यावर अधिक चांगले उपचार व्हावेत म्हणून अमेरिकेत जाणाऱ्या शिष्टमंडळात त्यांचा समावेश करणारे राजीव गांधी, त्याची कृतज्ञतापूर्वक वाच्यता त्यांच्या श्रद्धांजलीसभेत करणारे वाजपेयी. राजकारण्यांची अशीही काही विलोभनीय रूपे दिसतात. राष्ट्रापुढील गंभीर प्रसंगांना तोंड देताना सत्ताधारी विरोधकांची कशी मदत घेतात आणि विरोधकही त्यांना कशी मदत करतात हेही पाहण्यासारखे आहे. बांगलादेश निर्मितीच्या वेळी त्या वेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आपल्या अमेरिकाभेटीत तेथील राज्यकर्त्यांचा विरोधी सूर पाहून भारतात आल्या आल्या वाजपेयींना बोलावून त्यांना भारताचे प्रतिनिधी म्हणून युनोमध्ये भाषण करण्यासाठी पाठवतात आणि भारताच्या त्या वेळचे निर्णयाचे समर्थन करणाऱ्या वाजपेयींना पाहून त्या वेळचे अमेरिकी राज्यकर्ते अचंबित होतात. ज्या अणुस्फोटाचा स्फोट काही विशिष्ट कारणामुळे आपल्या कारकिर्दीत करता आला नाही, ते नरसिंह राव ठरावीक कालावधीच्या आत स्फोट करणे कसे जरुरीचे आहे ते वाजपेयींना समजावून सांगतात आणि वाजपेयी त्याचा स्फोट घडवितात. दुर्दैवाने, ती राजकारणाची पातळी आणि तो राजकारणाचा दर्जा आज पाहावयास मिळत नाही.

सदरचे पुस्तक वाचताना जणू काही अनेक प्रसंग आपल्या डोळ्यांसमोरच घडत आहेत किंवा व्हिडिओद्वारे आपण त्याचा चलत्‌चित्रपट पाहत आहोत, असा भास होतो. नीरजा चौधरी यांनी त्या त्या वेळेच्या ऋतुमानाप्रमाणे त्या त्या ठिकाणच्या, त्या त्या दिवसाचे, हवामानाचे स्वरूपवर्णन केले आहे. इतकेच नव्हे, तर त्या त्या स्थळाचे- मग ते पंतप्रधानांचे कार्यालय अथवा घर असो किंवा अन्य ठिकाण असो; अशा तऱ्हेने वर्णन करतात की, लेखिका तिथे प्रत्यक्ष हजर होत्या. असंख्य मुलाखतींद्वारे सर्वच बाबतींतील बारीकसारीक तपशील मिळवून ते अतिशय रंजकतेने मांडल्यामुळे पुस्तक अतिशय वाचनीय झाले आहे. मुलाखत किंवा संबंधित माहिती पुरवणाऱ्या व्यक्तींपैकी बहुतेक व्यक्ती या त्या त्या निर्णयाच्या प्रक्रियेशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संबंधित होत्या. त्यामुळे सर्व लेखनाला वस्तुनिष्ठ स्वरूप प्राप्त झाले आहे.

बऱ्याच दिवसांनी राजकारणावर एक अप्रतिम पुस्तक वाचावयास मिळाले आहे याचा आनंद अवर्णनीय आहे. देशाचा इतिहास आमूलाग्र बदलणारे राजकीय निर्णय कशा तऱ्हेने घेतले जातात हे प्रत्येक नागरिकास राजकीय साक्षरतेच्या दृष्टीने माहीत असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रत्येक नागरिकाने हे पुस्तक वाचावे असे वाटते.

**जी. डी. पारेख, पुणे**
janataweekly@gmail.com
Mob. 9769598026

# प्रतिसाद

## देश सेक्युलर होण्यासाठी शहामृगी धोरण सुसंगत होऊ शकते?

9 डिसेंबरच्या अंकात '2047 या वर्षाच्या भारताविषयीची माझी कल्पना' हा न्या.ए.पी.शहा यांचा लेख वाचला. ते म्हणतात, ''संविधान ठामपणे धर्मनिरपेक्ष व समतावादी आहे. संविधानामध्ये अनेकविध मार्गांनी धर्मनिरपेक्षता रुजवली. त्याचप्रमाणे पाश्चात्त्य राष्ट्रांमधील चर्च व राज्यसंस्था यांमध्ये फारकत करणाऱ्या धर्मनिरपेक्षतेहून वेगळ्या प्रकारचं धर्मनिरपेक्षतेचं भारतीय प्रारूप त्यांनी मांडलं.''

धर्मनिरपेक्षतेचं वेगळ्या प्रकारचं भारतीय प्रारूप घटनाकारांनी भारतीय संविधानामध्ये मांडलं आहे म्हणजे नेमकं काय, याचे विश्लेषण लेखकाने केलेलं नाही. किंबहुना असे म्हणता येईल की, पाश्चात्त्य राष्ट्रांमधील चर्च व राज्यसंस्था यांमध्ये फारकत करणाऱ्या धर्मनिरपेक्षतेचेच प्रारूप भारतीय संविधानामध्ये मांडलं गेलं असतं, तर गेल्या 75 वर्षांमध्ये जो काही जातीयवादाचा आगडोंब या देशामध्ये उसळला आहे तो उसळला गेला नसता आणि भारतामध्ये खरीखुरी धर्मनिरपेक्षता राबवली गेली असती.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेली सत्तर वर्षे इहवाद (सेक्युलॅरिझम) आणि इहवादी राज्य (सेक्युलर स्टेट) या दोन संकल्पना भारतीय राजकारणातील परवलीचा शब्द बनल्या आहेत. त्यांच्या बरोबरीने 'सर्वधर्म समभाव' या आणखी एका शब्दाने ठाण मांडले आहे. तथापि, सहसा असे आढळून येते की, या सर्व संकल्पनांचा वापर अतिशय संदिग्धपणे होतो आणि इहवादी (सेक्युलर) राज्य म्हणजे नेमके काय– तसेच इहवादी राज्यात शासनाचे धोरण काय असावे, यासंबंधात एकूणच वातावरण गोंधळाचे आहे. त्यामुळे प्रत्येक जण 'इहवादी राज्य' याचा अर्थ आपल्या समजुतीप्रमाणे किंवा राजकीय सोयीप्रमाणे लावतो. साहजिकच इहवादी राज्याची संकल्पना वेगवेगळ्या लोकांना निरनिराळ्या तऱ्हेने प्रतीत होते.

भारत हे इहवादी राज्य असल्याचे 'उद्देशिके'त (pre-amble) म्हटले आहे. पण, इहवादी राज्य म्हणजे नेमके काय याचा उल्लेख घटनेत नाही. इहवादी राज्यांमध्ये राजनिष्ठा धर्मनिष्ठेपेक्षा श्रेष्ठ आहे आणि दोहोंमध्ये संघर्ष आला तर राजनिष्ठा धर्मनिष्ठेच्या वरचढ राहिली पाहिजे. एखाद्या धार्मिक गटाची धर्मनिष्ठा राजनिष्ठेपेक्षा बळकट असेल तर त्या गटाचे राजकीय अवसान नष्ट करणे हे इहवादी राज्याचे आद्य कर्तव्य आहे. अशा अवसानाचे मूळ धर्मात असेल तर त्या धर्मातही हस्तक्षेप करावा लागेल. साहजिकच स्वातंत्र्यानंतर इहवादी राज्याच्या कल्पना धार्मिक गटांच्या गळी उतरवणे आपल्या देशाच्या नेत्यांचे प्रथम कर्तव्य होते. म्हणून सर्व धर्मग्रंथांचे / प्रथांचे / रूढींचे अत्यंत तर्ककठोर मूल्यमापन होणे अत्यंत आवश्यक होते. धर्मग्रंथातील कोणताही भाग / रूढी / प्रथा/ नियम जर घटनेविरुद्ध असेल तर त्यांना घटनाबाह्य जाहीर करणे आवश्यक होते.

सेक्युलॅरिझमचा अर्थ शासनाची प्रत्येक कृती धर्मनिरपेक्ष ठेवणे एवढाच होतो. पण, सेक्युलॅरिझम म्हणजे 'सर्वधर्म समभाव' असा सर्वथा चुकीचा अर्थ आपल्या देशात रूढ झाला आहे. सर्व धर्म (रिलिजन या अर्थाने) समान असूच शकत नाहीत. तसे ते असते तर त्यांच्यात एवढी निकराची भांडणे झालीच नसती. हिंदू धर्म इतर धर्मसंबंधात उदार व सहिष्णू असेल; परंतु इतर एकग्रंथी बंदिस्त धर्म हे अन्य धर्मांबाबत अनुदार व असहिष्णू असल्याचे सतत प्रत्ययाला येते. किंबहुना– याच कारणामुळे भारतात खऱ्या सेक्युलर संविधानाची गरज आहे.

सेक्युलॅरिझमचे आपल्याला सोईस्कर असे अर्थ सर्वांनीच निवडणुकांतील मताच्यां राजकारणासाठी वापरले. उदा., तुष्टीकरण; शहाबानो केसमधील सुप्रीम कोर्टाचा निकाल लोकसभेत विशेष विधेयक संमत करून बदलण्यात आला. मनमोहन सिंग यांनी जाहीरपणे म्हणतात, ''या देशाच्या संसाधनावर मुसलमानांचा प्रथम अधिकार आहे''. हे सेक्युलर स्टेटचे लक्षण होऊ शकते काय?

भारतीय संविधान खरेखुरे धर्मनिरपेक्ष होण्यासाठी खालील तरतुदी आवश्यक होत्या. 1) राज्याचे ऐहिक


Date of Posting : 1-1-2024

हितसंबंध आणि धर्माज्ञा यांच्यात संघर्ष आल्यास धर्माज्ञा प्रभावहीन असेल. 2) ऐहिक हितसंबधाची व्याप्ती ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना असेल.

संपूर्ण देशासाठी समान नागरी कायदा न आणता फक्त हिंदू कोड बिलासारखे सामाजिक न्यायाचे कायदे फक्त हिंदूसाठीच करणे व मुसलमानांच्या बाबतीत 'त्यांचे त्यांना ठरवू दे', अशी भूमिका घेणे हे 'शहामृगी धोरण' देश सेक्युलर होण्यासाठी कसे सुसंगत होऊ शकते?

**संजय लडगे,** बेळगाव

## न्यायमूर्ती महोदय, तुम्ही ते विसरलात?

'साधना' शनिवार 9 डिसेंबर 23मधील '2047 या वर्षाच्या भारताविषयीची माझी कल्पना', हा न्या.ए.पी.शहा यांचा लेख वाचला.

ते म्हणतात, ''हिंदूंना भारतातील त्यांची जागा कधीही नाकारली जाऊ शकत नाही. भारतात हिंदू धर्माला कोणत्याही प्रकारच्या संकटाला सामोरं जावं लागल्याचा काहीही पुरावा नाही.''

काश्मीरमधील पाच लाख पंडितांना रातोरात आपली मायभूमी सोडून दिल्ली येथे निर्वासित छावणीमध्ये राहावे लागले, हे न्यायाधीशसाहेब विसरलेले दिसतात. त्या वेळी लाउडस्पीकरवरून कोणत्या घोषणा दिल्या गेल्या याबाबत यांना काहीच कशी माहिती नाही? केरळमधील मल्लपुरम जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी शरियत कायदा चालतो व रमजानच्या काळात हिंदूंना आपली हॉटेलं बंद ठेवावी लागतात याची कल्पना नाही काय? सरदार पटेल लखनौ येथील भाषणात म्हणाले, ''मी तुम्हांला स्वच्छपणे सांगतो की, तुम्ही केवळ भारतावर निष्ठा आहे असं म्हणून गप्प बसणं पुरेसं नाही. तुम्ही व्यवहारात तसं दाखवून दिलं पाहिजे.'' यावर मुसलमान पुढाऱ्यांनी गांधीजींकडे तक्रार केली. गांधीजींनी स्पष्ट भाषेत सांगितले, ''आपल्या आचरणाने सरदारांचे विधान चुकीचे आहे, असे मुसलमानांनी दाखवून दिले पाहिजे.'' (त्यांना समजून घेताना, चपळगावकर, पृ.137) गेल्या सत्तर वर्षांत भारतीय मुसलमानांनी असे आचरणात आणून दाखवून दिले आहे, याचे एक तरी उदाहरण न्या.ए.पी. शहा यांनी दाखवावे. शहा यांचा लेख पराकोटीचा एकांगी आहे. शेवटी त्यांना (ते माजी न्यायाधीश असूनही) एवढेच सांगावेसे वाटते की, धर्मनिरपेक्षता हा घटनात्मक तरतुदीचा भाग नसून तो व्यक्तिमत्त्वाचा स्वभावविशेष आहे, (जी एक नैतिक व्यवस्था आहे) आणि तो हिंदूइतकाच अल्पसंख्यकांनाही लागू आहे, हे भारतातील कथित पुरोगाम्यांना समजत नाही, ही भारताची वैचारिक शोकांतिका आहे

**किशोर काकडे,** बेळगाव.

## पुढील काही दशके भाजपचीच सत्ता?

'पाचही राज्यांनी दिलेला कौल 2018च्या विरुद्ध!' हे संपादकीय ('साधना', दि. 16 डिसेंबर) वाचले. भाजपचे राजकारण नेहमी गाय, गीता आणि गंगा यांभोवतीच घिरट्या घालत असते. बहुसंख्याकवादी राजकीय समीकरण यामागे आहेत आणि यास कमालीचे यशदेखील मिळताना दिसते. उत्तर भारतातील 'काऊ बेल्ट' म्हणून ओळखल्या जात असलेल्या काही राज्यांपैकी मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड विधानसभा निवडणुकांत भाजपने मिळविलेले निर्विवाद बहुमत हे याच समीकरणाचे यश आहे. तथापि, राजस्थानने आपली आलटून पालटून सत्ताबदलाची परंपरा या वेळी म्हणजेच सहाव्यांदादेखील कायम ठेवली आहे. मध्य प्रदेशातील शिवराजसिंग चौहान सरकारची मागील अठरा वर्षांपासूनची 'ॲन्टी इन्कम्बसी' – जनतेचा प्रस्थापितांविरोधी असंतोष काँग्रेस पक्षास मतदानामध्ये परावर्तित करता आली नाही हे या पक्षाचे मोठेच अपयशच म्हणावे लागेल. काँग्रेस पक्षाचे मुख्यमंत्रिपदाचे प्रबळ दावेदार कमलनाथ हे बागेश्वर बाबादरबारी हजेरी लावून 'सॉफ्ट हिंदुत्वा'चे कार्ड खेळताना दिसले. हिंुत्वाच्याच मुद्द्यावर मतदान करायचे तर जनता मवाळ हिंदुत्वाला मतदान करण्यापेक्षा भाजपसारख्या कडव्या आणि प्रखर हिंदुत्ववादी पक्षास मतदान करणार नाही का, इतका साधा प्रश्न; पण तो समजून घेण्याची कमाल बौद्धिक पातळी काँग्रेस पक्षाकडे नाही, हे या पक्षाचे आणि देशाचेही दुर्दैव आहे. दुसरा मुद्दा म्हणजे जर अटीतटीच्या लढाईत काँग्रेस पक्षास काठावरचे बहुमत मिळाले तर तोच 'ऑपरेशन लोटस'चा खेळ पुन्हा नको; त्यापेक्षा भाजपासच थेट बहुमत द्या! असा विचार मध्य

प्रदेशातील मतदारांनी केला असण्याची शक्यता अगदीच नाकारता येत नाही. काँग्रेस पक्षास छत्तीसगडमधील सत्ता राखता आली नाही; तिथे अति आत्मविश्वास नडला– हे निकालाअंती पुरेसे स्पष्ट होते.

काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस आणि आयटी सेलचे प्रमुख जयराम रमेश यांनी तर 20 वर्षांपूर्वी काँग्रेस पक्षाने मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ गमावले होते. पण, यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वांत मोठा पक्ष म्हणून काँग्रेस पक्ष निवडून आला होता, असे तर्कट मांडून, काँग्रेस पक्ष आपल्या कथित देदीप्यमान इतिहासातून बाहेर न पडण्याच्या आणि पराभवातून अद्याप काहीही बोध न घेण्याच्या मानसिकतेतच आहे, हेच दिसून येते. तसेच, काँग्रेस पक्ष आणि समर्थक मंडळी पराभव झालेल्या तीनही राज्यांत काँग्रेस पक्षास मिळालेला चाळीस टक्के मतांच्या आकडेवारीचा दाखला देताना दिसतात. पण, जिथे दोन पक्षांत सरळ सामना असतो तिथे विजयी पक्षास चाळीस टक्क्यांहून अधिक, तर दुसऱ्या क्रमांकावरील पक्षास चाळीस वा चाळीस टक्क्यांच्या आसपास मते पडतात, हे इथे लक्षात घेणे गरजेचे आहे.

‘पडलो तरी नाक वर’, अशीही या पक्षाची ही अवस्था म्हणता येईल. महत्त्वाची बाब म्हणजे 2024च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचा हा विजय ‘खुंटी बळकट करणारा’ आहे. हिंदीबहुल भागांत भाजपने विजयाची कमाल पातळी 2014 आणि 2019च्या लोकसभा निवडणुकांत गाठली आहे आणि याचीच पुनरावृत्ती 2024च्या लोकसभा निवडणुकांत होण्याची दाट शक्यता आहे. कारण, जानेवारी महिन्यात राम मंदिर लोकार्पण होणार आहे. ‘रामज्वर’ भारतभर पसरवला जाणार आहे. त्यातून जनता राम मंदिर लोकार्पण सोहळ्यात कशी मशगूल राहील याची दक्षता सरकारी पातळीवर घेतली जाईल! ‘विकास पुरुष’ ते ‘अच्छे दिन’ ते ‘अयोध्यावारी’ असा हा मोदींचा संक्रमणकाळ म्हणता येईल.

सरतेशेवटी, उत्तर भारतातील भाजपचे संघटन कौशल्य आणि मोदींचा करिश्मा दक्षिण भारतात चालत नाही; यावर आनंद वा समाधान मानण्यापेक्षाही खरे तर भाजपेतर पक्षांची चिंता वाढवणारी बाब आहे. कारण, 2026मध्ये देशभरातील मतदारसंघ बदलणार, कदाचित त्यांची संख्या ‘सेंट्रल व्हिस्टा’मधील लोकसभेच्या क्षमतेएवढी – म्हणजे आठशेपार होणार. 2021च्या वा नव्या आणि रखडलेल्या (की रखडवलेल्या?) जनजणनेअनुसार लोकसभेत हिंदी भाषक राज्यांचे प्रतिनिधी कदाचित 50 टक्क्यांहून अधिक आणि दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधी 25 टक्क्यांहून कमी असतील, अशी एक साधार भीती व्यक्त केली जात आहे. लोकसंख्येच्या आधारावर प्रत्येक राज्यातील लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्याचा विचार वास्तवात उतरला, तर दक्षिणेकडील राज्याचा केंद्रीय सत्तारचनेतील प्रभाव कमी होईल आणि उत्तरेकडील हिंदी भाषक राज्यांचा केंद्रीय सत्तारचनेतील प्रभाव आणखी वाढेल; जो भाजपच्या ‘देशात पुढील काही दशके आमचीच सत्ता असणार!’ या दाव्यास बळच पुरवणारा ठरणार आहे.

**बाळकृष्ण शिंदे**, पुणे

## तो इशारा काळाने बरोबर ठरवला...

‘साधना’चा 9 डिसेंबर 2023चा अंक वाचला. बबनराव ढाकणे यांनी विधानसभेत टाकलेले पत्रक आणि त्या निमित्ताने विधानसभेत झालेली चर्चा महत्त्वाची आहे. या पत्रकातील ‘प्रतिनिधी निवडता येतात, पण परत बोलवता येत नाहीत’, हा मुद्दा त्यांची दूरदृष्टी दाखवतो. या पत्रकातील मुद्द्यांचा पुन्हा एकदा विचार होणे आवश्यक आहे. विधानसभेतील चर्चेतील कृष्णा देसाई यांचे भाषण आणि त्यांनी अंतुले यांच्या संदर्भात दिलेला इशारा काळाने बरोबरच ठरवला, असे म्हणता येईल.

याच अंकात राजन हर्षे यांचा ‘ध्येयासाठी मरणे सोपे जगणे अवघड’ हा लेखही वाचला. त्या लेखातील हृदय बंद पडण्याचा अनुभव आणि मृत्यूच्या दारातील क्षण विलक्षणच!

या लेखातील हर्षे यांचे मनमोहन सिंग, इंद्रकुमार गुजराल आणि प्रणव मुखर्जी यांच्या बरोबरचे अनुभव महत्त्वाचे आहेत. एकूण अंक बौद्धिक मेजवानी देणारा ठरला.

**श्रीनिवास भोंग**, संगमनेर, जि. अहमदनगर


Date of Posting : 1-1-2024

# 2023 मध्ये साधना प्रकाशनाने काय दिले?

2023 या वर्षभरात साधना प्रकाशनात एकूण 37 पुस्तके दाखल झाली आहेत, ती पुस्तके तीन प्रकारांत विभागता येतील.

पहिला विभाग : साधना साप्ताहिकातील लेखमाला किंवा विशेष अंक यांना दिलेले पुस्तकरूप.

या विभागात 10 पुस्तके आलेली आहेत. त्यातील सहा पुस्तके मुलाखतींचे संग्रह आहेत, तर चार पुस्तके लेखसंग्रह आहेत.

'धर्मरेषा ओलांडताना' या पुस्तकात 'कर्तव्य साधना'वर प्रसिद्ध झालेल्या 15 आंतरधर्मीय विवाहित जोडप्यांच्या मुलाखती आहेत, या सर्व मुलाखती हिना कौसर खान यांनी घेतलेल्या आहेत. 'केशवरावांच्या मुलाखती' हे पुस्तक म्हणजे विनोद शिरसाठ यांनी 2020-21मध्ये साधना साप्ताहिकाच्या संपादकीय जागेवर लिहिलेल्या अकरा मुलाखतींचा संग्रह आहे. 'तीन संपादकांच्या मुलाखती' या पुस्तकात 'द हिंदू'चे एन. राम., 'इंडियन एक्स्प्रेस' व 'द प्रिंट'चे शेखर गुप्ता, आणि 'द स्क्रोल'चे नरेश फर्नांडिस या तिघांच्या दीर्घ मुलाखती आहेत. या तिघांच्या इंग्रजी मुलाखती घेतल्या आहेत संकल्प गुर्जर व जायला वाव्हळ यांनी; तर अनुवाद केले आहेत प्रभाकर पानवलकर आणि सुहास पाटील यांनी... 'भारत सासणे यांची मुलाखत' हे छोटे पुस्तक म्हणजे ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हा दासू वैद्य यांनी घेतलेली दीर्घ मुलाखत. महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका यांच्या वतीने साहित्य व समाजकार्य पुरस्कार मागील 30 वर्षांपासून दिले जातात. त्यांतील 2015 ते 19 या पाच वर्षांत ते पुरस्कार प्राप्त झालेल्या व्यक्तींच्या मुलाखती असलेले विशेषांक साधना साप्ताहिकाने काढले होते. त्या काळातील साहित्य पुरस्कारप्राप्त 22 व्यक्तींच्या मुलाखतींचा संग्रह म्हणजे 'आम्हा घरी धन', आणि समाजकार्य पुरस्कारप्राप्त 25 व्यक्तींच्या मुलाखतीचा संग्रह म्हणजे 'देव तेथेची जाणावा'. शिवाय, या पुरस्कारांचे प्रवर्तक सुनील देशमुख यांची दीर्घ मुलाखत 'आम्हा घरी धन'मध्ये समाविष्ट केली आहे. वरील सहा पुस्तकांत मिळून 78 मुलाखती आहेत, या सर्व मुलाखतींतील ऐवज वाचनीय तर आहेच, पण वेगवेगळ्या प्रकारे अभ्यास संशोधन करता येईल या दर्जाचा झाला आहे.

साधना साप्ताहिकातील लेखांचा संग्रह असलेली चार पुस्तके आहेत. त्यात 'मला प्रभावित करून गेलेले पुस्तक'. हे पुस्तक म्हणजे साधनाने 2021 व 2022 मध्ये काढलेल्या दोन मिनी विशेषांकाचा संग्रह, यात विविध क्षेत्रांतील 21 मान्यवरांचे लेख आहेत. 'विज्ञानाने मला काय दिले' हा विशेष अंक 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती अंक' म्हणून 2020मध्ये काढला होता, त्यात 14 व्यक्तींनी लिहिलेले लेख आहेत, तो अंक आता पुस्तकरूपाने आला आहे. महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांचे प्रवर्तक सुनील देशमुख यांनी साधना साप्ताहिकात वेळोवेळी लिहिलेल्या 10 छोट्या लेखांचे पुस्तक 'सावध ऐका पुढल्या हाका'. डॉ.राजन हर्षे यांनी मागील वर्षभर साधना साप्ताहिकातून लिहिलेल्या 12 दीर्घ लेखांचे पुस्तक, 'पक्षी उन्हाचा : सात विद्यापीठांच्या आवारात' या नावाने आले आहे.

या वर्षी साधना प्रकाशनाकडून आलेल्या पुस्तकांचा दुसरा विभाग म्हणजे पूर्णतः नवीन मजकूर असलेली पुस्तके. या विभागात 11 पुस्तके आहेत. त्यामध्ये विशेष महत्त्वाचा ऐवज म्हणजे मधु लिमये यांच्या पुस्तकांचे अनुवाद. लिमये यांनी 1994मध्ये लिहिलेल्या 'जनता पार्टी एक्सपेरिमेंट' हा इंग्रजीतील बृहद ग्रंथ 'जनता पक्षाचा प्रयोग' या नावाने चार खंडांत आला आहे, त्यातील खंड एक व दोनचे अनुवाद वासंती फडके यांनी, तर खंड तीन व चारचे अनुवाद सुनीती जैन यांनी केले आहेत. लिमये यांनी 1989 मध्ये लिहिलेला 'बर्थ ऑफ नॉनकाँग्रेसीझम' हा ग्रंथ, 'जन्म बिगर काँग्रेसवादाचा' या नावाने दोन खंडांत आला आहे, या दोन्ही खंडांचे अनुवाद सतीश कामत यांनी केले आहेत.

डॉ.अभिजीत वैद्य यांनी आरोग्य सेनेच्या मुखपत्रात मागील दशकभरात लिहिलेल्या संपादकीय लेखांचे पुस्तक म्हणजे 'शब्दांचीच शस्त्रे'. तर डॉ.आनंद नाडकर्णी यांनी विविध स्तरांतील व्यसनाधीन व्यक्तींच्या कुटुंबातील सहा मुलामुलींची रेखाटलेली व्यक्तिचित्रे म्हणजे 'वादळाचे किनारे'. नामदेव माळी यांनी लिहिलेली कुमार वयीन मुलांसाठी

लिहिलेली कादंबरी म्हणजे 'एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य'. हाँसदा सौभेंद्र शेखर यांनी 'आदिवासी विल नॉट डान्स' हा कथासंग्रह इंग्रजीत लिहिला, त्याचा मराठी अनुवाद सुजाता देशमुख यांनी 'नाही नाचणार आदिवासी आता' या नावाने केला आहे. प्रसिद्ध गायिका नीला भागवत यांची दीर्घ मुलाखत स्मिता गांधी यांनी घेतली, तिची छोटी पुस्तिका 'एक मैफल' या नावाने आली आहे.

या वर्षी साधना प्रकाशनाकडून आलेल्या पुस्तकांचा तिसरा विभाग म्हणजे, जुन्या पुस्तकांच्या दीर्घ काळानंतर आलेल्या नव्या आवृत्त्या. या विभागात 16 पुस्तके आली आहेत. त्यांमध्ये सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे, साधना साप्ताहिकाला साठ वर्षे पूर्ण झाली तेव्हा ग.प्र. प्रधान व रा.ग. जाधव यांनी संपादित केलेला 'निवडक साधना' हा आठ खंडांचा ग्रंथसंच दशकभरानंतर आला आहे. मधु दंडवते यांचे जन्मशताब्दी वर्ष चालू आहे, त्या निमित्ताने त्यांच्या 'डायलॉग विथ लाइफ' या इंग्रजी ग्रंथाचा कुमुद करकरे यांनी केलेला मराठी अनुवाद 'जीवनाशी संवाद', दशकभराने आला आहे. केशव गोरे यांचा 'असिधारा' हा स्मृतिग्रंथ 1960 च्या दशकात प्रकाशित झाला होता, त्याची नवी आवृत्ती अर्ध शतकानंतर आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मृत्यू झाल्यानंतर 'शास्त्रीजी' हे पुस्तक रा.ग. जाधव यांनी लिहिले होते, त्याची नवी आवृत्ती पाव शतकानंतर आली आहे. वसंत बापट यांनी लिहिलेल्या कवितांचा पहिला संग्रह 'बिजली', 1952 मध्ये प्रकाशित झाला होता, त्याची नवी आवृत्ती पाव शतकानंतर आली आहे.' श्यामची आई' या पुस्तकाची सचित्र व हार्ड बाऊंड आवृत्ती प्रथमच आली आहे, या आवृत्तीमध्ये सुजय डहाके यांनी दिग्दर्शित केलेल्या 'श्यामची आई' चित्रपटातील 35 छायाचित्रे त्या-त्या प्रसंगाला अनुरूप ठिकाणी समाविष्ट केली आहेत. आणि नीती बडवे यांनी लिहिलेल्या 'अनंत अक्षर' मालिकेतील तीन पुस्तके 'भाषेकडे बघताना', 'मराठी भाषेकडे बघताना', 'बहुभाषिकतेकडून भाषांतराकडे' या नावाने आली आहेत.

वरील तिन्ही विभागांतील सर्व 37 पुस्तके ई-बुक स्वरूपात त्या त्या वेळीच आणलेली असून, किंडलवर उपलब्ध आहेत.

याशिवाय, या वर्षभरात तेरा पुस्तके ऑडिओ बुक स्वरूपात आली असून, ती स्टोरी टेलवर उपलब्ध आहेत. ती तेरा पुस्तके अशी : अवधूत डोंगरे यांनी लिहिलेले कुमारकथांचे पुस्तक 'तात्पर्य', अरुण गांधी यांनी लिहिलेले व सोनाली नवांगुळ यांनी अनुवाद केलेले 'वारसा प्रेमाचा', साने गुरुजींनी लिहिलेले वैचारिक पुस्तक 'भारतीय संस्कृती', संतोष पद्माकर पवार यांचे 'बहादुर थापा आणि इतर कविता', प्रवीण बर्दापूरकर यांनी संपादित केलेले 'आई', विनोद शिरसाठ यांनी संपादित केलेले 'विज्ञानाने मला काय दिले?', ग.प्र. प्रधान यांनी लिहिलेली 'हाजीपीर', 'सोनार बांगला', 'टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद' ही तीन पुस्तके, रघुराज मेटकरी यांचे 'माझे विद्यार्थी', दत्तप्रसाद दाभोळकर यांचे 'मुलांसाठी विवेकानंद', सुरेश द्वादशीवार यांचे 'तारांगण' आणि 2023 चा 'बालकुमार दिवाळी अंक'.

यामध्ये 'तात्पर्य' आणि 'वारसा प्रेमाचा' या दोन पुस्तकांचे वाचन रीमा अमरापूरकर यांनी केले आहे. 'आई', 'विज्ञानाने मला काय दिले?', 'हाजीपीर', 'सोनार बांगला', 'मुलांसाठी विवेकानंद', 'टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद', आणि 'बालकुमार दिवाळी अंक 2023' या सात पुस्तकांचे वाचन गौरी देशपांडे यांनी केले आहे. 'माझे विद्यार्थी' या पुस्तकाचे वाचन राजकुमार तांगडे यांनी केले आहे. 'बहादूर थापा' या पुस्तकाचे वाचन स्वतः संतोष पद्माकर पवार यांनीच केले आहे. 'तारांगण' या पुस्तकाचे वाचन गजानन परांजपे यांनी केले आहे; तर 'भारतीय संस्कृती' या पुस्तकाचे वाचन सुहास पाटील यांनी केले आहे. या तेरा ऑडिओ बुक्सचे एकूण तास आहेत ७५.

या वर्षभरात साधना प्रकाशनाच्या सर्व छापील पुस्तकांच्या विक्री झालेल्या प्रतींची संख्या आहे 30 हजार. गेल्या वर्षी ती संख्या होती 27 हजार प्रती. या वर्षी साधना प्रकाशनाच्या सर्व ई-बुक्सची किंडलवर वाचली गेलेली पाने आहेत पावणेतीन लाख, गेल्या वर्षी हा आकडा होता साडेचार लाख पाने. आणि गेल्या वर्षी Storytel वर साधना प्रकाशनाच्या सर्व पुस्तकांचे मिळून ऐकले गेलेले तास होते 9 हजार, या वर्षी तो आकडा आहे 6 हजार तास.

साधना प्रकाशनाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आणि छापील पुस्तके खरेदी करण्यासाठीही sadhanaprakashan.in या वेबसाइटला जरूर भेट द्या. वेबसाइटवर सर्व दोनशे पुस्तकांची विस्तृत सूची उपलब्ध आहे. शिवाय, साधना प्रकाशनाची सर्व छापील पुस्तके amazon.in वरूनही खरेदी करता येतात. आणि साधना प्रकाशनाची सर्व e books किंडलवर, तर सर्व ऑडिओ बुक्स स्टोरी टेलवर उपलब्ध आहेत...


Date of Posting : 1-1-2024

*With Best Complements From*

**SCR ELEKTRONIKS Pvt. Ltd.**

**An ISO 9001 : 2015 COMPANY**

Manufactures of Customized Electrical
Test Equipment & Compliance Verification
Benches for electrical products

**Works :** W-188 (B), Phase II, M.I.D.C, Dombivli (E) – 421 204,
Dist. Thane, Maharashtra, India **Mob :** +91 9820372355 / 9820143590
**Website :** www.screlektroniks.com **Email :** contact@screlektroniks.com

साधना साप्ताहिक
६ जानेवारी २०२४

Registered

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2026
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2024-2026
Posted at PUNE PSO GPO 411001 / Monday / Date of Posting : 1-1-2024 / Date of Publication : 1-1-2024

**निमंत्रण**



पुरस्कारांचे प्रवर्तक सुनील देशमुख यांचे गेल्या वर्षी निधन झाले, त्यामुळे या वर्षापासून या पुरस्कारांच्या नावात सुनील देशमुख यांचे नाव समाविष्ट केले आहे.

# सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) साहित्य व समाजकार्य पुरस्कार 2023

## पुरस्कार प्रदान समारंभ



वेळ :
**सोमवार, 15 जानेवारी 2024 रोजी, सायंकाळी 5 ते 7.30**

स्थळ :
**एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाउंडेशनचे सभागृह, नवी पेठ, पुणे**

प्रमुख पाहुणे व हस्ते : **डॉ. जब्बार पटेल** (नाटक-सिनेमा दिग्दर्शक)

संयोजक : **मासूम** (पुणे) आणि **साधना ट्रस्ट** (पुणे)

**साहित्य पुरस्कार**

1. **तारा भवाळकर** (सांगली)
   दिलीप वि. चित्रे साहित्य जीवनगौरव पुरस्कार
2. **सतीश तांबे** (मुंबई)
   ललित ग्रंथ पुरस्कार
   काम तमाम @ वाघा बॉर्डर (कथासंग्रह)
3. **कालिदास शिंदे** (दिघंची, सांगली)
   वैचारिक/अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार
   झोळी (आत्मकथन)
4. **चैतन्य सरदेशपांडे** (पुणे)
   रा. शं. दातार नाट्यसंहिता पुरस्कार
   'उकळी' आणि 'रविवार डायरीज' (एकांकिका)

**समाजकार्य पुरस्कार**

1. **शिव कुमार भारती** (कानपूर, उत्तर प्रदेश)
   डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार
2. **शांताराम चव्हाण** (नाशिक)
   विशेष कार्य पुरस्कार (असंघटित कष्टकरी)
3. **नीतिन पवार** (पुणे)
   विशेष कार्य पुरस्कार (सामाजिक प्रश्न)
4. **विजय देठे** (चंद्रपूर)
   कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)
5. **निसार अली सफदर अली सय्यद** व **वैशाली निसार अली सय्यद-महाडिक** (मुंबई)
   कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)

पुरस्कार प्रदान समारंभाच्या वेळी सर्व उपस्थितांना, नऊ पुरस्कार प्राप्तव्यक्तींच्या वरील लेख असलेली स्मरणिका भेट देण्यात येईल, त्यामध्ये महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांच्या संदर्भातील अन्य तपशीलही असतील.

संपर्क :
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**
42, बी 1, कुबेरा विहार, गाडीतळ, हडपसर, पुणे 28
Ph : 02026995625/33 E-mail : masum-puneindia@gmail.com
Website : www.masum-india.org.in